महाराष्ट्रीय आद्य चरित्रकार

महिन्द्रभट्ट संकलित

लीळा चरि

भाग २ रा : पूर्वार्ध-खंड १ लें

(प्रतिष्ठानीं नागांबिकेच्या भेटीपासून बीड येथें भटोबासांच्या भेटीपर्यंत)

संपादकः-

हरि नारायण नेने, एम्. ए., एल्. टी.

शिक्षक, पटवर्धन हायस्कूल, नागपूर.

शके १८५८]

[किंमत सहा आणे

महाराष्ट्रीय आद्य चरित्रकार
महिन्द्रभट्ट संकलित

लीळा चरित्र

भाग २ रा : पूर्वार्ध-खंड १ लें

(प्रतिष्ठानीं नागांबिकेच्या भेटीपासून बीड येथें भटोबासांच्या भेटीपर्यंत)

संपादकः-

हरि नारायण नेने, एम्. ए., एल्. टी.
शिक्षक, पटवर्धन हायस्कूल, नागपूर.

शके १८५८] [किंमत सहा आणे

प्रकाशक—**ह. ना. नेने**, एम्. ए., एल्. टी.
शिक्षक, पटवर्धन हायस्कूल, नागपूर.

मुद्रक—**तु. मा. पाटील**, मॅनेजर,
सरस्वती प्रेस, अमरावती.

पुस्तक मिळण्याचें ठिकाण—
१ **श्री. कृ. गं. जोग**, व्यवस्थापक,
सरस्वती प्रेस, अमरावती.
२ **रा. रा. पां. ना. बनहट्टी**, बी. एस्. सी.
व्यवस्थापक नारायण मुद्रणालय सीताबर्डी,
नागपूर. (भीडेगढी).
३ **श्री. द. शं. नेने**, मोदीलाईन, सीताबर्डी, नागपूर.

प्रस्तावना.

१ प्राचीन मराठी भाषेच्या इतिहासाचें साधन, यादवकालीन समाजाचें विविधदर्शन व महानुभावीय पंथाच्या आद्यप्रवर्तकाची अधिकृत माहिती या दृष्टीनें **लीळाचरित्राची** महती संशोधकांना आतां पूर्ण मान्य झालेली असल्यामुळें त्या ग्रंथाचें प्रकाशन किती महत्वाचें व आवश्यक आहे हें सांगण्याची जरूर नाहीं. पण अगोदरच ग्रंथ सांकेतिकलिपींतील; एकंदर पोथीचीं पानें पाठपोट मिळून एक अशीं मोजल्यास सुमारें ६००; व भाषा प्राचीन आणि शब्द न तोडलेले. अशा परिस्थितींत समग्रग्रंथाचें प्रकाशन होणें कठींण असल्यानें, ५०-७५ पानाचे लहान लहान भाग काढण्यास प्रारंभ करण्याचें मनांत आले. सिंगापूर येथील महानुभाव श्रीमान बाबु गोविंद सहाय यानीं पहिल्या भागाच्या प्रकाशनाची आर्थिक जबाबदारी स्वीकारल्यानें गेल्या वर्षप्रतिप्रदेस **लीळाचरित्र-एकांक** हा पहिला भाग प्रसिद्ध करून प्रकाशनाच्या कामास मुहूर्त केला. त्या भागांत योगिनी **नागांबिका** (बाइसा) व **श्रीचक्रधर** यांची, पैठण येथें झालेल्या भेटीपर्यंतची माहिती आलेली आहे. यापुढील चक्रधरचरित्राचें साधारणपणें दोन भाग पडतात; खडकुली येथें भटोबासांना बोधदान होईपर्यंतची हकीकत ज्यांत अंतर्भूत होते तो **पूर्वार्ध** व तेथून चक्रधरप्रयाण होईपर्यंतचा भाग **उत्तरार्ध.**

२ प्रस्तुत जो **दुसरा भाग** (पूर्वार्ध-खंड १ लें) प्रसिद्ध होत आहे त्यांत **पूर्वार्धाच्या** सुमारें १२५ पेक्षां अधिक लीळा आल्या असून, **बीड** गांवीं श्रीचक्रधर व भटोबास यांच्या भेटीपर्यंतचा त्यांमध्यें मजकूर आला आहे. गेल्या वेळेस मूळ मजकुरांचीं छापील पानें ५० असून, टाईप जरा मोठा वापरलेला होता; पण सांप्रत मुख्य मजकुराचीं पानें अधिक असून, टाईप जरा बारीक वापरल्यानें मजकूर जवळ जवळ दीडपट देण्यांत आलेला आहे. ह्मणजे दोन्ही भाग मिळून जवळ जवळ छापील १२५ पानें लीळा चरित्रांपैकीं वाचकांस सादर केलेलीं आहेत. यावेळीं श्रीमान् बाबू सहाय यांची मागच्याप्रमाणें मदत होऊं शकली नाहीं; तथापि पुढें ती होईल या आशेनें प्रस्तुत भागाच्या प्रकाशनाची जबाबदारी

स्वतःच पत्करून हा **लीळाचरित्र–पूर्वार्ध** (खंड १ ला) आह्मी कोजागिरी पौर्णिमेच्या मुहूर्तावर वाचकांच्या हातीं देत आहों.

३ प्रथम भौगोलिक दृष्टीनें विचार करूं लागले ह्मणजे पुढील प्रश्न उभे राहतात. चक्रधर हे प्रवास पायीं करित असल्यानें **प्रतिष्ठानापासून बीड** पर्यंत त्याकाळीं रस्ता कोठून कसा जात होता, वाटेंत लहान मोठीं गांवें कोणतीं होतीं, आज त्यांतील कांहीं गांवें आहेत कीं नाहींत, त्या त्या ठिकाणीं वर्णिलेलीं देवळें आज अस्तित्वांत आहेत काय, पूर्वीं एकप्रकारचें देऊळ असून आज तेथें दुसरेंच कांहीं उभारलेलें आहे काय, न वसलेला प्रदेश, अरण्यें, नदीनाले यांचा मागमूस कितपत शिल्लक आहे, असे अनेक विचार मनांत येऊन '**पुरा यत्र स्रोतः पुलिनमधुना तत्र सरितां**' ही भवभूती कवीची उक्ति आठवूं लागते. या प्रवासांतील प्रमुख गांवांचा निर्देश करावयाचा ह्मणजे प्रतिष्ठान, राहाटगांव, मेहकर, वांकी, रिधपूर, येळापूर, मातखेड, इटखेड, लासौर, डोमेग्राम, श्रीनगर, नाशीक, पंचवटी, त्रिंबक, निफाड, नांदूर, पुणतांबे, डोमेग्राम, बीड अशीं गांवें सांगतां येतील. त्यावरून पूर्णानदी व गोदावरी यांच्या मधील, मेहकर तालुका, पूर्व खानदेश, अहमदनगर, नाशिक व मोगलाईतील मराठवाडा ही प्राचीन मराठी भाषेची कर्मभूमि मूर्तिमंत डोळ्यासमोर उभी राहते. प्रतिष्ठानीं भोगनारायण, कठेठाणीं महालक्ष्मी, मेहकरीं बाणेश्वर, लाखेपुरीं लक्षणेश्वरी, वाकीस पांडेश्वर, रिधपूर माल्हाणदेवी, बेलोरी संकनाथ, सीराळीं नागनाथ, मांगरूळीं वऱ्हाडदेवी, येळापूराजवळील अदंडीनाथ, त्रिंबकजवळ कोळाइ व नरसिंह, नाशीक येथील राम अशा **अनेक देवळांचा उल्लेख** या भागांत सांपडतो एवढेंच नव्हे तर, कांहीं ठिकाणीं देवळाचें तोंड कोणत्या दिशेस आहे याचेंही सूक्ष्म वर्णन आलेलें आहे. पान २९ वर एळापुर व देवगिरी या मार्गावरील 'माहादेवपुर घाट' उल्लेखिलेला आहे. तसेंच येळापुरा जवळील कांहीं लेण्यासंबंधीं निर्देश केलेला आढळून येतो. (पान ४६).

४ ऐतिहासिक दृष्टीनें पुढील उल्लेख लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. '**वेजाई** राणीयां **वैजनाथाचें** देउळ करविलें : ब्राह्मणा वृत्ती दीधलीया (पान ७);' **माहादेवराया**चा राउत साळीवाहान (पान ३१), **माहादेव रायानें** राखलेलें अरण्य (पान ३१), पाल्हाडांगिया व इतर राजपुरुष (पान ३५,४६,४७). रायाचे

वक्ते **गोपाळपंडित** (पान४५), '**माहादेवराजा** राजधर्म जाणे : **कान्हरदेवो** आस्तिक : **रामदेवो** निपरवस (पान ४६), राजा (माहादेव) दरिसन स्वीकार (पान ४७), माहादेव रावो **ठाणेया** कटकै गेला : तो **सीनरा** आला (पान ४९), चहुरायाचे भांडरी **गदोनायक** यांची अटक व मुक्तता (पान ४४), गोंदेश्वरापुढें पद्मेश्वरु (पान ५३), **अंदडीनाथ** व क्षेपणिक राजा; '**भट्टाचार्या** मागां पुढतीं अदंडीनाथें **वेद प्रतिष्ठीलें**' (पान ३३); मत्सरी **ब्रह्मसनाचे** शिष्य व **चक्रधरावर** विषप्रयोग (पान३५–३६) सारांश **कन्हरदेव जाधवाची** कारकीर्द (इ. स. १२४७–६०) संपून आपण **माहादेवराव जाधव** यांच्या ऐश्वर्यपूर्ण कारकीर्दींत आलों आहोंत (इ. स. १२६०–७१) असें उघड दिसत आहे. ठाण्याकडील मोहीम संपवून (वसईची मोहीम पहा) नाशिक सिन्नरकडे माहादेवराजा आला हा उल्लेख विशेष लक्षांत ठेवण्यासारखा आहे. तसेंच आपले एक एक शिष्य चक्रधरांची दीक्षा घेत आहेत असें पाहून, **ब्रह्मसानानें** मत्सराशीनें पेटून आपल्या शिष्याकरवी चक्रधरांना विषप्रयोग कसा केला व चक्रधरानीं महात्म्याला उचित अशा शांतीनें त्याला तोंड कसें दिलें व योगसामर्थ्यानें तें कसें पचविलें याचें वर्णन वाचण्यासारखें आहे (पान ३५–३६), विषप्रयोगामुळें चक्रधरांना दरदरून घाम सुटत होता नागांबिकेनें कांहीं उपाय करण्याविषयीं विचारलें असतां चक्रधर ह्मणाले, ' बाई, कांहीं उपाय नाहीं.' ' काहीं करूं नै ए : एक एक विरोधियें : चाऱ्ही वीख मिळविली असति :... ...एकासि उपावो कीजे : तवं एक चेढे : ' यानंतर या सर्वांचें पर्यवसान पुढें काय होईल याची रहस्यमय भविष्यवाणी पुढील वाक्यांत दिसून येतें ' आतां काइ करावें बाबा : बाइ हें काइ ऐसेचि जाइल : एथौनि एकातें निमित्त करील : आणि या राष्ट्रा बोलु लाविजैल : मग जाइजैल कीं : बाइ मीया ना : **हें राळेमवणें कीं : खांबीं पूजा तें होआवीचि असे** ' हें राळयाचें मापं करणें तुर्त्तेच संपलें आहे; खांबपूजा ती अजून पुढेंच आहे, या गूढवाणींतील घटना लक्षांत आणल्यास, विषप्रयोग हा एक मोठ्या कपटनाटकाची केवळ नांदी होय अशी सूचना नागांबिकेस चक्रधरानीं दिलेली दिसते. या सर्वव्यूहाचें पर्यवसान ह्मणजे राष्ट्राला बोल लावण्यासारखें कांहींतरी घातक कर्म कोणातरी महत्त्वाच्या व्यक्तीच्या हातून घडणार अशी भविष्यवाणी चक्रधरांच्या मुखांतून निघालेली दिसते. (पान ३६)

५ हटयोग व नाथपंथ या विषयीं पुढील आख्यायिका व प्रसंग लक्षांत घेण्यासारख्या आहेत. कोंडेश्वरीं **घाटेया हरिभटा** स्थितिसंचार (पान १६), **दुंडीराउळाचे** अनुगृहीत राघवदेव (पान २३), लेणां छायापुरुषु (पान २७), आपदेवो भटा **प्रल्हादविद्या** निरूपण (पान २८), साळिवाहान हटुनिरूपण (पान ३१) 'हटें वय स्तंभेः अपमृत्यु जींकेः वळित पळित लोपती '(पान ३१), **अदंडीनाथ**सामर्थ्यकथन (पान ३२-३३), **कुइराम** नांवाचे सिद्धपुरुष (पान ३४), **द्वारवतीकार चांगदेव राउळ** यांचे अनुग्रहीत **विद्यावंत** (पान ३४ –३५), विषप्रयोग झाला असतां विष पचवून टाकणें (पान ३५), **इंद्राइ** नाम माहात्मे (पान ३९), **चौरंगी** विद्यानिरूपण (पान ५७), इत्यादि वरील आख्यायिका वाचल्यास नाथपंथीय महंतापेक्षां चक्रधरांचे विचार कसे निराळेच होते हें स्पष्ट दिसून येईल. त्यावरून नाथपंथीय माहात्मे सिद्धीच्या मार्गे लागून खऱ्या मोक्षमार्गापासून कसे दूर दूर जात होते याचें ओझरतें चित्र या निरनिराळ्या आख्यायिकेवरून दिसूं लागतें.

६ कै. गो. का. चांदोरकर यांचा ' मानभावोत्पत्ति ' हा लेख (भा. इ. सं. मंडळ, चतुर्थसंमेलन) वाचावा व आतां प्रसिद्ध झालेला लीळाचरित्राचा एकांक व पूर्वार्ध वाचावा ह्मणजे कै. चांदोरकर यांचे तर्क कसे निःसंशय निराधार आहेत हें सूर्यप्रकाशाइतकें स्पष्ट होईल. सांकेतिकलिपींत लिहिलेले ग्रन्थ व परंपरेच्या माहितीचा अभाव या दोन प्रमुख कारणानें कै. चांदोरकर यांच्या वाचनांतच अनेक चुक्या झाल्या येवढेंच नव्हें, तर कोणत्या प्रकरणावरून चक्रधरानीं कसा उपदेश केला हें न कळल्यानें विपर्यासाचीं अनेक उदाहरणें, प्रस्तुत प्रसिद्ध होणाऱ्या लीळाचरित्र भागांवरून, वाचकांना पाहतां येतील. **चांगदेव राउळ** दोन होते कीं नव्हते या आक्षेपाला ' पांडेया स्वप्नी नामस्वीकारू ' (पान ३) व विद्यावंता भेटी (पान ३५) या लीळा उत्तर देतील; रिधपूरचें ब्रह्मयोगी **गुंडम राउळ** (श्रीप्रभु) यांचें वर्णन (पान १८–१९-२०) वाचून, हे खरेखुरे विदेही सत्पुरुष असल्याची ग्वाही वाचकांना देतां येईल; श्रीदत्त, पंचाळेश्वर, आत्मतीर्थ (पान २५) आणि दखले चांगदेवभट व श्रीदत्ताचें अमोघदर्शन (पान ३७) या लीळांवरून **महानुभावांचे दत्त** कोणते याचा उलगडा होतो; तसेंच

पंचकृष्णांच्या नामस्मरणाच्या मंत्राला कोणता आधार लीळाचरित्रांत सांपडतो हें (पान २१-२२) लीळेवरून कळून येईल. ' ऋद्धिपुरी श्रीगुंडम राउळगोसावियांचे चरण शरण ' या नाममंत्रांपैकीं ' गोसावीयांचे चरणशरण ' हे शब्द (पान २२) वर आढळून येतात; **चक्रधर** हे ब्राह्मण असून त्यांचे आचार विचार उत्तम प्रकारचे होते व ते पर्यटण करित असतां त्या त्या गांवांतील देवळांत उतरत असत व त्यांना तसें करण्यास कोणीही अडकाठीं केली नाहीं याचीं उदाहरणें **एकांक** भागाप्रमाणें येथेंही अनेक ठिकाणीं सांपडतात. चार राजांना पैसे पुरवणारे **गदोभांडारी** यांच्या घरचे प्रख्यात पुराणिक **सारंगपंडीत** (पान ६–७) व गीतेचे प्रवचनकार **कास्ते हरिदेवपंडित** (पान ९ व २५), प्रतिष्ठानचे **वामदेव** (पान ११), पदकर **नागदेवभट** (पान ४३-४४) इत्यादि चक्रधरांचे शिष्य झाले व माहादेवराव जाधव यालाही चक्रधरांच्या दर्शनाची इच्छा होऊन तो भेटीस आला; (पान ४६-४७-४८) पण चक्रधर हे कीर्तिलुप नसल्यानें, राजपुरुष चवकशी करितां आले असतां (पान ४९) चक्रधराचा व त्याचा पुढील संवाद झाला ' श्री चांगदेवो राउळ गोसावी एथ असति कीं : सर्वज्ञें ह्मणीतलें : ··· ··· इहां कोइ नथी : ··· ··· चांगदेवो राउळ नेणों : बागदेवो राउळ नेणों : ··· ··· माहातुमे बाहातुमे (महात्मे) कांहीं नथी :, जर चक्रधर हे दुसऱ्याला लुबाडणारे खोटे महात्मे असते तर **महादेव राजासारखें,** आपण होऊन हातांत सांपडणारें सावज त्यांनीं सोडलें नसतें. कै. चांदोरकर यांनीं शृंगाररसाचें ह्मणून दिलेलें उदाहरण किती विपर्यासाचें आहे हें पुढील लीळेवरून स्पष्ट होईल. कै. चांदोरकर ह्मणतात (पान १६५, भा. इ. स. मंडळ, चतुर्थ संमेलनवृत्त शके १८३८) ' लीळाचरित्र व लीळा संवाद यांत चक्रधर या नांवानें ··· ··· ज्या लीळा वर्णन केल्या आहेत, त्यांचा साकल्यानें विचार केला तर असें दिसून येईल कीं, त्यांचा बहुतेक भाग **अश्लील** आहे त्या सर्व लीळा येथें देणें शक्य नसल्यानें चरित्रांतील अत्यंत अश्लील अशा कांहीं देतों ··· ··· या लीलांवरून शिष्यांतहि योगाचे पांघरुणाखालीं **व्यभिचार** होत असे असें स्पष्ट दिसतें. ' इतकें सांगून कै. चांदोरकर यांनीं कांहीं लीलांचा निर्देश केला आहे; त्यांत ' धानाई कास घालणें ' ही एक लीळा निर्दिष्ट केली आहे. परंपरेच्या ज्ञानाच्या अभावीं केलेला तर्क कसा निष्फळ व निराधार याचें एक

अप्रतिम उदाहरण या ठिकाणीं आहे. धानाई ही स्त्री आहे व तिची कास चक्रधरांनीं घातली या गोष्टी खऱ्या; पण ऐवढ्यावरून एकदम शृंगाररस, अश्लीलपणा, व्यभिचार या कल्पना कशा उद्भवतात हें मात्र कोडें आहे. 'धानाइसासीं कवडां खेळु' (पान ११), धानाइ सलदी लपवणें (पान १३), तथा आख्यायिका श्रवण (पान १३), तथा शृंघारु पुसणें (पान १३), इत्यादि लीळांवरून काय बोध होतो तो वाचकांनीं पाहून मग त्यांत शृंगाररस आहे कीं नितांत वत्सलरस व शांतरस आहे याचा विचार करावा. धानाइसी ही सारंगपंडितांची लहान मुलगी; तिचें वय इतकें कमी कीं तिला स्त्रीपुरुष भेदसुद्धां कळण्याची पात्रता नाहीं. चक्रधर सारंगपंडितांच्या घरीं गेले असतां तिच्याशीं कवड्यांनीं सारीपाट खेळतात, काउचिउची गोष्ट सांगतात, 'साळैचें घर मेणाचें : काउळेयाचें घर सेणाचें : पाउसाळां काउळेयाचें घर पुरें जाए : साळैचे वाचे :' अशाप्रकारें 'सदासुरंग मधुर' अशी गोष्ट सांगून हट्ट धरणाऱ्या धानाइसेला ते उगी करतात. तेव्हां ही धानाई जरा थोडी मोठी झाल्यावर वत्सलतेनें आईबाप ज्याप्रमाणें परकर अथवा साडी नेसून देतात तशी चक्रधरांनी या मुलीला साडी नेसवून 'कास' घालून दिली तर तो शृंगार ह्मणजे 'भूषित करणें, अलकृंत करणें, नटवणें सजवणें' अशा अर्थी असून, व्यभिचार अश्लीलपणा यांच्या अनुषंगानें राहणारा शृंगार नव्हे हें कोणीही वाचकास सांगावयास नकोच. कांहीं भ्रामक कल्पना करून एकदा मनुष्याला दृष्टीची कावीळ झाली ह्मणजे त्याला जें पाहावें तें पिवळें दिसूं लागतें. इतर भोंदु गुरूप्रमाणें चक्रधर नव्हते हें पान ३, ४, ११, २९, ३४, असलेल्या लीळांवरून दिसून येईल. चक्रधरांचा बहुश्रुतपणा पुढील लीळांवरून (पान ९, १०, १२, १३, २५, ३१, ३४, ६२, इत्यादि.) स्पष्ट होतो.

७ लीळाचरित्राचे एकांक व पूर्वार्ध हे दोन भाग वाचीत असतां मधून मधून, **हीराइसा पाठ, परशरामबास व रामेश्वरबास** यांच्या वासना असे शब्द वाचकांना (पान ४, ५, १२, इत्यादि) आढळतील. त्याचा उलगडा पुढील प्रमाणें आहे. माहींभटानें संकलित केलेली लीळाचरित्राची पोथी पुढें एका 'सेखसय्याचा धाडींत' गेली; तेव्हां त्या ग्रंथाचें पुनः संशोधन जालें. 'चरित्र आबाब अन्वय' या अलीकडे उपलब्ध झालेल्या

पोथींत (शक १६८२ विक्रम संवत्सर, पौषमास, बुधवार) लीळाचरित्राच्या, 'शोधनीकारांविषयीं' पुढील उल्लेख आहे. 'प्रथम आरंभीं लीळाचें शोधन : केलें पूर्वजानें : **माहीभटीं** ॥ १ ॥ दुसरी शोधनी **परसरामानी** : लीळाची करुनि : बंद केला : ॥ २ ॥ मग तीसऱ्यानें : **सीवाची** शोधनी : **मुरारीमल्लानी :** चवथेन ॥ ३ ॥ ऐसे शोधकार : वेदसंख्या सार : लीळाचे प्रकार : आइकावे ॥ ४ ॥" **कृष्णमुनींचे** 'अन्वयस्थळ' यांत **हीराइसे**विषयीं पुढील माहिती मिळते. "ह्माइंभटोबासीं : लीळाबंद केला : तो धाडीमाजी गेला : सकळही ॥ १ ॥ उपाध्यकंजाख्या : तयाची नंदनी : **हीरांबा योगिनी** : प्रज्ञावंत ॥ २ ॥ एकसंदी प्रज्ञा : होती हीरांबेसी सोधनी लीळेसी : केली तेही ॥ ३ ॥ लीळेचा संबंध : माहींभट कृत्य : सकळही श्रुत : हीराइसा ॥ ४ ॥ **सकळ श्रीमुख : होते मुखपाट : प्रज्ञा पै आचाट : एकसंधी** ॥ ५ ॥ **लीळातीन्ही रूपें : हीरांबा शोधनी : पुस्तकें लीहुनी : बंद केला** ॥ ६ ॥ तीयां लीळाधारें : आदी तीन्ही रूपें : केल्या ज्ञानदीपें : परशरामें : ॥ ७ ॥"इत्यादि वरील प्रकारें लीळाचरित्राच्या शोधनीचा इतिहास वाचला ह्मणजे कांहीं ठिकाणीं तीच हकीकत पुनः कां दिली याचा उलगडा होईल. उदाहरणार्थ पान २८ मध्यें, 'आपदेवोभटा प्रल्हादविद्या-निरूपण' ही लीळा आहे. तेथें प्रथम 'आपदेवो भटातें ह्मणीतलें : जा गा :' या वाक्याऐवजीं हीराइसाचें ह्मणणें असें आहे कीं 'भटो : तुह्मी पैला लेणेया जा' असें चक्रधरांचे शब्द आहेत. पान १९ मध्यें आरंभीच्या दोन तीन ओळी पाहिल्यास हेंच दिसून येईल. 'विनायकेंसीं नावेक खेळु केला : मग भीतरीं बीजें केलें' असें वर्णन केल्यावर रामेश्वरबास व परशरामबास यांचें ह्मणणें दिलें आहे, त्यावरून शोधनकाळीं मिळालेली जास्त माहिती त्या त्या अधिकृत पुरुषाच्या नांवानें 'शोधनी' नंतर जोडलेली आहे हें ठरतें. महानुभावीय ग्रंथकाराचा हा प्रामाणिकपणा अत्यंत प्रशंसनीय आहे.

८ प्रस्तुत भागांत वर्णिलेल्या प्रवासांत चक्रधर हे **त्रिंबकला** गेले होते असें वाचून, **सिंहस्थाच्या** प्रश्नाची सहजच आठवण होते. त्रिंबकाच्या यात्रेला गेलेली **बोणेबाइ** चक्रधरांना पुनः वाटेंत भेटल्याचा उल्लेख, या भागांत

आढळला नाहीं, एवढेंच नव्हे तर चक्रधर त्रिंबकला पोचले असतां, त्याठिकाणीं सिंहस्थानिमित्त एखादी मोठी यात्रा जमली आहे असाही निर्देश नाहीं. ' त्रियंबकी अवस्थान ' (पान ५४) ही लीळा वाचकांनीं वाचावी. रत्नमालास्तोत्रांत याविषयीं पुढील उल्लेख आहे.' **त्र्यंबकं गन्तुकामेन वासो गोवर्धने कृतः। निवासस्त्वंजानिगिरौ जैनाळये सुरेश्वरः ॥ १ ॥ जगाम करुणा सिंधुस्त्र्यंबकाय सुरेश्वरः 'समर्प्य वीटकं पूर्णो गुफायां समवस्थित :** ॥ २ ॥ ' यापुढील वर्णन वाचलें असतां यात्रेचें वर्णन किंवा सिंहस्थाचा उल्लेख तेथें आढळत नाहीं. तेव्हां प्रो. कोलते यांनीं, रत्नमाळास्तोत्रांतील ' सींहस्थे व्रजतीश नाथ सुजनो गंगां व्रजामो वंय ' या बोणेबाईच्या मुखीं असलेल्या एका उल्लेखावरून, चक्रधरांच्या प्रयाणकाळाविषयीं केलेल्या तर्काला अजून बळकटी नाहीं असें ह्मणणें प्राप्त आहे. सारांश लीळाचरित्र व रत्नमालास्तोत्र यांचें समग्र वाचन होण्याचें साधन निर्माण होईपर्यंत अशा प्रकारचे प्रश्न उपस्थित झाले, तरी त्याचा पूर्ण निकाल लावणें वाचकांना तरी निदान कठीण आहे, हें खरें.

९ लीळाचरित्र हा ग्रंथ माहिंद्रभटांनीं संकलित केल्यावर त्यांतून चक्रधरांचीं कांहीं वचनें निवडून ' आचारपाठ, विचारपाठ ' इत्यादि केशिराज, रामेश्वर, परशराम, मुरारिमल्ल यांनीं पंथीयासाठीं तयार केले; त्यांपैकीं कांहीं सूत्रांचें ' प्रकरणें किंवा प्रसंग ' कोणते हे पान २-४-६-८-१५-१७-२५-३०-३१ इत्यादि, जाड्या टाइपांत छापलेल्या कांहीं वचनावरून व लीळांवरून स्पष्ट होईल.

१० प्रस्तुत भागावरून कांहीं सामाजिक चालीरीतींची माहिती मिळते. सार्वजनिक बहिष्कार घालावयाचा असल्यास त्या मनुष्याशीं सर्वांचें वर्तन (पान ८-९), पिशाचबाधा झाल्यास तीनमुदा भाताच्या ओवाळून टाकणें (पान ५), देवळामध्यें नर्तन होत असतां त्यावेळीं ' मादळीतः काहाळियाः वसकरूः आळतीकरूनः ' इत्यादि परिवार नर्तकाबरोबर असे (पान १३), मुलांना काउचिऊची गोष्ट सांगून उगी करणें (पान १३·१४), देवळाचा कळस दुरून पाहिल्याबरोबर यात्रेकरूंचा 'जय' शब्द घोष (पान २३), बोरीबाभुळ शिंपणें (पान ४१), इत्यादि.

११ प्राचीन मराठी गद्याचे विविधमासले, शब्दसंग्रह, वाक्यरचना या दृष्टीनें लीळाचारित्र हें किती महत्वाचें साधन आहे हें पूर्वी वाचकांगा अनेकवेळां दर्शविलें आहे, ह्मणून कांहीं थोडीं उदाहरणें दाखवून हें प्रकरण आटोपूं. पायवणी, आळेंनिवणें, सांबार (कोथिंबीर), गोदरी (रस्ता), तांबवटी (घागर), संबळ (सामग्री), बाळाणा (गवाक्ष), उधाणी (वादविवाद), वगैरे अनेक अपरिचित शब्द वाचकांना आढळतील. घुघायली (धुसपुसली), मकर्णे (निंदा करणें), चेवो येणें (जागृती येणें), काळाक्षरीं नांत्र घालणें, हात वोडवणें (पुढें करणें), ग्रह्मो फेडणें (भूत काढून टाकणें), बोबाणें (ओरडणें), इत्यादि क्रियापदें व वाक्प्रचार अनेक दिसतात. आह्मांसि दंडवत करा : माः सांधौनि (मग सांगूं), ' नाहीं बाइः हें ऐसेंचि आलें ' (हें ह्मणजे आह्मी), तुमतें नष्टभ्रष्ट ह्मणती कीं: ह्मणती तरि ह्मणती ' (ह्मणतील तर ह्मणोत), आठा दामाचा वेचु (खर्च), गोसावीयांसि लोहिवां कमळीं पुजा केली, बाहर्से वाती लाविती का तरि मी गोसावीयांतें देखतां, इत्यादि वाक्यरचना ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत.

१२ शेवटीं उमरावती येथील सरस्वती प्रेसनें छापण्याचें काम लवकर व नीटनेटकें केल्याबद्दल त्या छापखान्याच्या व्यवस्थापकांचे व नेहमीप्रमाणें आपुलिकेनें योग्य सूचना दिल्याबद्दल प्रो. बापूसाहेब भवाळकर यांचे आभार मानून, व पुढील भाग वाचकांचे हातीं देण्याचा सुप्रसंग लवकर येवो अशी आशा करून ही लहानशी प्रस्तावना संपवितों.

नागपूर, कोजागिरी पौर्णिमा
ता० २९–१०–१९३६

ह. ना. नेने.
शिक्षक, पटवर्धन हायस्कूल, नागपूर.

लीळाचरित्र

पूर्वार्ध

एरीं दीसीं उदयांचि गोसावीयांसि **बाइसाचिए** गुंफे अग्निकोनीं आसन : पश्चीमा मुख : **बोणेबाइं** ह्मणीतलें: **नागुबाइचिए** गुंफेहुनि: मुनिदेव न एति कीं : ऐसें भणौनि : तेथ आलिया : पै वो नागुबाई : आमचें मुनिदेव एथ न एति कीं : निच रधन होए : आणि : येति : कालि न येति चि: तरि : काइ थोर नगर भणौनि चुकले : परि चुकति किरू ऐसे नव्हति : तरि : काइ कोण्ही जेवावेया नेले : ऐसें बोलिली : तवं उपाहानौ देखीलिया : पुढारीं आलीं : ऐसी वास पाहाति : तवं : गोसावीयातें देखीलें : मग : ह्मणीतलें : हें काइ बा मुनिदेया : कालि बीढारा न याचि : आह्मीं वाट पाहात होतों. सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : हें ऐसेंचि आलें : मग : ऐसेंचि आलें : मग **बोणेबाइं** ह्मणीतलें : चाला चाला बा : मुनिदेया : सांगातु नीगाला : तवं बाइसीं ह्मणीतलें : हें काइ वो : माहात्मेयासि काइसा त्रीयंबकु : हें जेथ असती तेथचि तिर्थ: तवं: तेंहीं ह्मणीतलें : हे काइ वो : तरि : आह्मीं : आपूलिया मूनिदेयातें नेवों ना : ऐसी बाइसांवरि घुघाइली : मग : ह्मणीतलें : चाला बा : मूनिदेया : ह्मणौनि : उपाहानौ मेळवीलिया . मग गोसावी **लोणार** वरि बीजें केलें : तेथ उपाहानहो फेडीलीया : तीये पुढें उपाहानहौ घेउनि गंगा उतरली : उपानहो मेळवावीया मागील वास पाहीली : तवं : गोसावी तेथचि उभे असति : मग बाइं ह्मणीतलें : चाला बा मुनिदेया : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : आतां हें न ए : यालागि इतुका ऐसा त्रीयंबकु घेउनि या : तवं तेहीं ह्मणीतलें : कटकट : बा मूनिदेया चाला कां : तवं आणिकी एकीं ह्मणीतलें : हें काइ वो

माहात्मे : हें काइसेया येति : हे जेथें असती तेथाचि तीर्थ : मग : माथोर्ती उपाहानहौ घेउनि आलिया : मग तेहीं ह्मणीतलें : बा मूनिदेया : आह्मी एव्रों तवं एथचि असा : मग गावांसि जावों : मग तीया निगालीया : गोसावी देउळें मढ अवलोकीत पाहारा दीढा नागुबाईचीए गुंफेसि बीजें केलें : नागुबाई ह्मणीतलें : बा : मुनिदेया : राहीलेति : तें चांग केलें हो : आपण जेथ असींजे तेथेंचि तीर्थ : नागुबाई पाये पुसणें बैसों घातलें : **हांसूबाई** माहात्मेयांसि पाणीभातु दीया : तेंहीं दुधी करटां वाढीलें : गोसावी यासि आरोगणा जाली : नागुबाई ह्मणीतलें : बा मूनिदेया : आपण ये नगरीं जवं असीजैल : तवं एथ पाणीभातु घीयावा : विळीचां भिक्षा मागौनि तैसी जेवावी : **भोगनाराएणि** निद्रा करावी : हें आपुलें ऐसें ह्मणावें : गोसावी स्वीकरीलें : ॥ २ ॥

मग गोसावी **भोगनारायणीं** पहुड केला : वीळिचां आरोगण करूनि उदेयां विहीरणा बीजें केलें : पाहारा दीढा : गुंफेसि बीजें करीति : **नागुबाइए** पायेपुसणें बैसों घालीति : **हासूबाइ** : माहात्मेया पाणीभातु दीया : दुधीं करंटां पाणीभातु आरोगणा होए : हंसराजु नागुबाईचिए ठाइं अवसरू करीति : या परी तीसरां दीसीं उदेयांचि आरोगणा जालेयां नंतरें आसनीं उपवीष्ट असति : नागुबाईसें गोसावीयाची वास पाहातें असति : गोसावी नागुबाईसातें अवलोकीति : दीठी दीठि मीळे : आणि : नागुबाईसें खालुती वास पाहाति : गोसावीयाची दठींचें पेणा : नागुबाईसा स्तीति जाली : मग नागुबाई आपणेयातें वोटेया खालुतें घातलें : बाबा : ह्मणौनि : बाबा : पापीण : बाबा : एथ मीं सूळीं सूदलीयें असें : बाबा खालि : मग गोसावी वोटेयावरि आसन केलें : मग सेवा-दास्य करूं लागली : चरण क्षाळण करीति : आपण चरण उदक घेति : अवसरू करीति : गोसावीयासि बरवी तात्परियें आरोगणा देति : प्रसादु घेति : भोगनाराएणीं जाडि आथुरीति : वरि पासोडी : पासवडा घालीति : तेथ पहुड होए : ऐसीं वर्तो लागलीं : सर्वज्ञें ह्मणीतलें : **ह्मातारियेचा ठाइं त्रिदोषू होता : तो सन्निधान देउनि फेडीला : मग तीसरां दीसीं कळिका एकि संचरीली :** ॥ ३ ॥

हंसराजा स्थिति : ॥ : **हंसराजु** आणि **पांडे** भकति : हें काइ जालें या नागुबनइसि : चळली काइ : एसणा आमचा पयोवर्तियांचा मार्गु : नेणोकोण आणिला असे : तेयाचें उसीटें खाति असे : पायवणी पीति असे : ऐसें दोघें भकति : मग : नागुबाई ह्मणीतलें : बाबा : हे हांसूबाई भकति असे : इएसि काइ करूं बाबा : गोसावी उगेचि होते : एकुदिनी वोटेया वरि आसन : तवं हंसुबाइसें आलीं : सर्वज्ञें ह्मणीतलें : हंसुराजा : या : या शब्दासरीसीं स्तीति जाली : श्रीचरणापासीं गडबडा लोळति : जी जी : मी पापीण जी : गोसावी यासि भकें जी : गोसावीयाची नींदा करीं जी : मग : तेंहीं सेवा करूं लागली : ॥ छ ॥ हंसराजा स्तीति जालेया नंतरें दुपाहारचा पहुड वोटेया वरि होए ॥ छ ॥ ४ ॥

पांडेया स्वप्नीं नामस्वीकारू : ॥ : मग **पांडे** भकति : ॥ (परशरामबास) **वामदेवाचीए गुंफे** जाति : एतुके दीस एकीचि भुलली होती : आतां दोघी भुललिया : या काइ जालें दोघीसि : चळलियां काइ : एसणा **आमुचा पयोवर्तियाचा मार्गु** : सांडौनि नेणोकोण आणिला असे : तेयाचें उसीटें खाति असति : पायवणी पीति असति : ऐसे निच (नित्य) भकति : मग : नागुबाई ह्मणीतलें : बाबा **पांडा** भकतु असे काइ करूं : गोसावी उगेचि होते : एकू दी **पांडे** रात्रीं निजेले असति : ते रात्रीं स्वप्न जाला : गुंजावर्ण डोळे : बाबर झांटि : हातीं मूदलगु : ऐसे जमजुत (यमदूत) आले : पांडेयातें मूदगलवेऱ्हीं घेति : तेवीचि ह्मणति : आरे हे कवण पुरूखु : ऐसें नेणसिः हे **द्वारावतीकार श्रीचांगदेवो राउळ** निच (नित्य) गोसावीयासि तुं भकसि : यांची तुं नींदा करीसि : ऐसे ह्मणोनि मुदगलें तोंडावरि हाणति : गोसावी आड श्रीकर वोडवीति : नको नको : बापूडा : मारूं : नेणचि : पांडे काकुलति एति : मग चेवो आला : उठिले : मग : नागुबाइ नागुबाइ : ह्मणोनि बोबावों लागलें : नागुबाई ह्मणीतलें : हांसूबाई : पाहा पा : पांडा कां बोबातु असे : हंसराजु गेली : आवो : तुं कां आलिसि : ते नागुबाइ बोलावी : नागुबाइसें गेलीं : रात्रीचें व्रतांत सांघीतिलें : तरि गोसावीयातें विनवी कां : एथ बीजें करावें : नागुबाइसा सूख जालें: नागुबाइ बोलाउं गेलीं : (परशराम

बास) : ॥ : गोसावी भोगनाराएणीं होतें ॥ छ ॥ (रामश्वेरबास) गोसावी **ब्रह्मचारी देवाचीए** गुंफेसि होते : ॥ छ ॥ : नागुबाइ वीनवीलें बाबा : **पांडा** बोलावीत असे : तेथ बींजें कीजो जि : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ: **हे काइ तेयाचिय नाथेचा बैलु** : ऐसें तेयाचिया बोलावीलेया येइल : ना : बाबायें बीजें करावें : मग गोसावी बींजें केलें : दारेसीं उभे ठेलें : आणि : **पांडा** श्रीचरणावरि दंडवतें घातलीं : श्रीचरणापासि लोळों लागले : जी जी : मी गोसावीयांवरि नीच भकें : मग रात्रीचें वृतांत सांघीतलें : आजी : गोसावी राखीला जी: हे कवण : गोसावी ऐसें तुह्मीं नेणा वो : हे **द्वारावतीकार चांगदेवो राउळ** : नागुबाई गोसावीया पुसीलें : बा बा : आपणेयां नांव काइ : पांडा ह्मणतु असे : तेंचि : सर्वज्ञें ह्मणीतलें : **त्रीदोखू होता : तो दर्सन देउनि फेडीला : मग प्रेम कळीका संचरीली : मग पांडेही गोसावीयाचे जाले** : ॥ ५ ॥

भोगनारायणीं मायधुवां भेटी : **गदोनायेकाचिए ब्रह्मपुरीये** माये-धवांचा (मायलेकी) आवारू : कहीं प्रागीं (प्रयागीं) स्नान करीति : तोचि देओ पाहाति : कहीं **लोणारीं** स्नान करीति : तोचि देवो पाहाति : कहीं **पींपळेश्वरीं** स्नान करीति : तोचि देओ पाहाति : आदीत्यवारीं **भोगावतिएसि** महीमा : तीए दीसीं अवघा लोकू भोगावतिए स्नान करीति : ऐसा एकू दीस आदित्यवारू आला : त्या भोगनाराएणीहुनि भोगावतिएसि स्नानासि जाती होतीया : गोसावियासि उदयाचा पूजावस्वर : गोसावी भोगनाराएणाचां आंगणीं उभे असति : तथा **हीराइसा** पाठ : पटीसाळें आसन : तिएं आलीं : तेंहीं गोसावीयातें देखीलें : जातांचि भोगावतिए स्नानें केलीं : तियाचि वाटा मागुतीया आलिया : बाइ : या : देवाये गे जावों : गोसावीयासि पटिसाळेवरि आसन : माता देउळांतु गेली : ते गोसावीयातें पाहाते तेथेंचि राहीली : मातां ह्मणीतलें : हा देवो पाहावेया आलिसि तरि देवो पाहासि ना : ते उगीचि होती : मग घरासि आली : तवं लेकीसि देह जाए ऐसा ज्वरू आला : थोरि पीडा हों लागली : माए काकूलति करूं लागली : हागे आइ : हा ज्वरू तुझा काइसेनि जाइल : तीया ह्मणीतलें : मीं ह्मणेन ते करीसी तेणें जाइल : तरि : हां गे आइ : सांग का : ना : भोगनाराएणीं जे

गोसावी असति तेयांचें मज दर्सन होइल तरि माझें देह वांचैल : हो कां : गे : आइ : ह्मणौनि गेली : गोसावींया दंडवतें घातलीं : श्रीचरणा लागलीं : मागील आवघें वृतांत सांघीतलें: तर गोसावी येथ बीजें करावें जी : गोसावी तेथ बीजें केलें : तिये उठिली : दंडवतें घातलीं : श्रीचरणा लागलीं : आसन केलें : मातां पुजा द्रव्यें आणिलीं : पाणी ठेविलें : उपहारू निफजवीला : मग : दोघीं मर्दना दीधली : भक्तजनें पुजा केली : आरोगणा जाली : गुळळा जाला : वीज वोळगळीला : तीएचा ज्वरू गेला : गोसावीयासि पहुड जाला : मग तीएचि तार्टी दोघीं जेऊं बैसलिया : मग चरण क्षाळण : चरणसव्हान केलें : चरणोदक घेतलें : मग गोसावी बीजें केलें : ॥ ६ ॥ :

ग्रहे सारंगपाणी भेटी: तेयांसि ग्रहो लागला होता: ते **देवांचे** सोइरे : तयाचीया मातां **दादोसातें** ह्मणीतलें : **रामा** : तुं कांहीं जाणसी : तरि : या सारंगपाणीचा आंगीं ग्रहो असे : तो फेडी कां : तेंहीं ह्मणीतलें : आवो माझेनि जाए ऐसेंहीं आति : न वचे ऐसें ही आति : आमचेया गोसावीयाचेनि जाएचि : ते गोसावी कवण ठाइं असति : ना : भोमनाराएणीं असति : मग सारंगपाणी : तेयाची माता : चांगदेवो भट : **बल्हेग्रामूनि** ऐसी गोसावीयांचिया दरिसनासि आलीं : भोगनाराएणीं वीळचिया वेळीं घडीया दो आसन : तीयें आलीं : दंडवतें घातलीं : श्रीचरणा लागलीं : आसु (एक सुवर्ण नाणें) दरिसनां केली : गोसावी अवसरू दीधला : जी जी : रामु आमुचा सोएरा : मागील व्रूतांत सांघीतलें : जी जी : तरि : याचा आंगीं ग्रहो असे : तो याचिए आंगीचा फेडावा जी : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ तुमतें पाणीभातु असे: नागुबाई ह्मणीतलें : हो बाबा : असे : तिन मुदा करूनि यातें वोवाळूनि सांडा : नागुबाइ ह्मणीतलें : बाबा : हा सावदु ऐसा दीसतु असे : यांचा आंगीं कें असे ग्रहो : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : तिन असति : ॥ हीराइसा पाठ ॥: आंगुळीका तीन दाखविलें : ॥ एयीचेया दरीसना एतां : येवों नये : माहारवडा कांटी असे : तेथ राहीले असति : मग नागुबाई तीन मुदा केलीया : तेयातें वोवाळूनि सांडीलिया : मग तेंहीं उपाहारू केला : निगतां सर्वज्ञें ह्मणीतलें : ते वाट पाहाताति : [परशरामबास] तेयासी आतां याचें कांहीं करूं न ये : पर : तरि तेया वाटां न वचिजे : तेंहीं ह्मणीतलें : या

जी : द्रुष्टवैर चुकवीजे : आणिकीं वाटां जा : हो कां जी : मग ते पैलाडीलेया वाटा गेली : ॥ ७ ॥

देइभटां भेटी : आस्तित जाली : ॥ : एकुदीनी भोगनाराएणीं देइभटां भेटि जाली : दंडवतें घातलीं : श्रीचरणा लागलें : गोसावीयां पासि बैसले : आणि स्तीति जाली : भोगिली : भंगीली : मग बीढारा गेले : ॥ ८ ॥

सारंगपंडीतां भेटि : ॥ : **सारंगपंडीतां** देइभटीं गोसावीयांचें बरवेंपण : चातुर्य : सौंदर्यें : सारंगपंडीतां पुढें सांघीतलें : तेंहीं पूसीलें : ते कवणे ठाइं असति : ना : भोगनाराएणीं असति : गोसावीयासि दुपाहाराचा पुजावसर : श्रीकंठीं गळदंडा : आंगिएचे मोकळे कसे : भोगनाराएणाचीये आग्नये कोनी वोतपली (उन्हाची तिरीप) घेत उभे असति : सारंगपंडीत **गदोभांडारीया-चिया** घरा पुराण सांघों जात होते : तेथ भेटि जाली : मग ह्मणीतलें : जी जी : मज दरिसन कवणें ठाइं होइल : तथा देइजैल ; ॥ : सर्वज्ञें ह्मणीतलें : **चासाकडे** : सारंगपंडीत गदोनाएकाचेया घरा गेले : दाहा एक श्लोक ह्मणीतलें: आणि पोथी बांधली : तेंहीं ह्मणीतलें : हे काइ : आजी लवकरी पोथी बांधली : ना : काहीं कार्यें असे : काखे पोथी : **चासाकडे** आले : तवं **चासीं** गोसवीयांसि आसन : परशरामपाठ : ॥ : वामनदेवाचीएं गुंफे देखीले : मग चासी भेटि जाली : पुढां बैसले : मग प्रश्न केला : जी जी : मागा श्रीकृष्ण चक्रवर्ति पासौनि आकृत्रीम्य (अकृत्रिम) आनंदु आति : तैसा अन्येत्र आति : सर्वज्ञें ह्मणीतलें : **पाहीजे : पुसीजे : चर्चिजे : मा जेथ आति : तेथ आति** : आणि स्तीति जाली : परशराम बास : ॥ : मागां पुरुषाचां ठाइं आकृत्रिम्य आनंदु आति : तैसा अन्येत्र आति : जेतुलेंही पाहीजे : तेतुकेंही एथ आति : आणि स्तीति जाली : ॥ भोगीली : भंगली : केतुलें एककाळु : मग वीनवीलें : जी जी : माझेया घरां गोसावी बीजें करावें : मग तेथ बीजें केलें : सोधु : देव्हार चौकीये : मर्दना : माळवधावरि मादनें : सकृत ॥ छ ॥ उतरीले पटीसाळेवरि आसन : चरणक्षाळण केलें : चरणोदक घेतलें : वोळणीं तेल : चिकसा : आणिला : सर्वज्ञें ह्मणीतलें : कपीला स्नान कां वर्तेना : हो कां जी : मग उपरीएवरि : बीजें केलें : चौरंगावरि आसन : दोनि गंगाळें उदकां भरिलीं :

एके गंगाळीं आंगवसा तीमीती : श्रीमूर्ति प्रमार्जीति : दुसरीये गंगाळीं आंगवसा धुति : ऐसें मार्जनें जालें : मग : तीयेचि पटिसाळे चौरंगावरि आसन : सर्वांगीं चंदन वोळगवीलें : पुजा केली : धुपार्ति मंगळार्ति केली : मग उमाइसा करवीं ताट करवीलें : **मोकांनंदें** देव्हार चौकीये घेउनि आले : आरोगणा जाली : सारंगपंडीतीं प्रसादु घेतला : उरला तो मोकानंदें घेतला : उमाइसीं ह्मणीतलें : हे काइ मोकानंदा : तुवां प्रसादु घेतला : पंडीतीं घेतला : मजलागि न ठेवीसीचि : ऐसा अपरीतोखु केला : मग गोसावी भोगनाराएणां बीजें केलें ॥ ९ ॥

तथा ज्वर निवृत्ति : ॥ : **वैजाए** राणीयां वैजनाथाचें देउळ करविलें: ब्राह्मणा वृत्ती दीधलीया : सारंग पंडीतातें बोलाऊं धाडीलें : सारंग पंडीत **कटका** गेलें : वृत्ति जाली : काळाक्षेरीं नांव घातलें : शासनीं नांव घालावें तंव ज्वरू आला : तेहीं ह्मणीतलें : देह जाइल तरि गोसावीयापासि जावो ना : ज्वरू येईल तरि तेथाचि जावो : दांडी केली : बाहीरि बाहीरि गोसावीयापासि आले : सोधु : हे काइ : **पांडेया** : ज्वरेसींचि आलेति : मा : ॥ गोसावीयासि दंडवतें घातलीं : श्रीचरणां लागले : जरू आला तें सांघीतलें : हीराइसा पाठ : ॥ : कटका गेले : शासन घातलें : मग आले : न्हाले : जेवीले : मग दरीसना आले : सर्वज्ञें ह्मणीतलें : पांडेया : ज्वरू पूसत असे गा : केव्हळा केव्हळा भोगीन : जी जी : तो गेलाचि : सर्वज्ञें ह्मणीतलें. तो भोगीलेयावीण न वचे : तरि येवों दीजो जी : पैन्हा तन्ही भोगावाचि कीं : तरि सन्नेधानीं भोगुं : बाइसें उपाहारू करीति : गोसावी यांसि पुजा होए : आरोगणा होए : चरणोदक तें उदक : प्रसादु तें पथ्य : अठरा दीस ज्वरू आला : सोध : तेव्हळीसीचि सारंगपंडीता ज्वरू : सर्वज्ञें ह्मणीतलें : आतां कैसें असे : न्हां : जेवों जा : सूखें असा : दीस सतरा जरू : ॥ : जाला : मग जरू गेला : सर्वज्ञें ह्मणीतलें : पांडेया : ज्वरू काइ करीत असे गा : तथा सोधु : आतां कैसें असे गा : जी ज्वरू गेला : न्हा : जेवा : जा सुखें असा : मग गोसावीयातें उपाहारा लागि वीनवीलें : वीळीचा घडीयां चौ : आपणचि बोलवावेया आले : बीजें केलें : मर्दना दीधली : माजणें जालें : पुजा जाली : गुळळा जाला : वीडा वोळावीला : मग बीढारा बीजें केलें : ॥ १० ॥

उपाध्यां भेटि : ॥ : **चांगदेवो** भटीं : उपाध्यातें ह्मणीतलें : **जानो** : **जानो** : आह्मी तुह्मी जैसीया जैसीया पुरुखाचीया गोष्टी करूं का : तैसे पूरूखु प्रतेष्टानीं भोगनाराएणीं असति : तरि तेयाचें मज दरिसन करी कां : हो कां : तरि : तु : कै जासी : ना पाहे : ना पाहेचा दीसू राहे : माझी पासोडी धुतली येइल : मग परवां जाउनि : तें चांगदेव भटीं आइकिलें : पासोडी धुतली आली : रात्रीं दोरा घालितातिं : तवं लाह्ामाइसीं ह्मणीतलें : हारे : बा : एवढ्या वेळा : दोरा घालितासि : तो उदीयां घाली कां : तवं चांगदेवोभटीं ह्मणीतलें : हां वो : हा गेला कीं : जोगीया भवंतियापाठीं : मग उदीयांचि उठीले : वोहणी सीदोरी सुवा : मी गावां जाइन : तव लाह्ामाइसें दुःख करूं लागलीं : आणि सीदोरी नेघतां निगों आदरिलें : मग लाह्ामाइसीं ह्मणीतलें : हारे बा : कै एसी : चांगदेवोभटातें ह्मणीतलें : ऐसे ह्मणां : हा दीसां दो एइल : हां रे : बा : दीसां दो आणिसी : मानिलें : मग : प्रतेष्टानासि आले : गोसावीयांसि उदयेचा पुजावसर : गुंफेसि आसनीं बैसले असति : चांगदेवोभट : उपाध्ये आले. दंडवतें घातलीं : श्रीचरणां लागले : सर्वज्ञें ह्मणीतलें **बटिका** : हा कोणु : जी : जी : हा आमुचा मैत्रु : सोधु : हाही एथीचाचि : हो जी : ॥ : दुपाहाराचा पुजावसर बाईसीं केला : उपाध्यीं बाइसातें फुल मागीतलें : अक्षेता मागितलीया : मग : अपसव्यें करूनि : तीर्थ श्रवण केले : मंत्रु ह्मणौनि पुजा केली : **सहस्त्रशीर्षा** : मग हातीं अक्षेता घेउनि पूढें उभे ठेले : मंत्रु ह्मणीतला : पुजा : दंडवतें घातलीं श्रीचरणा लागलें : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : **जीव जीवा आर्चन घडे** : बाइसीं ह्मणीतलें : बाबा घडवीति तेयासि घडे ॥ ११ ॥

तथा तांबूळग्रहण : ॥ : एकुदिनीं भोगनाराएणीं आसन : श्रीमुखीं तांबोळ होते : तेंहीं गांवां जावेयाचें पूसीलें : बाईसें राहावीतें होतीं : सर्वज्ञें ह्मणीतलें : बटीका : बाइसें ह्मणतें असति : तें कां कीजे ना : ना जी : गावीं अवसरी करीति : वीळचा एकलेयां जावों जाणाल : जी : आह्मीं एथ अखंड यवों जावों : तरि तुह्मी धीरवीर ह्मणा : तथा नरवीर ह्मणा : गोसावी तांबूळ परित्येजीतां : उपाधीं आंजूळि वोडवीली : सर्वज्ञें ह्मणीतलें : बटिका : एथीचेया उसीटेंया तांबूळा हात वोडवीत असा : हें काइ : सोधु : बटीका : एथीचें उसीटें तांबूळ

घेत असा : तें काइ : ॥ : तेहीं ह्मणीतलें : जी : कांहीं जाणिजेना : ऐसें तुम्ही कांहीं जाणिजे नां : तरि कां घेत असा : जी : आपुलेया भलेया : ॥ गांवीं जाल तरि घरिचीं रिगों नेंदीती : जी जी : नेंदीती तरि नेंदीती : आणि काइ : तीवए पाटीं जेऊं सुती : जी जी सुती तरि सूती : आणि काइ : नष्टभ्रष्ट ह्मणती : जी जी : ह्मणती तरि ह्मणती : आणि काइ : वेगळेयां घालीति : जी जी : घालीति तरि घालीति : आणि काइ : ऐसांहीं एथीचें तांबूळ कां घेयावें : जी जी : आपुलेया भलेया : माळ दीधली : सर्वज्ञें ह्मणीतलें : बटीका : तुम्हतें कव्हणीं कांहीं न ह्मणे हो : सोधु : । : लोकु तुमतें नष्टाभ्रष्टां न ह्मणतिल कीं : गोत्रा कुटुंबा वेगळेयां करीति : थाळां वाटिया जेऊं न सुती : पाटीवैयां जेऊं न सुती : धायरी सोएरी तुमतें वर्जीती : ऐसेयां : मग ह्मणीतलें : बटीका तुमतें कव्हणी कांहीं न ह्मणे हो : ॥ ६ ॥ सोधु : बटिका : हें कांहीं : ऐसें कांहीं तवं जाणीजैना : एथिचें उसीटें तांबूळ काइ : ह्मणौनि : घेत असा : जी जी : आपुलेया भलेया : ॥ : मा : तुमतें नष्टभ्रष्ट न ह्मणती कीं : जी जी : ह्मणती तरि ह्मणती : सोयेरीं धायरीं थाळां वाटियां जेऊं न सुती : न सुती तरि सुती : आणि काइ : तुमतें वर्जिती : वर्जीति तरि वर्जीति आणि काइ : तरि कां घेयावें : जी जी : आपुलेया भलेया : सर्वज्ञें ह्मणीतलें : बटीका : तुमतें कव्हणीं कांहीं न ह्मणे हो : मग राहीले : ॥ १२ ॥ :

कास्तां **हरी देओ पंडीतां** : ॥ : चांगदेवीं कास्त हरिदेवो पंडित पुराण गीता आइकति : मग तेथीचे संदेह पडति : ते येउनि : गोसावीयां पुसति : ॥ : उदयाचा पुजावसर : गोसावीयांसि भोगनाराएणीं चौकीं आसन : पासि उपाध्ये असति : तवं हरिदेवो पंडित आले : ह्मणौनि : गोसावी बाहीरि बीजें केलें : पडीसाळे : उपाधी पासोडी बैसों घातली : सर्वज्ञें ह्मणीतलें : बटिका पासोडी मैळेना : ना जी : गोसावी पासोडीएवरि चरणचारीं उभे ठेले : तवं बाइसीं जाडी आणिली : आसन केलें : गोसावी आसनीं बैसलें : हरिदेवो पंडितीं दंडवतें घातलीं : श्रीचरणां लागले : पुढां बैसले : हरिदेवो पंडितीं गीतांचा संदेहो पूसीला : पाठीं गोसावीयांचि प्रश्न केला : **हीराइसा** : ॥ : सर्वज्ञें ह्मणीतलें तुह्मां परिचयो कव्हणीये ठाइं तेंहीं ह्मणीतलें : **गोपाळमंत्रीं परिचयो** : ॥६॥

सर्वज्ञें ह्मणीतलें : गोपाळमंत्रीं भेद कितीएक असति : जी जी : दाहावीस असति : दोनी च्यारि आह्मी जाणों : हीराइसा : ॥ : शतएक बोलीजति : दाहा वीस एक येती : सर्वज्ञें ह्मणीतलें : बोला पां : बोली जो : सर्वज्ञें ह्मणीतलें गोपाळ मंत्रीं सतसहस्र संख्या भेद : ते भेद के आति : एकू भेद तो कव्हणीचि नेणे : रूक्मिणि देवीप्रति श्रीकृष्णचक्रवर्ती नीरूपिला : ह्मणौनि रूक्मीणि देवी जाणे : कां श्रीकृष्णचक्रवर्ति जाणति : आणिक कव्हणिचि नेणति : हरिदेवो पंडितीं ह्मणीतलें : जी जी : हें गोसावीचि जाणावें : गोसावींचि निरूपावें : आह्मीं परिसों नेणों : मा : नीरूपूनि तें काइ : मग **उपाधीयासि** प्रतीति बैसली : द्वापरीचे ते हे गोसावी : ॥ १३ ॥

खळेया अध्यात्म : ॥ : एकुदीसी **महदाइसीं** खळेयाचा अध्यात्मीचा गीतु आइकिला : मग गोसावीयांसि पुढां सांघीतला : यावरि गोसावी गोष्टि सांघीतली : **खळा कुंभारू** : तेणें अध्यात्मु गीतु केला : द्वारावती चांगदेवो राउळापुढें : ह्मणतिलें : मा पुसीले : गीतु कैसा जाला : श्रीचांगदेवो राउळीं ह्मणीतलें : तुझा निर्वशू होए ऐसा जाला : रामेश्वरवास : ॥ : **हे लीळा गणपति मढीं** : ॥ १४ ॥

कवडींबा भेटि अवसरू : ॥: गोसावीयांसि उदयांचा पुजावसर : गोसावी चांगदेवा बीजें केलें : चौकीं आसन : कवडींबासि भेटि जाली : एकें ह्मणती : दक्षिणिले दारवठा : मग : चौकीं आसन : दंडवतें केलीं : श्रीचरणां लागले : बैसलें : मग : सीकारीं गावों आदरिलें : एक ह्मणति : बाळानेयावरूनि आइकिलें : **तुं गोसावी : मी पाइक ॥ तुझा : हरि हरि वाचा उचारण : नयनु निरखुन ध्यान : तुं एकु हरी : इतुलें देइं : आन न मागे : ऐसीं पांचपदें गाइली** : बाइसीं ह्मणीतलें : बाबा : भगतु काइ मागत असे : सर्वज्ञें ह्मणीतलें : **भगतु आणि मागे** : ॥ १५ ॥ :

तथा गाएन श्रवण : ॥ : गोसावीयांसि उदयाचा पुजावसर : गोसावी चांगदेवा बीजें केलें : बाळाणेयावरि आसन : कवडींबाचे सीकार : भित्तरि गात होते : **त्वमेव माता पिता त्वमेव** : या श्लोकावरि हें पदें गाइलीं : बाइसीं

ह्मणीतलें : बाबा : भगतु काइ ह्मणतु असे : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : हा हें शब्दें : ॥ १६ ॥

धानाइसांसीं कव्रडा खेळु : ॥ : एकुदीनी गोसावी सारंगपंडीताचेया घराासि बीजें केलें : आसनीं उपाविष्ट जालें : धानाइसाँ काइसेयाची नेणो आळि घेतली : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : या : हें तुमसीं कव्रडां खेळेल : कव्रडे घेउनि आली : कव्रडे मांडिले : गोसावींहीं आपुले मांडीले : गोसावीयाचे कव्रडे चालति : तेयाचे न चलति : आणि ह्मणति : आपण चालते घेतले ; मज न चलते दीधले : पांलटिति : मागुते मांडिति : गोसावीयांचे चालों लागति : तेयाचे न चलति : मग ह्मणति : मातें हें जिंकताति : ह्मणौनि पुरें केलें : ॥ १७ ॥ :

देवो साकरभातु : ॥ : एकुदीनी गोसावी सारंग पंडीताचेया आवारासि बीजें केलें : मर्दना माजणें जालें : पुजा केली : **उमाइसीं** ताट वाढीलें : **सारंग पंडीतासि** ठावों केला : **मोकानंदु** ताट देव्हारचौकीये घेउनि आले : सारंगपंडीता ठावो मांडीला : उमाइसें पहीत मोकानंद हातीं नेदीतिचि : गोसावी भातावरि साकर घालुनि आरोगीत असति : तवं उमाइसें पहीत घेउनि आली : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : देवो साकरभातु आरोगीतु असे : उमाइसीं ह्मणीतलें : जी जी : मी पहित वाढुं वीसरलियें : पहीत वाढिली : श्रीचरणा लागली : मग गेली : ॥ १८ ॥ :

लखुबाइसां भेटि : ॥ एकुदीनी गोसावीयांसि उदयाचा पुजावसर : भोग-नाराएणीं आसन : लखुबाइसें दरिसना आली : दंडवतें घातलीं : श्रीचरणा लागली : पासि बैसली : नावेक होती : मग गेली : ॥ १९ ॥

देमाइसां भेटि : ॥ : देमाइसें पुराणा जाति : एकुदी पुराणी ऐसें नीगालें : जे गुरूवीण मुचिजेना: तरि कवण गुरू करूं पां : हे **वामदेव** प्रसीध : आइकीजति : हे गुरू करूं आणि काइ : ह्मणौनि : केळें नारीएळें : पानें पोफळें : घेउनि तेया-चिए गुंफेसि गेली : तवं ते नागीवे : काळे : ढेप ऐसें बैसले असति : ऐसें देखौनि आपुला ठाइं विचारिलें : यांजवळि उठों बैसों नये : बोलोंचालों नये : दाउ मिरउं नये : नागीवे केसेन गुरू करूं गे आइ : ह्मणौनि मांगुती निगाली : तव मार्गीं

लखुबाइसें भेटली तेहीं पुसीलें : देमाइसें : कें गेलीं होतीति : ना : **वामदेवांचीए** गुंफेसि : काइ करू : मग देमाइसीं मागील आवघें सांघीतलें : मग लखुबाइसीं ह्मणीतलें : गुरु कराल तरि मीं तुह्मासि दाखवीन : जयाजवळिं बैसों उठों ये : दाउं मीरउं ए : ऐसें गुरु मी दाखवीन : ह्मणौनि भोगनाराएणा घेउनि आली : गोसावीयांसि चौकी आसन : सोधु : भोगनाराएणाचां आंगणीं भेटि जाली : देमाइसीं पानें पोफळें केळें नारिएळें दर्शन केलीं : एकें ह्मणति : नारीएळ पुढां ठेवीलें : दंडवतें घातलीं : श्रीचरणा लागलीं : लखूबाइसें पूढां बैसली : देमाइसें आडवांगीं बैसली : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : गुरूदेवासि पाठी दाखउ नये : ऐसी पासि बैसा : हीराइसा पाठ ॥ : बाइ : पुरूखाचिए भेटि जाइजे : तरि : समूखा बैसीजे : राजागुरूदेवता यांसि पाठि देवों नये : ॥ छ ॥ मग देमाइसें समूख बैसली : पुढां गोसावी अवलोकीली : आणि स्तीति जाली : निगतां सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : एथ येवों आवडे : तेधवां येइजे : । : तथा तेव्हळि येइजे : ॥ २० ॥

अवधुता तांबुळ : एकुदीनी उदयाचा पुजावसर जाला : गोसावी **चांगदेवा** बीजें केलें : माडी पूर्वीलें **बाळाणां** : पसीमा अभीमूखु : अवधूत एकु बैसला होता : गोसावीयांसि उजवेयाकडे आसन : मग सर्वज्ञें ह्मणीतलें : बापेया : सोध : ॥ : येसणें जन्म : ॥ ऐसें जन्म कोणां दादुलेया कारणें क्षेपीजत असीजे : ॥ हीराइसा पाठ ॥ : पुरूखाकारणें ॥ बोलेचिना : ना : पाहेचिना : डावेनि श्रीकरें हनुवटी धरीली : उजवेन श्रीकरें मुखीं फोडी घातलीया : वीडीया करूनि तोंडीं सूदलीया : तांबूळ घेतलें : मग गोसावी बीजें केलें : ॥ २१ ॥

पेखणिकां अवलोकणें: एकुदीनी उदयाचा पुजावसर: गोसावी **चांगदेवा** बीजें केलें : उतरिलें बाळाणां : दखीणाभिमुख आसन : तवं चांगदेवा पेखणाइतें पेखणें करावीया आलीं : नाचणी तेथ कास घालावेया आली : तवं गोसावीयांतें देखीलें : एकें ह्मणति : देउळामागें नृत्य (नैऋत्य) कोणीं : आसन : तवं गोसावीयांतें देखीलें : ते गोसावीयांतें पाहातचि राहीली : मग : येरू ये : येरु ये : ऐसीं अवघींचि आलीं : सर्वज्ञें ह्मणीतलें : हें तेथचि येइल : सोधु : तथा हेचि तेथ येइल : हीराइसा पाठ : ॥ : तेथचि जा : मा : हे तेथचि येइल : ॥ छ ॥

देउळां गेली : मग गोसावी तेथचि बीजें केलें : चौकीं आसन : तेंहीं पेखणें मांडीलें : पेखणें आइकों आदरिलें : **मादळीत: काहाळिया: वसकरू: चाकीकरू: आळतीकरू** : जें जेयाचें अंग ये: तें तो दाखवी: तेया अंगा गोसावी तोखति : तेणें तेया सूख होए : पेखणें करूं सरलें : मग गोसावी तेयांसि तांबुळ दीधलें : पुड वाटुवा रिचवीला : मग : तें निगालीं : पैल ठावों वेन्हीं गेलीं : आणि माग़ुतीं आलीं : मग तोखली : जी जी : इतुलें दीस कळा पोरटीया जालिया : होतिया : आजी सकळाचें माहेर भेटलें : मग : निगाली : गोसावी बीजें केलें : दखीणिलेया दारवंठेया पासि : तेया : गोसावीयांतें : पालवीं धरीलें : जी जी : माझेया बीढारासि बीजें करावें जी : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : हें एकीं आवांतिलें असे : हीराईसा पाठ : ॥ : निमंत्रीलें असे : ॥ छ ॥ मग ते उगीचि राहीली : मग बीजें केलें : ॥ २२ ॥

धानाइ सळदी लपवणें : ॥ : एकुदीनीं गोसावी **सारंगपंडीताचेया** आवारासि बीजें केलें: **उभाइसें** लेकरूं घेउनि बैसली असति: गोसावीयांतें देखीलें आणि लाजीली : पुढां **सलदु** होता तेथ धानाइसें घातली : वरि लुगडें घातलें : गोसावी लुगडें हालत देखीलें : मग पुसिलें : बाइ : हें काइ हालत असें : जी जी : हें लेंकरू : कडीये : घिया : याचिया अमृतकळा सोकति : मग : काढीलें ॥ २३ ॥

तथा शृंघारू पुसणें : ॥ **धानाइसें** वडिलें जालीं : मग : उटिति : न्हाणिति : लेववीति : नेसवीति : मग : पुसति : धाइ : हा शृंघार कव्हणालागौनि : ना : हा श्री चांगदेवोराउळा : गोसावीयांलागौनि : गोसावी आसनीं बैसौनि पाहातें असति ॥ २४ ॥

तथा आख्याइका श्रवण : गोसावी एकुदा सारंगपंडीताचेया आवारा बीजें केलें : सारंगपंडीत मर्दना देत असति : तवं धानाइ : गोसावीयाची श्रीमूर्ति गौरवर्ण देखीली मग ह्मणति : गोसावीयाची श्रीमूर्ति हळदी उटीली ह्मणौनि गौर जाली : तर ते हळदी माझां आंगीं लावी कीं : ह्मणौनि आळि घेतली : कांहीं केलियां सवरति ना : मग : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : तथा धाइया : हें तुह्मां

काहाणी सांघैल : आलीं : पासि बैसली : **साळैचें घर मेणाचें : काउळेयाचें घर सेणाचें पाउसाळां काउळयाचें घर पुरें जाए : साळैचें उाचे : मग उगीचि राहीली** : ॥ २५ ॥ :

चांगदेवोभटाची वीनती स्वीकारू : ॥ : एकुदिनी सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : हें **परमेश्वरपुरासि** जाइलः आइत कराः तेथ **चांगदेवो भट** आलेः मग **बाईसातें** ह्मणीतलें बाइः गोसावी परमेश्वरपुरा बीजें करीत असति : तरि मज आपुलेया सांगातें येवों देति : ऐसें पुसा कां : बाइसीं वीनवीलें : बाबा : चांगो ह्मणत असे : गोसावी परमेश्वरपुरा । बीजें करीत असति : तरि : आपणेयां सांघातें मज येवों देति : ऐसें पुसाकां : बाइसीं वीनवीलें : बाबा : चांगो ह्मणत असे : गोसावी परमेश्वरपुरां बीजें करीत असति : तरि आपणयां सांघातें मज येवों देति : ॥ : सर्वज्ञें ह्मणीतलें : ऐसें हा **बटिका** : जीः सर्वज्ञें ह्म० तुह्मां गावां जावें असें : गावां जाः सण सारूनि या : मग गावां जावों : (हीराइसा पाठ) हा बटिका परमेश्वरपुरा येता : कां : वारिजैल : गावां जा : पुसा : मग : या : ऐसेचि **उपाधी** चांगदेवोभटाकरवि पुसवीलें : सर्वज्ञें ह्मणीतलें : यासि आळें नित्रणें असे हा ॥ छ ॥ मग चांगदेवोभट गावां गेले : सणु सारुनि आलें : बाइसीं आइत केली मग बाइसें हंसराजू चांगदेवोभट सरिसे निगाले : मग गोसावी परमेश्वरपुरा बीजें केलें ॥ २६ ॥ ⊙ ॥ ⊙ ॥

राहाटगावीं वसति ॥ १ ॥ **कडेठाणी** माहालक्ष्मीये वसति ॥ २ ॥ **भीवां डांउवाचां राजौरा** वसति ॥ ३ ॥ **सेंदुर्जनीं** गावां इशान्ये पींपळातळिं गोसावीया आसन : ॥ : नागझरीए ब्राह्मणु येकू संध्यावंदना गेला होता : तेणें येतां गोसावीयांतें देखीलें : दंडवतें घातलीं श्रीचरणां लागले : मग पुढां बैसला : आणि स्तीति भोगु सरली : सोधु : सर्वज्ञें ह्मणीतलें : भटो : घरा जाना : मग वीनवीलें : मग आरोगणे गोसावीयांतें वीनवीलें : मग गोसावी तेयाचेया घरा बीजें केलें : मर्दना दीधली : भक्तजनें पुजा केली : भक्तजनासहित आरोगणा : पहुड : उपहुड : विळीचां पुजावसरू जाला : मग : उदीयांचि **मेघंकरा** बीजें केलें ॥ छ ॥

बाणेश्वरा बीजें केलें : गोसावीयासि आसन : बाईसीं : चरणक्षाळण केलें : पहुड : उपहुड : आरोगण : गुळळा वीडा : मागौता पहुड जाला : पुढील गांव धाकुटें ह्मणौनि बाइसें वेसजू वेसरू वेयात्रिया गेलीं : बाइसातें देखौनि वाणियें ह्मणीतलें : आइ : या : उठौनि बैसों घातलें : बाइसें बैसली : मग : ह्मणीतलें : कांहीं वेचु दीया : तेणें ह्मणीतलें : आइ नात्रेक राहा : ॥ : या ग्राहीकातें पाठवीन मग तुह्मी मागाल तें देइन : तेया थोर वीकरा जाला : तवं बाइसें बैसलींचि होतीं : तेणें ग्राहीकातें पाठवीलें : मग : पुसीलें काइ काइ : देवों : बाइसीं ह्मणीतलें : कणिक तांदुळ : तुप : हींगु : मीरियें : जीरें : साकर : ऐसा : सोधु : **आठा दामाचा वेचु** होए ॥ हीराइसा पाठ ॥**सोळा** ॥ छ ॥ देवों बैसलीं : तवं तेणें ह्मणीतलें : आइ इतुकें माझें आपुलिया तुह्मी उपयोगा नयावें : एकें ह्मणति : आणिकु सोळा दाम दीधलें : मग बीढार पावति : तंव बोळवीत आला : (हीराइसा पाठ) : गोसावी पूसिलें : बाइ : उसिरू कां लावीला ; बाइसीं मागील वृतांतु सांघीतलें : ॥ छ ॥ बाइसीं तेयाचा आदरू सांघीतला : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : तुह्मां इतुकेंचि बहुत : तुह्मीं गेलीयां : तुमचां ठाइं : तेयाचें इतुकेंचि काइ बहुत ॥ मग वसति जाली ॥ १-२-३ ॥ :

वीषये वसति : देवीं कमळीं पुजा ॥ वीषयेसि देउळां गोसावी बीजें केलें : देउळ पाहीलें : बाइसें तेथ उपहारू करावेया राहीली : गोसावी वीहरणा बीजें केलें : मार्गी दुसरें तळें : तेयाचिए पाळीं चिंचे खालीं आसन : (हीराइसा पाठ) पींपळ ॥ छ ॥ गोसावी परमेश्वरपुरा बीजें बीजें करीत असति : ऐसें **दादोसीं** आइकीलें : गोसावीया लागौनि कांहीं वाटेंचें **संबळ** मेळउनि टाकूनि घेउनि आलें : ताळियाचिए पाळीं **देवा** भेटी जाली : देवीं दंडवतें घातलीं : श्रीचरणां लागलें : वेचु आणिला : तो पुढां ठेवीला : तळांचीं कमळें काढीलीं : गोसावीयांसि लोहीवां कमळीं पुजा केली : देवी कमळाची पाकोळी तोडीली : गोसावीयाचां श्रीकरीं दीधली : जी जी : कोळ पुरूखु उद्धारुनि दाखवावा : सर्वज्ञें ह्मणीतलें : **ऐथौनि देवताचक्र निरूपितां** ॥ १ ॥ सर्वज्ञें ह्मणीतलें : देसकाळीचे आचार्ये इतुलेया ऐसेया माझारि सारिति : तथा दाखवीति : । : परशरामबास : ॥ : सोधु : । : आतांचें : सोधु : देश-

काळीचे आचार्ये इतुलेया एकामध्यें ऐसे करीति : सारीति : हे दुसरी वासना : ॥ सोधु : संकलीति : संकलौनि देति : सारिति : ऐसे तिन शब्द : ॥ ४–५–६ ॥ **आलेगावीं** गोपाळीं वसति ॥ ७ ॥ **पातौरी** वसति : ॥ ८ ॥ **टाकळीए** वसति ॥ ९ ॥ **लाखेपुरीए** लक्षणेश्वरी वसति ॥ १० ॥

कोडेश्वरीं घाटेया हरीभटा : ॥ : कोडेश्वरीं गोसावीयांसि चौकी आसन **घाटे हरीभट** देउळाचेया गाभारेया आंतु जपत होते : एकें ह्मणति : गंगे कडौनि आले : हातीं तांब्रटी : तांब्रुत्रटीये उदक : तुळसी : गोसावीयांतें देखीलें : श्रीचरणावरि उदक घातलें : तुळसी वाइलिया : दंडवतें घातलीं : श्रीचरणा लागले : पासि बैसले : आणि स्तीति जाली : भोगीली : भंगीली : मग गोसावी-यांसि घरा जेवावेया वीनवीलें : सर्वज्ञें ह्मणीतलें : पैले देउळीए बटिकू असे : तो बोलावा : गेले तवं तेयाचें आसन अंतरक्ष उपवत असे : वरि कळसीं लागत असे : आले जी : ते देउळाचेनि कळसें कळसें जात असति मागौतें धाडिले : जा : एथौनि बोलावीला अससि ऐसें ह्मणां : गेले : ह्मणीतलें : तुमतें गोसावी बोलावीत असति : आणि स्तीति भंगली : आले : मग गोसावी तेयाचेया घरां बीजें केलें : पुजा केली : आरोगणा जाली : त्रिळित्राचा वसती जाली : भोगीली भंगीली : (हीराइसा पाठ) मर्दना मादनें जालें : भक्तजना सहीत आरोगणा जाली : ॥ ११ ॥ :

बाइसें रीधपुरा पाठवणें : ॥ : **पद्मेश्वरीं** अवस्थान : दीससात : च्यारि जाले : यरी दीसीं गोसावी बाइसातें ह्मणीतलें : तुह्मी पुढां जा : श्रीप्रभुचिया दरीसना : **वाकिये** वस्त्रें घेया : हें मागिला कडौनि येइल : (हीराइसा पाठ) : बाइ : आजी वाकीयेचा हाटु : श्रीप्रभुलागि वस्त्र घेया : तुह्मी हंसराजु पुढां जा : ॥ छ ॥ बाइसें हंसराजु पुढां निगाली : वांकीये वस्त्र घेतलें : मग रिधपुरा गेली ॥ १२ ॥

खडखांबुली खेळु : ॥ : निच (नित्य) चांगदेवो भट भिक्षा करूनि येति : झोळि दृष्टपूत करीति : मग जेवीति : ते दीसीं चांगदेवो भट भिक्षा करूनि आले : झोळी काठीए घालीति : काठी टेकौनि ठेवीली : आणि स्तीति जाली : ॥ च्यारी पाहार चौ खांबा भंवंते भवत होते : पडिसाळेचिया ऐसी

अस्तीति भोगित होते : उदीयाचि गोसावी परिश्रया बीजें केलें : गोसावी खड-खांबुलां खेळों आदरीलें (हीराइसा पाठ) सर्वज्ञें ह्मणीतलें : बटिका : काइ गा खडखांबुलां खेळतु असा : आणि स्तीति भंगली : ॥ छ ॥ गोसावीयांतें देखीलें : आणि स्तीति भंगली : आले : दंडवतें घातलीं : श्रीचरणा लागले : आसन केलें : गोसावी आसनावरि बैसले : मग पुसिलें : बटिका : जेवीलेति : ना जी : गोसावीयांसि झोळी दृष्टपुत करावी होती : (हीराइसा पाठ) : आणा पा आरुती : गोसावी झोळी आणविली : अवलोकीली : [हीराइसा पाठ] बटिका रुक्ष असे : ॥ छ ॥ तवं साधन कांहीं नाहीं : सर्वज्ञें ह्मणीतलें : बटिका : हे काइ : साधन कांहीं नाहीं : तरि एथ सांघाचि ना : एथ ह्मणीतलें : हो बटिका : बटिका : साधन कांहीं आपजविजे : भिक्षा करीतां : (हीराइसा पाठ) : बटिका या : ह्मणौनि सेवटिले घरीं एकाधा एकू ठावो आपजवीजे : हो बटिका : जेवा जा : पाणि नाहीं जी : सर्वज्ञें ह्मणीतलें : बटिका : **तुह्मी महात्मे किं गा : एके गांवीं जेवीजे : एके गांवीं आचवीजे** : एकें ह्मणति : **ए थडीए जेवीजे : पैले थडीए आचवीजे** ॥ छ ॥ मग प्रतदीनीं हरिभटाचां घरीं पुजा आरोगण होए : सोधु : एकि वासना : वीळिचा चांगदेवो भट : तेयाचां घरींहुनि दुधभातु आणिति : मग गोसावीयांसि व्याळी होए : एकी वासना : ॥ वीळीचां चांगदेवो भट भिक्षा करिति : मग गोसावीयांसि व्याळी होए : सर्वज्ञें भणीतलें : बटिका : हें काइ : आपजेवणेयाचे शब्द : ॥ १३ ॥

चांगदेवो भटां जाडी : ॥ : गोसावी तेथौनि बीजें केलें : मार्गीं गोसावीयांसि वसति होए : आपणेयां सेवें चांगदेवोभटातें निजवीति : रात्रीं गोसावीयांसि पावो लागैल : ह्मणौनि : परते सरति : गोसावी ह्मणति **बटिका** : आरुतें ठाका : सोध : बटिका आरुतें सरा : मग जाडीचा पलौ पांगुरवीति : रामेश्वरबास : हे लीळा टाकळीएचां मार्गीं : ॥ १ ॥ : तथा **जाडि** परित्यजणें : ॥ : स्याळीयां दीसां : उदीयांचि गोसावी बीजें करीति : मग जाडीचें **कोंगटें** (घोंगटें) घालीति : सीं फीटे : आणि : श्रीमुगुटेचि जाडी उभेया राहुनि खाली धालिति : चांगदेवोभट जाडी घेति : हीराइसा पाठ : गोसावी ह्मणति बटिका जाडि घेया :

---

१ रिधपूर

मग : घेति : २ : चांगदेवोभटां खेळो : ॥ : गोसावी उदेयाचां पाहारू एकु चालती : मग : वस्तींचां गांवीं राहाति : गोसावीयांसि वीहरणा बीजें होए : चांगदेवो भटातें ह्मणति : बटिका : खेळों जा : ॥ ३ ॥ : **वांकीये पांडेश्वरीं** वसति : ॥ ४ ॥ : तुंगावीं उर्वेश्वरीं वसति : ॥ ५ ॥ **तळवेलीं** लींगाचां देउळी वसति : ॥ ६ ॥ : **खेराळा** उपानहौ फेडीलीया : सर्वज्ञें ह्मणीतलें : बटीका : हें घेया : **परमेश्वरपूर** : करा नमस्कारू : आपण दोहीं श्रीकरीं नमस्करीलें : आणि : चांगदेवो भटीं **जय केलें** : सर्वज्ञें ह्मणीतलें : बटीका : एथौनि जैसें कीजैल : तैसें तुह्मी कराल : हें परमेश्वरपूर : केसणें : एथ श्रीप्रभू[2] राज्य करीत असति : घाला घाला : दंडवतें मग तेहीं दंडवतें : घातलीं : ॥ : मग श्रीप्रभू महीमा नीरूपीत नीरूपीत बीजें केलें **हीराइसा** : बटिका : हें देखिलें परमेश्वरपुर : शाळेचां कळसु दीसतु असे : ह्मणौनि : जय तेही जय केलें : एथौनि : श्रीप्रभुचीं महीमा : ऐसें : गा : ते श्रीप्रभु : ऐसें नीरूपण करीत : ॥ : मग **माल्हणदेवीं** पासी उभें राहीले : तवं तेथ श्रीप्रभु बीजें करींत होते : सर्वज्ञें ह्मणीतलें : बटिका आतांचि श्रीप्रभु आले होते : आतांचि नीगाले : यें नव्हति पाउलें : **मार्गरूढी** आसन : गुळळा वीडा : ॥ ७ ॥ :

श्रीप्रभु भेटि : ॥ : श्रीप्रभु **आळंदीया** माजि खेळ करिताति : बाइसें साउमी येउनि वाट पाहातें होतीं : बाइसीं देखीलें : आणि साउमीं येतें होतीं : तवं बाइसातें श्रीकरें वारीलें : हीराइसा : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : श्रीप्रभु कव्हणीकडे खेळु करीत असति : बाबा : हे नव्हति : बाबा : आळंदीयापासि खेळ करीत असति : दोही देवां दर्सन जालें : गोसावी पुष्टीचेयाकडे खेंव दीधलें : श्रीप्रभुसि न मनेचि : सोधु : इ काइ रे : गोसावी सोडीलें : मग श्रीचरणीचे रज : श्रीमुकुटावरि घातलें : हीराइसा : मेला जाए : आरे सोडि सोडि : ह्मणौनि : कोप नटलें : मग सोडीलें : श्रीचरणीचें रज : ॥ : मग भुइचें इटाळ घेउनि कोपें भूमीसी आफळिलें : ॥ छ ॥ : मग नगरामध्यें बीजें केलें : ॥ छ ॥१–२॥ :

मठीं रोटी आरोगण : पुढां श्रीप्रभु : मागां आपुचे गोसावी : तेया मागें **बाइसें : हंसराजु** : गोसावी श्रीमूर्ति आछादुनि मठां उतरिले : गोदरीया बीजें

---

२ गोविंदप्रभु.

केलें : श्रीप्रभु दारवटां बाहिरिल विनायेकेंसीं नावेक खेळु केला : मग भीतरि बीजें केलें : गोसावीहीं भीतरि बीजें केलें : खोलंबुथि घालुनि : रामेश्वरबास : दखीणिला कवाडा आड : उभे राहीले : परशरामबास गरूडाळेयेचया : खातेनसीं उभें राहीले: उचमढीं चाटे होते : तेहीं श्रीप्रभुतें पुसिलें : राउळो जेवाल : जेवावें ह्मणे : मेला जाए : जेवावे ह्मणे मग तेल रोटी आणिली : **त्रीपुरुखाचेया** मढां उत्तरे : उच मढां पूर्वे : निंब : पसिमे उखळी होती : तेथ तेहीं तेल घातलें : रोटी घातली : श्रीप्रभु चावीतुचि करीति : ऐसें आरोगिताति : ते लिळा आमचे गोसावी अवलोकिताति : मग: चावितुचि करूनि : श्रीप्रभु उचमढू सव्यें घालुनि : बीजें केलें : मग आमचे गोसावी तेथ आले : उकड : आसन असे : श्रीप्रभुचां प्रसाद घेत असति : तवं चाटां सोसावीयांतें देखीलें मग वाटी तुपाचा नळा आणिला : वाटिये तुप घातलें : रोटीचा मो ऐसें घेउनि आले : मग ह्मणीतलें : स्वीकरीजो जी : गोसावी ह्मणीतलें यासि श्रीप्रभु अयोग्य: मग : हें योग्य : परशरामबास : या श्रीप्रभु योग्य नव्हे : होए : या योग्य हें होए : असों दीया : तवं श्रीप्रभु बीजें केलें : इश्वरीये (ऐश्वर्य) प्रकाशीलें : ह्मणौनि . चाटेयाची मोगरी सुत बडवीती होती ते श्रीकरी घेउनि गोसावीयाचीया पुष्टिवीभागावरि : बूदबुद करीति : तिन घाये दीधले : आणि : बाइसें बोबाइली : वडिलें बाबेनि धाकुटा बाबा मारिला : सोधु : बाइ : उगी असा : हीराइसा पाठ : हे श्रीप्रभुची प्रवृती : ॥ छ ॥ : सर्वज्ञें ह्मणीतलें : श्रीकरू दुखविती जी : पुरों दीजो जी : तथा पुरविजो जी : हीराइसा पाठ : आणि : श्रीप्रभु मोगरी सांडीली : मेला जाए ह्मणे : ह्मणौनि हास्य केलें : रामदेवमुनि : येया आतां माझा होए : मारूं दीधले ह्मणे : मग **भैरवा** बीजें केलें : श्रीप्रभु : ते : **तिकोपाध्याचिए** नृत्यकोन वे-हीं बोळवीलें : श्रीप्रभु : आवारां बीजें केलें : गोसावी भैरवी बीजें केलें : अवस्थान दीस वीस : ॥२॥ श्रीप्रभुपूजा : मग **बाइसीं श्रीप्रभुसि** आसन केलें: पुजा केली: धुपार्ति मंगळार्ति जाली: आरोगण: गुळळा : वीडा जाला : मग पहुड : मग गोसावीयांसी जवं तेथ अवस्थान होतें तवं श्रीप्रभुचांचि ठाइं पुजा करिति : गोसवीयासि नाहीं : गोसावीया उपहुड अवलोकावया बीजें करीति : ॥ ३ ॥ :

श्रीप्रभुवस्त्रपूजा : ॥ : गोसावी श्रीप्रभुपुजा दोनी केलिया : बाइसातें ह्मणीतलें : बाइ : वस्त्र आणा आरूते : निरीया केलिया : दर्शन केलें : स्वीक-

रीजो जी : श्रीप्रभु नीराकरीलें : हीराईसापाठ : आरे नको नको : ह्मणौनि थोरें श्रांतें निराकरिलें : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : ठेवा : ॥ ६ ॥ : दिस दोनी तिन वोळगवीलें : तेंहीं निराकरीलें : आणिक एकू दीसी : श्रीप्रभु मादनें जालें : पूर्वामुख चौकी : दखीणीलीये पटिसाळेवरि : बाइसीं आसन रचीलें : पुजा केली : तवं आमचे गोसावी उतरिलें पटिसाळेचेनि सेहाडेनसीं उभें : मग पटिसाळे आड : दखीणीली पटिसाळेसी दखीणामुख उभें : मग वस्त्रें वोळगवितां : दखीणीले पटिसाळेवरि गुडगे मोडुनि : पसीमामुख आसन : अंगिकारूं आदरिलें : श्रीप्रभु हीराईपाठ : आरे नको नको : ह्मणौनि : सामान्य निराकरीलें : सर्वज्ञें ह्मणीतलें : स्वीकरीजो जी : अंगीकरिलें : ॥ छ ॥ गोसावी नीरीया करूनि श्रीप्रभुसि प्रदान केलें : नेसले होते तें घेउनि बाइसा हातीं दीधलें : बाइसीं झाडिलें : सर्वज्ञें ह्मणीतलें : हें काइ बाइ : श्रीप्रभुचें वस्त्र कैसें झाडितें असा : बाबा : रजें भरलें असे : बाइ : श्रीप्रभुचें वस्त्र : आणिक : रज : ऐसें ह्मणत असा : हें रज कैसें : हें ब्रह्मादीकां दुर्लभ कीं : ॥४॥ :

सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : श्रीप्रभुचां ठाइं आन आन करा : श्रीप्रभु माखान्न प्रीये : मग बाइसें प्रतदीनीं वडे करीति : श्रीप्रभु आरोगणे देति : देंति : तेंचि ताटीं गोसावीयांसि आणिति : मग गोंसावीया आरोगण होए : सोध : वस्त्रपुजा करितां : हें काइ बाइ : हें काइ जालें : काइ करितें असा : ॥ ५ ॥ :

भैरवी श्रीप्रभुक्रीडा : ॥ : एकु दीस श्रीप्रभु खेळत खेळत : बारवेहुनि बहीरवासि बीजें केलें : केशवीचेया प्रतीमासिं खेळखेळत तेयाचेया नाकावरि आंगुळी टेविति : कानावरि ठेवीति : डोळेयावरि ठेवीति : तेवींचि ह्मणाति : हा कानु : हा नाकु : हा डोळा : हा निडळ : आणि ह्मणति : तुं देओ : मेला जाए : नव्हेसि : हा नव्हे देओ : ऐसें करीत करीत भैरवांसि बीजें केलें : मागीलाकडे बहीरवो : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : नावेक परती जा : श्रीप्रभु येत असती : बाइसें बाहीरि नीगाली : नेत्र झाकौनि उगांचि होती : खेळु न भंगावा :॥: श्रीप्रभु भीतरि आले : तेयांचि प्रयोक्ति भैरवेसीं खेळु केला : मग गोसावीया पासी आले : गोसावी निश्चळ बैसले असति : हा कानु : हा नाकु : हा डोळा : हा निडळ : ह्मणौनि : माळ स्थळावरि बोट ठेवीलें : हा वो : देवो तुं : हीराईसा

पाठ : आवो : तुं देवो ह्मणे : नव्हे ह्मणे : हा देवो होय ह्मणे : ऐसा देवें देवो प्रकाशिला : ॥ ६ ॥ :

मग **हंसाराजु** श्रीप्रभुचीए सेवे राहावीली : वेचावेया दामु सोळा दीधले : सोधु : बाइ : श्रीप्रभुचां ठाइं आन आन अन्न करा : श्रीप्रभु माखान्न प्रीये : मग बीजें केलें : ॥७॥ :

वेलोरा संकनाथी संगमेश्वरीं वसति : हें परशरामबास : भिवेश्वरीं हें रामेश्वरबास : ॥ १ ॥ **सीराळां नागनाथीं** वसति ॥ २ ॥ **आसटीये** माहालक्षमींये वसति : ॥ ३ ॥ : आसुटीये बीजें केलें : माहालक्षमीचां देउळीं राहिले : बाइसा जवळि तिन रुवे उरले होते : ते मागांचि सरले : बाइसीं ह्मणीतलें : बाबा वेचावेया कांहीं नाहीं : सर्वज्ञें ह्मणीतलें : पोफळफोडना गाहाण ठेवा : बाइसीं ह्मणीतलें : बाबा : पोफळफोडना गाहाण ठेवीजैल : मां : बाबासि : काइ मागुतें एक एणें असे : बाइ : एथ प्रवृत्ती असे : तरि : हे देवतें देखिलीं : इये खालि एके दाडेनि सात लोही : द्रव्या भरलीया असति : हीराइसा पाठ : अलुमाळ माती परती कीजैल : आणि दीसती : एथ प्रवृत्ती नाहीं : ॥ ४ ॥ :

मग **चांगदेवो भट** गेले : पोफळफोडना गाहाणु ठेविला : आठा दामाचा वेचु आणिला : गोसावीयांसि पूजावस्वर : आरोगण : गुळळा : वीडा : पहुड : उपहुड : जाला : गोसावी आसनीं बैसले असति : तवं तो वाणिया आला : गोसावीयांतें देखीलें : मग चांगदेवो भटातें पुसिलें : पोफळफोडना गाहाण ठेविला : तो या गोसावीयाचा ना हो : पीसवीचे सोळा दाम काढिले : गोसावीयां पूढें ठेवीलें : श्रीचरणा लागला : मग चांगदेवो भटातें ह्मणीतलें : भटो या : आपुला पोफळफोडना घेउनि या : गेलें : घेउनि आले : मग : गोसावी तेथौनि बीजें केलें : सोध : तैसें तैसें होइल : मग : हें काइ बाबा : ॥ ५ ॥ :

वाठवडा वसति : ॥ वासना :॥६॥: **मांगरूळीं वऱ्हाडदेवी** आसन : बाइसीं चरण क्षाळण केलें : गोसावी चांगदेवो भटातें ह्मणीतलें : **बटिका** : खेळों जा : बाइसीं ह्मणीतलें : बटिका : तेवींचि बाबाचीं वस्त्रें ने : सोध : घेउनि गेले : एक ह्मणति : बाहिरवास तेहींचीं नेला : नदी धुतला : बाळीं घातला : मग पायावरि

बोलसरें वाळुवेचें देउळ करिति : तेवींचि दोही देवाचें नाम लवलवां आठवीति : ह्मणति : हे गुंफा **श्रीगुंडम राउळा :** गोसावीयांची हे गुंफा **चांगदेवो राउळा** गोसावीयाची : तेवींचि दोही देवाचें नाम वेगळाले उचारीति : मग वाहें वाहें ह्मणति : ह्मणति : एऱ्हीं एऱ्हीं : **गोसावीयांचे चरणशरण :** ऐसा खेळु खेळत असति : तवं बाइसीं : उपाहारू नीफजवीला : गोसावीयांसि उदयाचां पूजावस्वर : आरोगण : गुळळा : वीडा : मागुता पहुड : उपहुड : मग तेथ बीजें केलें : तवं ते खेळत असति गोसावी जाउनि मागें उभे ठेले : आणि तेयावरि साइली पडली : मागुतें पाहीलें : तवं गोसावीयातें देखीले : सर्वज्ञें ह्मणीतलें : बटिका : खेळतु असा : आणि : श्रीप्रभुचें स्मरण करित असा : **ऐसें होए** : ऐसें ह्मणिजे हो : ॥ हीराइसा पाठ : बटिका : काइ खेळत असा : श्रीप्रभुतें आठवीत असा : तेवींचि याते आठवीत असा : ऐसे होए : ॥ १ ॥ :

सेंदुर्जनीं ब्राह्मण अभ्यासु कथन : ॥ : गोसावी सेंदुर्जनासि बीजें केलें : गावां उत्तरे वावरा मध्यें वडाखालि गोसावीयासि आसन : ब्राह्मणु पींपळाखालि : स्तिति भोगीत बैसला असे : बाइसीं ह्मणीतलें : बाबा : हा तो ब्राह्मणु नव्हे : सर्वज्ञें ह्मणीतलें : होए : बाबा या काइ जालें : बाबातें देखे परि जवळा नये : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : यातें हा तेथचि देखत असे : बाबा बोलाउं : बोलावा : **बाइसें** गेलीं : भटो तुमतें बाबा बोलावीत असति : तेही ह्मणीतलें : बाइ हे नव्हति : गोसावी एथचि असति : बाइसें मागुती आलीं : बाबा ब्राह्मणु नये : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : खांद चुरा : गेलीं : खांद चुरीले : आणि स्तिति भंगली : हीराइसा पाठ : बाइसीं हनुवटीये धरूनि ऐसें गोसावीयाकडे तोंड करूनि दाखाविलें : भटो हे नव्हति : बाबा पैऱ्हां असति : आणि : स्तिति भंगली : ॥ छ ॥ गोसवींयांतें देखीलें : उठीले : आले : दंडवतें घातलीं : श्रीचरणा लागले : मग गोसावीयांतें वीनवीलें : गोसावीं तेयाचेया घरा बीजें केलें : मर्दना जाली : भक्तजनीं पूजा : आरोगण : गुळळा : वीडा : पहुड : उपहुड : वसति जाली : मग उदायांचि गोसावी बीजें केले : ॥ ६ ॥ :

डोडवीहीरा राघवदेवां भेटी : ॥ : गोसावी डोड वीहिरियासी बीजे करीत असति : ऐसे राघवदेवीं आईकीलें : मग : सडे संमार्जन : गुढीया उभि-

लीया : मखर मांडाळि करूनि **भागवत** मेळविले : गात : वात : नाचत : मोहो उच्छायासीं साउमे आले : पूर्वी **भोग नारायणी** राघव देवां भेटि जाली होती : गोसावीयांसि भेटले : दंडवतें घातलीं : श्रीचरणा लागले : मग ह्मणीतलें : हें काइ जी : अपत्यातें कहीं सांभाळिजे ना : पडिताळिजे ना : निकें केलें : गोमट देव हो : बरवें केलें : गोमट देव हो : अपूलिया अपत्यातें पडीताळीलें : ह्मणौनि : गात नाचति : हरिखेंजति : खेदखीन्न होत : श्रीचरणा **मोमे** देति : ऐसोंचि गात वात नाचत आपुलिया घरा घेउनि आले : लोकु पुसे : राघवदेव हो : हे कवण : ते गात वात नाचत चालतचि असति : तेंवींचि ह्मणति : हे गोमट देव : बाबा : गोमट देव : ऐसेया परीं : गोसावी तेयाचेया घरासि बीजें केलें : आसन : पूजा : आरोगणा : भक्तजनासहित पहुड : तेथचि वसति जाली : दुसरीये दीसी गोसावींयतें राहावीत होते : न न्हातीचि : हीराइसा पाठ : बाइसीं पुसीलें : हें कवण बाइ : हे **दुंडी राउळाचे अनुग्रहीत** : ॥७॥ :

फुलंबरीये मढीं वसति : ॥ ८ ॥ : गवाणा **वनदेवीं** वसति : ॥ ९ ॥ :

यळापुरीं राजवीहारीं अवस्थान : ॥ : गोसावी यळापुरा बीजें केलें : राजवीहारीं दीस तिन अवस्थान : माचेयावरि आसन : चरण क्षाळण : पहुड होय : पुजा : आरोगणा : मागुता : पहुड : ऐसे तिन्हीं अवसर माचेयावरि होति : एकें ह्मणति : तियची वोवरा आरोगण होए : चांगदेवो भट **हाटवेचुं** आणुं जाति : रात्रीं बाइसें भीति : वसो डरे : ऐसे शब्द आइकति : मग बाइसीं ह्मणीतलें : बाबा : घोर शब्द आइकीजत असीजेति : वसो डरेताति : भालुवा भुकत्ताति : बाइला लेकुरूवांसि परियें देताति : एका एका गोष्टी सांघतें असति : ऐसे नाना शब्दीं मज नीद्रा नये : भिति असे : बाबा : चांगदेवो भटीं ह्मणीतलें : हो बाइ : भीति असीजे : हीराईपाठ : बाइ भीति असा : हो बाबा : ॥ छ ॥ : मग गोसावी बीजें केलें : अवघी देउळें पाहीलीं : मग वीळिचां **चतुर्विधाचेया** मढा बीजें केलें : बाइ : हे बीढार होए : ॥ १ ॥ :

चतुवीधांचां मढीं अवस्थान : । : **उपाध्यां** भेटि एकु दीस गोसावीयांसि उदयाचा पूजावस्वर जाला : आरोगण : पहुड : उपहुड : परि गोसावी

शयनासनींचि असति : **दादोस** मूख्य करूनि **बल्हेग्रामींचे** माहाजन **देवगिरींसि** आले : कांहीं **राज्यव्यापारें** : तवं गोसावीयांतें **यळापुरीं** राज्यकरीतां आइकीलें : मग दरिसना एळापुरि आले : **माहाकाळीचा** देउळीं बिढार केले : मग देवीं ह्मणीतलें : **जानो** : जाए पां : गोसावीयांसि कैसा अवसरू असे : पाहुनि या : ह्मणौनि : **उपाध्यीये** धाडीले : आले : तवं मढाचीं कवाडें लावीलीं असति : मग : उपाध्यीं शब्द केला : बाइसीं ह्मणीतलें : बाबा : कवाड कवण उघडवीत असे : तथा : **टींबकारीत** असे : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : **चांगो** सरिसा **बटिकु** आला होता : हा नव्हे कीं : परशरामबास : ॥ छ ॥ : बाइ : चांगो सरिसा बटिकु आला : तेयासारिखा वाटतु असे : रामेश्वरबास : ॥ छ ॥ : बाइसें आलीं : कवाडें उघडीलीं : **उपाध्यीं** बाइसा नमस्कारू केला : बाइसें आलीं : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : कोणु : बाइसीं ह्मणीतलें : आपण ह्मणीतला : तोचि : बाबा : शोधु : बाइ : अभ्यागतें आलीं : ॥ छ ॥ : **उपाध्यें** भीतरि आले : तवं आंधारू पडिला असे : उपाध्यीं मनीं ह्मणीतलें : बाइसें वाति लाविती कां तरि मीं गोसावीयांतें देखतां : तवं भगकरि श्रीमूर्तिवरि प्रकाशू पडीला : मग दंडवतें घातलीं : श्रीचरणा लागले : सर्वज्ञें ह्मणीतलें : बटिका : हें काइ दीवेन देखीजे : हें आपणेयांतें दाखवी : तेव्हळिसिचि देखीजे कीं : ॥ : दुसरी वासना : **ईश्वरू काइ गा अन्य** प्रकाशकू : तो स्वयंप्रकाशू कीं :॥: मग गोसावी पुसिलें : कोण कोण बटिका आले असेति : सोधु : बटिका : तुंचि आलासि : जी जी : ॥ छ ॥ : **दादोस : पदकर नागदेवोभट : रांके लक्ष्मींद्रभट जापीये वीष्णूभट : आपदेवोभट : बागडे विष्णुभट : नरसिंहभट :** उपाध्याचें भाउ **नागदेवोउपाध्ये :** गातीय **कमळनाइक : आनो : खळो : गोंदो :** तेरावे उपाध्ये : इतुके आले असति : सर्वज्ञें ह्मणीतलें : बटिका : एथौनि जालें : तें तुमचा ठाइ वर्ते : हो जी : कैसें वर्ते : ना जी : एकलेया पाहारू खांड बैसों आवडे : गोसावीयांतें आठउं आवडे : एकलेया बैसलेया सुखचि होय जी : तुह्मी यांतें काइ ह्मणां : जी जी : श्रीकृष्ण ह्मणों : हीराईपाठ : जेचि श्रीकृष्णचक्रवर्ति तेचि आमचे गोसावी : सर्वज्ञें ह्मणीतलें : तेंचि काइसेया तवं : ना जी : गोसावी : **कास्तां हरिदेवो पंडिता** प्रति: **गोपाळमंत्राचे** भेद निरूपीले : एकू भेद तो

श्रीकृष्ण चक्रवर्ति जाणति : कां रुक्मीणदेवी जाणे : आणिक कव्हणीचि नेणे : ऐसें : सर्वज्ञें ह्मणीतलें : या तवं जी : सर्वज्ञें ह्मणीतलें : हें जें होये ते होये : ॥ : तुमची बूधि तव निकी : ऐसी बूधि जावों नेदीजे : एकी वासना : हें श्रीकृष्णचक्रवर्ति होए : कां : जें होए तें होए : ॥ : बाइ : बटीकु काइ ह्मणतु असे : बाबा : दैवाचा : भाग्याचा : सर्वज्ञें ह्मणीतलें : तुमचां गांवीं माहात्मा असे : जी जी : सीक्षा शास्त्र वर्ते : जी जी : तुह्मी जा : हो जी : महात्मेया वरि आणि येथ कैसी बुधि आति : जी जी : सरिसीचि : सर्वज्ञें ह्मणीतलें : हुं बाइ : बाटिकु काइ ह्मणतु असे : बाइसें दुचितीं होतीं दैवाचा भाग्याचा : बाबा : बाइ आतां आन एक ह्मणतु असे : काइ ह्मणत असे बाबा : पुसा पां : यांतें : बाइसीं ह्मणीतलें : काइ ह्मणतु अससि : बटिका उगोंचि : सर्वज्ञें ह्मणीतलें महात्मेया वरि आणि एथ सरिसीचि बूधि : ह्मणत असे : बाइसीं ह्मणीतलें : मर मर पोरा : तुझीये कीडडींये बांधे घागरा : ये जाइल मसण वेन्हीं : टुं टुं करीत : महात्मा काइसा पाखांडाचा : काइसें तेयाचें आचारीत्व : मशकाचें : बाबा : तें रडौनि आचारित्व मागितलें : तथा विद्या : बाबासि आणि रामासि सरी करीतु असे : हीराइपाठ : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : उगी असा : **सतेव** (स्वत एव) **जीवासि : काइ जाणणें असे : एथौनि : जाणवीजे : तैंचि जाणति :** बटिका महात्मा तो एकु जीवु : ऐसें जाणिजे : माहात्मा तो एथिचा हो : हां गा : **देव काइ अनेग असति : देवो तो एकूचि कीं :** ॥ १ ॥ : दुसरी वासना : ॥ : देव काइ सारिखे असति : सर्वज्ञें ह्मणीतलें : तुमचिया गांवापासि **आत्मतिर्थ** असे कीं : हो जी : तुह्मी तेथ जा : हो जी : तेथ जाइजे हो : तें आणिका स्थावरा सारिखें नव्हे : तें **श्री दत्तात्रयप्रभूची प्रीतष्ठा हो :** शोधु : **पंचाळेश्वरा** गेला होतासि : पूसीलें : हें ते स्थानीं होतें : तेथ जाइजे हो : मग श्रीमुखीचें तांबूळ दीधलें : गळाची माळ दीधली : हीराई : तेथ प्रतिदिनीं जाइजे हो : बटिका : ॥ छ ॥ : बटिका जाते वाट पाहात असति : ते निगाले : ॥ २ ॥ :

देवा सीष्या भेटि : ॥ : **देव** ह्मणो लागले : **जानोयें :** उसीरू कां लाविला : ह्मणौनि : पुसों लागले : उपाध्यासि कोपों लागले : येरी अवघां

ह्मणीतलें : दादो : गोसावीयाचेया दरिसना जात असीजे : मां गोसावीयां पासौनि काइ निर्गो आवडत असे **देव** आले : गोसावी बाहीरि पटिसाळेवरि बीजें केलें : शोधु : **उपाधीं** पासोडी बैसों घातली : **बटिका** : मळे ना : ना जी : तवं बाइसीं जाडी आणिली : आसन केलें : पडिसाळे दादोसा भेटि जाली : क्षेमालिंगन दीधलें : आसनीं बैसले : मग आवघेयांतें पृथकाकारें पूसिलें : तथा संभाखीलें : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : तुमतें **पाणिभातु** असे : असे बाबा : रवळो घागरि घेउनि पाणिया धाडीलें : परशरामबास : भागवत धाडिले : रामेश्वरबास : सोंडी धुववीली : मग गोसावी पुसीलें : माहात्मेया काइ पृथकपात्र : जी जी : सर्वज्ञें ह्मणीतलें : आतांचा तवं वेळ ऐसें जालें : मग तुमचें काइ केहीं गेलें असे : मग सोंडीवरि अन्न घातलें : मग गोसावी आपणेयां पुढें जेववीलें : आंचवलें : तांबूळ देववीलें : ॥ ३ ॥ :

दीढपुरुखु नामकरण : ॥ : **देवीं** उतरिला मढासि बीढार आणिलें : हीराइपाठ : सर्वज्ञें ह्मणीतलें : हा मढु रिता असे : एथ बीढार घेउनि या : यरी दीसीं पूजावस्वरा आले : गोसावीयांसि पूजावस्वर : देवीं बीढार आणवीलें : मग रोटी : ॥छ॥ : मग वीळचां **देवीं** कणिक घेतली : रोटीया केलीया : दोहीं मढामाजि **उपाध्यें** भाजीत असति : तवं गोसावी वीहरणौनि बीजें केलें : गोसावी दोहीं मढामाजि उभे ठेले : मग ह्मणीतले : एसनी अर्ध रोटी टाके : ना जी : अर्धा काइ होइल : तरि काइ पाउण : ना जी : पाउणा काय होइल : तरि काइ समग्र एकि : ना जी : समग्र काइ होइल : तरि काइ सवाये : ना जी : सवाया : कां : दीढ : शोधु : हें काइ गा ऐसेनि दीढ : एसनी दीढ रोटी टाके : हो जी : शोधु : मारि : हे काइ गा : एसनीं रोटी टाके : ॥ छ ॥ : एसणीयां रोटीया केलीया : सर्वज्ञें ह्मणीतलें : ऐसें तर्‍ही तुह्मां दीढ पुरुखु ह्मणा : मग जेवीले : निजों गेले : उपाध्ये राहीले : बाइसीं ह्मणीतलें : बटीका : तुं कां राहिलासि : तुं जाय : तुझे सांघाती वाट पाहात असति : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : असों दीया : चांगो सरिसा नीद्रा करील : तथा सेजा : ॥ ४ ॥ :

लेणां छाया पुरूखु : ॥ : गोसावीयांसि उदयाचा पूजावसर जालेया नंतरें गोसावी वीहरणा बीजें केलें : एका लेणेयांचां चौकीं आसन : भक्तजन चौकावरि

उभे ठाकले : तवं पुढीले भितिसी भव्य पुरूखु : एकू कमळाची आंगी लेइलां असे : ऐसा देखीला : चौका खालि उभे ठाकति आणि न देखति : भक्तजनीं पुसीलें : हें काइ जी : सर्वज्ञें ह्मणीतलें : आतां जा : पाहा : शोधु : हे काइ गा पुरूषु जी :॥: **छाया पुरूषु सीधाचां संकेतु**: शोधु :॥: हा सीधाचां आगम समो : जेणें केलें : तेणें आपुलीया छाया ठेवीली असे : हीराइसा पाठ : छाया पुरूषु सकळा करितेनि पुरूखें एथ आपुली छाया निक्षेपीली असे : ॥ ५ ॥ :

आगम समो : ॥ : एकुदीस गोसावीयांसि उदेयाचा पूजावसर जालेया नंतरें गोसावी वीहरणासि बीजें केलें : **माणिकेश्वरीं** एका लेणेयासि वींवरें बीजें केलें : पुढां गोसावी : मागां बाइसें : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : मागा धरा : मग यरा मागें यरातें धरूनि : ऐसीं भक्तजनें आवधीचि कासें लावीली : वींवरें वींवरें गोसावी बीजें करिताति : तवं एके ठाइं भगकरि उजेड पडिला : तवं पुढां एकु घटु मांडीला असे : घटा भवंती भवंती : डोइ गुंड गुंड : बैसलीं असति : बाइसीं पुसीलें : बाबा : हें काइ : बाइ : हा आगम समो : शोधु : बाइ आगमीकाचा आगम समो वर्तत असे : ॥ छ ॥ : ह्मणौनि पुढारें बीजें केलें : ते **वींवर इसाळुवाचिए लेणां उसासिलें**: तेणें ठायें गोसावी बीजें केलें : लेणा उभे ठेले : तवं **यळापुर** देखीलें : बाइसीं पुसीलें : ॥ : बाबा हें कवण नगर : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : हें येळापुर : हें काइ बाबा : इतुकी भुई आलों : ॥ : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : **हा अवघा डोंगरू पोकळ असे** : कोन्ही एथीचें रिगणें निगणें जाणे ना : ॥ छ ॥ छ ॥ :

चांगदेवो भटा लेणा परिखु :॥: गोसावीयांसि उदेयाचा पूजावसर जालेया नंतरें गोसावी एका लेणेया बीजें केलें : तेथ आसन : चांगदेवो भटातें : **काट वसिये** पाठवीले : लेणेयांकडे जा : गेले : तवं आडवी तिडवी पडलीं देखिलीं : एकीकडे एकाचे पाय : एकीकडे एकाचीया डोइया : ऐसी पासली पडलीं असति : डोळे मिलमिलवीत : वोठ फुलफुलवीती : आणि : भीयाले : गोसावीयांपासि आले : दंडवतें घातलीं : श्रीचरणां लागले : हीराइसा : सर्वज्ञें ह्मणीतलें : कां गा : आलेति : ॥छ॥ मागील वृतांत आवघेंचि सांधीतलें : भियालां ह्मणौनि

आलां जी : सर्वज्ञें ह्मणीतलें : तुह्मीं बोलवितेति : तरि बोलतीं : पुसतेति तरि मार्गु सांधति : तथा मार्गु देती : ||छ||७|| :

आपदेवो भटा : प्राल्हादवीद्या नीरूपण :||: एकु दीस गोसावीयांसि उदयाचा पूजावसर जालेया नंतरें नागझरियें बीजें केलें : तथा लेणा एकासि बीजें केलें : तेथ आसन : आपदेवो भटातें ह्मणीतलें : जा गा : हीराइसापाठ : भटो तुह्मीं पैला लेणे या जा : ||छ|| : हो कां जी : ह्मणौनि : गेले : बैसले : तवं भवीख (ष्य) पुरुषु: आंगी कमळाची लेउनि ऐसा आला : हातीं सुवर्णाचें खर्ग : तो खांडेवरि आपदेवोभटासि हाणे : तवं तवं सुखचि होए : खांडें पाणियांतु घातलें : तैसें तैसें निगौनि जाए : तवं तवं सुखचि होए : ऐसी स्तीति केतुला काळ एकू भोगीली : भंगली : तवं गोसावी पुढें मढासि बीजें केलें : मागिली कडौनि आपदेवोभट वाडावेळा आले : दंडवतें घातलीं : श्रीचरणां लागले : हीराइसा पाठ : उसीरू कां या लावीला : ||छ|| मागील आववेंचि सांघीतलें : तरि तें काइजी : सर्वज्ञें ह्मणीतलें : ते **प्रल्हादाची वीद्या** : ते आह्मा जाली जी : सर्वज्ञें ह्मणीतलें : तें तुह्मां नव्हे : एथौनि दीसे : तथा किजैल : हीराइसापाठ : तें तुह्मा कां गा होइल : ते तुह्मां एथौनि दीसे ऐसें : ||८|| :

तथा सप्तदशकळा निस्यंदे : || : एकु दीस : गोसावी : उदेयाचा पूजावसर जालेया नंतरें नागझरिएसि बीजें केलें : आसन: सर्वज्ञें ह्मणीतलें: जा गा: हीराइसा: भटो तुह्मीं पैला लेणेयां जा : गेले : नागझरिये बैसले : तवं षोडशवरूषीं स्त्री : ते **खळिचा साउला : खळिची चोळी : हातीं सूवर्णाचा कळशु : तथा करा** : ते करोनि माथेयावरि उदकाची धार घाली : तवं तवं सूखचि होए : ऐसी स्तिति केली : एकु काळु भोगिली : मग : भंगली : गोसावी पुढां बीजे केले : ते मागीला कडौनि आले : गोसावी पुसीलें: मागील सांघीतलें: तरि : तें काइ जी: सर्वज्ञें ह्मणीतलें : **ते चंद्रीची सतरावी कळा गा** : हीराइसा पाठ : तुह्मावरि वीरखत होती : ||छ|| : जी जी : तरि ते आह्मा जाली : सर्वज्ञें ह्मणीतलें : तुह्मां नाहीं : ते एथौनि दीसे : तथा दीजैल : हीराइसा पाठ : ते तुह्मां कां गा होइल : ते तुह्मां एथौनि कीं गा : || छ || ९ || :

सारंगपंडीता भेटी : ॥ : **सारंगपंडित देवगिरीसि** कांहीं आपुलेनि कार्ये आले : सरिसीं **देमाइसें : मुकुंद** असति : तवं गोसावीयांतें **एळापुरीं** आइकीलें : मग दरिसना आले : मार्गीं येत असति : तवं **माहादेवो पुर घाटीं** आंबे वानिएचे वीकत असति : ते घेतले : केळें घेतलीं : देउगीरीचीं पोफळें घेतलीं : नागझरीयें आले ; देसाइसातें ह्मणीतलें : देमाइ एथ जेउं : मग जावों : देसाइसीं ह्मणीतलें : हें काइ पंडितो : इतुकेयांचि गोसावीयां न भेटतां : कैसे जेउं : ना आमचेया गोसावीयाचां ठाइं तैसें कांहीं नाहीं : तुह्मीं तवं सांघों नको पा : गोसावी काइ नेणति : देमाइसीं ह्मणीतलें : मुकुंदे ह्मणीतलें : तथा लखुबाइसीं ह्मणीतलें : देमाइसें पंडीत भुकेले असति : जेउं दिया : मग रोटीया : परशरामबास : ॥ : सीळिया जेविले : आंगीया केलीया टोपरियाचिए बाले दरिसनालागि आसू बांधली : निगाले : देसाइसें जेवितें होतीं : केळांचिया साली : रोटीयाचीं शकळें तें चावति ना : तेणें उशीरू लागला : **सारंग पंडितीं** ह्मणीतलें : **देमाये** तुह्मी मागीलाकडौनि या आलेः गोसावीयां भेटि आलीः दंडवतें घातलीं : श्रीचरणा लागले : बैसले : तवं मागील कडौनि देमाइसें आलीं : दंडवतें घातलीं : श्रीचरणा लागली : बैसली : सारंगपंडीतीं पोफळें केळें आंबे दर्शना केले : सर्वज्ञें ह्मणीतले : देमती : माघारे कां तथा : मागां कां : हीराइसा पाठ : हे काइ **देमती** : तुह्मीं माघारे ते काइ : ॥ छ ॥ : जी जी : रोटीयाचीं शकले चावति ना जी : तथा खपले : म्हणोनि : उसीरू लागला जी : हीराइसा पाठ : रोटीया काइसेया : **देमाये** : ॥ छ ॥ : मग देमाइसीं मागील आवघें वृतांत सांधीतले : ते सांगती : ते विचि सारंगपंडिताची वास पाहाति ते गळेयाकडे आंगुळीया दाखवीति : सर्वज्ञें ह्मणीतलें : **आणिका देवा तीर्थाचेया ठाया जाइजे : तिर्थ उपवासू कीजे : देवो पाहीजे : मग जेवीजे** : तेतुलें हीं पां एथ नाहीं : तरि सांघातधर्मा पुरतें नाहीं : तथा सांघात धर्मू नाहीं : हीराइसा पाठ : हां गा : आणिक जडा पार्थीवा तीर्थां जाइजे : तरि : ने जवीत (न जेवीत) जाइजे : तीर्थ उपवासू कीजे : तीर्थ देवता न पाहात न जेवीजे : मा : तेतुलेंहीं नाहीं : ॥ छ ॥ एथही सांधात धर्मू एकु आति : आधिं सांघातिया ह्मणौनि चोराची गोष्टि सांधीतली : इतुलेनि सारंगपंडित दैनावले : आसू दरिसना करावी : ते न करीतिचि : पुढां पोफळें ठेवीलीं होतीं तेयांतुल एक पोफळ गोसावी श्रीकरीं घेतलें : सर्वज्ञें

ह्मणीतलें : **पांडेया :** हें पोफळ कैसें असे गा : हीराइसा पाठ : पांडेया : आतां जाणा पां गा : हें पोफळ कैसें असे : चोखट असे जी : सर्वज्ञें ह्मणीतलें : एथौनि चौखट नव्हे : ॥ : तथा निकें नाहीं : ह्मणीजत असे : होइ काइ : गोसावी दृष्टीचेया खूणा : आसू दाखवीली : हीराइसा पाठ : आसू जाए : ॥ छ ॥ हो कां जी : हो : गोसावीयांची नव्हे : फोडिलें : तवं चोखटें निगालें : मागुतें मेळविलें : सर्वज्ञें ह्मणीतलें : एथौनि : निकें : तथा चोखट ऐसें ह्मणीजत असीजे : पाहीलें तवं चोखट : आसू आसुडानि घेतली : बाइसां कडे : तया श्रीकरीचेया आंगुळीया करूनि टोपरें काढानि बाइसां कडे घातलें : बाइ : एथ एकू उपहारू करा : आंबे दरिसना ठेले होते . तेयांतु एकु आंबा श्रीकरीं घेऊनि अवग्रहण केला : बाइसें आंबे नेत होती : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ एकु आंबा वेगळा ठेवा : कां बाबा : एथौनि स्विकरिला असे : बाइसीं ह्मणीतलें : कांहीं देखींजे ना : बाबा : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : वीषय वीखो ऐसा भोगीति : हीराइसा पाठ : तथा सेवीति : बाइ ऐसा एक वीखो भोगणें आति : ॥ छ ॥ : बाइ : वीखो भोगुं कव्हणीचि नेणति : का निर्वधी वींखो : श्रीकृष्ण चक्रवर्ति जाणति : **कली योगीं वीखो असे : परि वीखवा : नाहीं :** हे राये मंडलीका : द्वापरीं श्रीकृष्णें वीखो भोगीला : हीराइसा पाठ : काइ हा दीक जाणति : ॥१०॥ :

तथा श्रीप्रभु दाखवणें : ॥ : एकु दीस गोसावी श्रीप्रभुची महीमा निरोपीत होते : सारंग पंडितीं ह्मणीतलें : जी जी : मज श्रीप्रभुचें दर्शन करावें : सर्वज्ञें ह्मणीतलें : तेथ गेलेया होइल : हीराइसा पाठ : ते तेथ कीं गा : ॥ छ ॥ : ना जी : गोसावी करिति तरि काइ नव्हे : मग विळिचां वेळीं आणिकैकडे बीजें केलें : मार्गी सर्वज्ञें ह्मणीतलें : पांडेया : मार्गी काइ ह्मणत होतेति : ना जी : एकु दीस ते गोसावी एथाची दाखविति : तरि : काइ नव्हे : सर्वज्ञें ह्मणीतलें : हें पाहा चांग श्रीप्रभु : हीराइसा पाठ : हे घेया गा श्रीप्रभु : ॥ छ ॥ : तवं पैलाकडौनि **नाभि दुंवित खाड : मोकळें केसकळाप : मोकळा कासोटा : उतरासंगीं धोत्र : हास्य करीत टाळी वात : गगन अवलोकित : खाडवीं चुरीत : श्याम श्रीमूर्ति ऐसे** श्रीप्रभु माळिया वरौनि वीजें करिति : सारंगपंडिता गोसावी दाखाविलें : सर्वज्ञें ह्मणीतलें : चांग

पाहा : हीराइसा : चांग पाहा : नीकें पाहा : ॥ छ ॥ जी जी : समोर आले : मग ह्मणीतलें : घाला दंडवत : मग दंडवतें घातलीं : ॥ ११ ॥ :

साळीवाहानु हटु निरूपण :॥: एकु दीस गोसावीयांसि उदयाचा पूजावसर जालेया नंतरें बाइसीं पडिसाळेवरि आसन केलें : गोसावी आसनीं बैसले असति : तवं **माहादेवो रायाचा राउत साळीवाहानू आले** : दंडवतें घातलीं : श्रीचरणा लागले : बैसले : मग गोसावीयांतें पुसीलें : हे हटु जाणति : तथा : जी जी : हटु जाणा : श्रीमुखें निराकरिलें सर्वज्ञें ह्मणीतलें : आपण जाणिजे : हो जी : निराकरीलें : हटु तो आह्मींचि जाणों : हीराइसा : पां बोला : ॥ छ ॥ बोलों लागलें : **जारक : पुरक : कुंभकू : त्राहीटकू** : सर्वज्ञें ह्मणीतलें : ऐसा तुह्मी हटु जाणा : तरि हें काइ : ह्मणौनि : आंगुळिया कानसूल दाखविलें : हीराइसा ऐसें जरि तुह्मीं हटु जाणा : तरि ऐसें काइ : मग कानसूल : ॥ : सर्वज्ञें ह्मणीतलें : हटीचीं कार्यें : तें ऐसीं होतीं : जी जी : हा आमुचा अप्रेत्नु सर्वज्ञें ह्मणीतलें : हटीचीं कार्यें ऐसीं होति कीं : हटु तो ऐसा कीं : ह्मणौनि बोलों लागले : हीराइसा :॥: **हटें वय स्तंभे : अपमृत्यु जींके : वळित पळित लोपति** : तेहीं ह्मणीतलें : जी जी: परिसों नेणो जी : मा : **बौलोनि काइ** : हें गोसावीचि बोलावें : आणि : गोसावीचि परिसावें : ॥१२॥ :

डखलेया सीक्षापण :॥: एकुदीस **डखले** चरणवीहीरियां धोत्रें धों गेले : धुतलीं : घडिया केलिया : वाळत घातलीं : मग ह्मणीतलें : ये चरणवीहीराचें उदक उपासिजे : परि : तेतुलेचि असे : ऐसें आइकीजे : तें काइ साचें कीं लटिकें : ऐसें पाहों पां : ह्मणौनि : पाणीं उपसों नीगाले : परि पाणी तेतुलेंचि : मग धोत्रें घडिया केलिया : आले : सर्वज्ञें ह्मणीतलें : उसीरू कां लाविला : हीराइसा : डखलेया उसीरू कां लाविला : ॥ छ ॥ : मागील वृतांत सांघीतलें : सर्वज्ञें ह्मणीतलें : ऐसा अंतु न पाहिजे कीं : ॥ छ ॥ १३ ॥ :

सूकर रोखू हरणें : ॥ : एकु दीस गोसावीयांसि उदेयाचा पूजावस्वर जालेया नंतरें मग **कान्हारळेया** कडे वीहरणा बीजें केलें : ते **माहादेनि रायें तें रान राखीलें होतें** : तेथौनि सोरू निगाला : मग तो गोसावीयांसि

उजू आला : भक्तजन भीयाले : ते पळाले : सोरू गोसावीया जवळि आला : गोसावी अवलोकीला : रोखू हरला : आणि तो तेथौनि गेला : मग भक्तजन आले : गोसावी इखीत हास्य केलें : सर्वज्ञें ह्मणीतलें : काइ गा : भियालेति : ना जी : आह्मीं पापीये : आह्मी गोसावीयांतें सांडौनि पळालों : गोसावीयां असतां आह्मांसि काइ होत असे : मग **कान्हराळा** नावेक आसन : गोसावी बीढारा बीजें केलें : भक्तजनीं बाइसां पूढें सांघीतलें : मग बाइसीं ह्मणीतलें : पोरें हो : बाबातें कैसें सांडौनि गेलेति : ॥ १४ ॥ :

अदंडीनाथा सामर्थ्य कथन : ॥ : एकु दीस : उदेयाचा पूजावस्वर जालेया नंतरें गोसावी मग **मळेयासि** बीजें केलें सर्वज्ञें ह्मणीतलें : हा **अदंडीनाथाचा मळा :** हां जी : अदंडीनाथु ह्मणीजे काइ : सर्वज्ञें ह्मणीतलें **अदंडीनाथु नावें महात्मे :** ते मळां होते : ते आले : तीय दीउनि अवकाळीं अवधी फुलें फुलों लागलिया : रायाचिय राणीयचा मळा : तथा अदंडीनाथु मळां राहीले : आनिकाळीची आनीं काळीं फुलें फुलों लागलीं : माळिण सेव घालुं गेली : राणियां पूसिलें : हां गे : जें नाहीं जे जे काळीं : ते फुलें जीयें नाहीं जीये काळीं : तें फुलें तें कैची गे : माळिणी ह्मणीतलें : आमाचिय मळां : जे पुरूखु एक आले : तथा माहात्मे एक आले : ते आले तीय दीउनि अवकाळिं फुलें फुलेति असति : राणियां ह्मणीतलें : तेयांतें ह्मणीजे : रायाची राणी तुमचेया दरिसना यों : शोधु : तेयांतें पुसा पां : मीं तेयाचेया दरिसना येवों : तेयां पुसीलें : तेहीं ह्मणीतलें : येतु कां : मग येकें परियळीं पूजाद्रव्यें : एकू अनाचा : आली : पुजा केली : जेंउ वाढिलें : तांबूळ दीधलें : ऐसें प्रत्येहीं करीति : मग आपण जेविति : **रावो क्षेपणिकाचा** सीख्य : तो तैसाची भगती करी : क्षेपणिकीं ह्मणीतलें : **राया तुं आमची सेवा करिसी : तरी स्त्रीपुरूखा एकूचि धर्मू होआवा कीं :** मग रायें पूसीलें : तुह्मी ह्मणे : पुरूखाचेया दरिसना जात असा : जात असा : जावों : तरि आतां न वचा : तेयां ह्मणीतलें : आह्मां तेयांचें दरूसन घेतलेंया वाचौनि जेवण नाहीं : तरि जा : आणि : काइ : माळीणितें पुसों धाडीलें : ह्मणावें आजि रायें निर्वेडि थोर केली असे : ऐसें पुसावें : गेलीं : पुसीलें तेंहीं ह्मणीतलें : एती

तरि एवों एइल : गेलीं : दरिसन घेतलें : पुजा केली : आली : रायें पुसीलें : दरिसना व वचाचि तें काइ : ना : गेलों होतों : हें नव्हे : आतांचि आलों : राखत होते ते बोलावीले : मग तेयांसि कोपों लागला : एक ह्मणति : आह्मीं देखोंचि ना : एक ह्मणति : देखों : परि : कांहीं करवेना : मग ह्मणीतलें : पुरुखु सामर्थ्यवंतु असति : तेणें क्षेपणीकापूढें सांघीतलें : तेहीं ह्मणीतलें : राणियतें पूसा : ते आह्मासि **उघाणी** करीती : राणियेतें पुसीलें : तुमचे गुरु आमचीया गुरुसीं उघाणी करीति : तीया म्हणीतलें : आधीं करीति : सभामंडपीं बैसों घातलें : तेयांतें बोलाउं धाडीलें : गेले : रायें तुमतें बोलाविलें असे : न येतीचि : तेहीं म्हणीतलें : होए भीयाले : राणीये अभिमान पडीला : जा ऐसें म्हणावें : तुमतें राणियां बोलावीलें असे : ऐसे सांघीतलें : आणि : आले : पाइं पाउवा ऐसे आले : मग उघाणी प्रवर्तली : **अदंडीनार्थी क्षेपणिक अडीले :** इतुलेनि तेहीं म्हणीतलें : हें काइ : हें वागैल म्हणा : आतां **तुह्मीं आह्मीं सामर्थ्यें भांडों :** हो कां : आमची अमृत कूपीं स्वर्गीचें अमृत आणिल : तेहीं ह्मणीतलें : आह्मीं आणुं नेदुं : हो कां : कूपी अभिमंत्रुनि परिहरिली : गेली : अमृत घेउनि येत होती: अदंडीनाथीं डावीये पाइंची पाउ भिड भिड म्हणौनि परिहरिली : अमृत कुंडीहुनि अमृत घेउनि येत होतीं : पाउ तीसि ठुस ठुस करि लागली : आणि कुपी फुटली : तिन कोरें जालीं : तें तीं ठाइं पडलीं : तें तिन तीर्थें जाली : **करण वीहीरा : उपरकूंडी : सिवाळें :** सर्वज्ञें ह्मणीतलें : **भटाचार्या मागां पुडती अदंडीनाथें वेद प्रतिष्ठीले : ते निवर्तले : तेयाचें देउळ हें** : ॥ १५ ॥ :

तथा भिड शब्द कथन : ॥ : **अदंडीनाथाचें देउळ : पसिमामूखु :** ते निवर्तले : मग राणियां तेयाची प्रतीष्ठा केली : देउळ केलें : हीराइसा : तथा : मग ते तेथें पाताळ गुंफेसि साधनिं रिगाले : ॥ छ ॥ : गोसावी तेथ बीजें केलें : सर्वज्ञें ह्मणीतलें : हे अदंडीनाथाची गुंफा गा : एथ अद्यापि भिड भिड ऐसा शब्दु वर्ते : तेथ जोगी येति : भिड भिड ऐसा पुरुखाचा शब्दु आंतुलि कडौनि होए : मग : जाति : भक्तजनें आइकों ठाकली :॥ १६ ॥:

कुइ रामा सिधि निषेध : ॥ : गोसावीयांसि दुपाहाराचा पूजावस्वर : आरोगणा पहुड : उपहुड : मग वीळिचां वेळीं मढावरि बीजें केलें : सरिसे भक्तजन असति : गोसावी दीशा अवलोकिलीया : मग : ह्मणीतलें : हां गा : भागेया : हें कोण कोण गांव : तेहीं ह्मणीतलें : **इटखेडें** : हें **मातखेडें** : हें **सीउर** : हें **लासौर** : एथ **कुइ राम** नांवें पुरूखु असति : तेयासि अनंता सीधि प्रगटति : सर्वज्ञें ह्मणीतलें : **रीधी सीधी : तीया कैसीया गा : कांबळेयाची मोट बांधौनि पाणिया आंतु घालिती** आणि तरंगती जी : देउळा आंतु कोंडिजति : आणि बाहिरि दीसीति : हें **चेटक कार्यें** : पाणियांतु तरंगति हें **पवनकार्यें** : हीराइसा : सरांडियाचीए दांडीए केळाचीया पानाचा पुडवा : लेकुरुवांचीए खांदी जाति : हें पवनकार्य : ॥ छ ॥ : गोसावी ह्मणीतलें : कलियोगीं कें असति : विद्या : शोधु : कलियोगीं विद्या होवावीया : मा : तद्जनिता रिधि सीधि : तिया कैचीया : **कलियुगीं वीद्या असे** : तरि **पुरुखु सृष्टसंहारीं समर्थ नव्हे** : तथा वीद्यावंत पुरुषु : ॥ छ ॥ : उर्ध्वरेत घेति आणि बाहीरि सांडति : सर्वज्ञें ह्मणीतलें : ते ऊर्ध्वरेते ते ऐसे कीं : अधें उर्ध्वरिगों नेदीति : पवनें भीतरि जारट करीति : मग भीतरि आणिक देह होए : तेयासि छेदभेद नाहीं : हीराइसा : उर्ध्वरेते होति : ते बिंदुतें बिंदुचि जारणा जाणाति : उर्ध्व रेत घेति : ते भितरिचिया भितरि जारिति : भीतरि एक देह होए : वरिल देहा छेदभेद न प्रभवति : **जैसें नारिएळ : मुळें पाणी पीयें** : तें **वरूतें जाए** : भितरि पाणी : नारिएळ होए : बाहीरि करटें निब्रर होए तेया छेदभेद न प्रभवति : ॥ एके ह्मणति : **उर्ध्वरेता तो गोरक्ष** : कर्म करीतां न दीसे : जैसें नारियेळीं पाणि पैसे , मग नारियेळाचें सांघीतलें : ॥ १७ ॥ :

विद्यावंता भेटी : ॥ : एकु दीस : गोसावीयांसि उदेयाचा पूजावसर जालेया नंतरें मग गोसावी आसनीं उपविष्ट असति : **वीद्यावंतु** जोगीयाचेनि वेखें दरिसना आले : गोसावी आदरू केला : बैसों घातलें : बाइ : तुमतें कांहीं भातुकें असे : ना : नाहीं : बाबा : कव्हे **हाटवटीये** पाठवीले : **रांधवण हाटीचें** खाजें आणवीलें : तेयाचें पात्र भरिलें : आपूलेनि श्रीकरें टीळा लाविला : तांबूळ देवाविलें : मग गोसावी अनोज्ञा दीधली : गेले : मग बाइसीं पूसिलें :

बाबा : हे कोण : बाइ : **हे द्वारावतीकार श्री चांगदेवो राउळाचे** अनूग्रहीत : मग हाटवटीये सर्वे सिमोरी : हातीं सूनेयाचे जवट : बोर : गाजर : उळि : कांदे : ऐसे मांगतां **डखलां** देखिलें : बाइसीं **डखले** तेलां धाडीले होते : ते हांसत हांसत आले : बाइ ऐसे आमचे गोसावी जेयांसि मानु केला : ते हाटवटीये ऐसे देखीले : ह्मणौनि : अवघें सांघीतलें : सर्वज्ञें ह्मणीतलें : ऐसें न ह्मणीजे : ॥ छ ॥ : तयावरि **लुइपाईची** गोष्टि सांघितली : ॥ १८ ॥ :

ब्रह्मसानी विखस्तंबन :॥: गोसावी अचाट वेधवती स्वीकरीली : **राजीके तेतुके गोसावीयांचेया दरीसना एति : साळिवाहान: पाल्हा डांगीया :** हे मुख्य करूनि हे अवघे **राजीके** आणिकही लोकू ये : एकू **माहादेश्रमू** आणि **ब्रह्मसान** हे यांचेनि येर आवघांचि लोकू दरिसना येति : तेहीं ह्मणीतलें : **हे रायातेंहीं आदिकरूनि** वेधीति : मां च्यान्ही वीखें मीळोनि **फोडी** केलिया : मग तीया फोडी : पुजा : आपूलीया सीष्या हातीं धाडीलिया : गोसावीयांसि उदयाचा पूजावसर असे : बाइसीं पटीसाळे आसन केलें : तेहीं पुजा केली : श्रीकरीं फोडी दीधलीया : गोसीया: अवलोकीलीया : मग श्रीमुखीं घातलीया : तेहीं वीडिया करूनि दीधालिया : मग ते नीघाले : दीस दोनि : तथा तिन गेलेयां : मग तेंहीं सिख्यातें पुसीलें : तुह्मीं गेलेति : मां : काइ केलें : तेंहीं अवघें सांघीतलें : अया : अया : ईश्वर पुरुषु होति : दृष्टी पूढां वीख न न्हाये : ॥१९॥ :

तथा वीखशक्तिस्वीकारू :॥: **ब्रह्मसानी** सीख्यातें ह्मणीतलें : आतां तुह्मीं जावें : मां : आंधारीं आसन घालावें : आपुलेनि हातें फोडी श्रीमुखीं घालाविया : गेले : गोसावीयासि उदयाचा पूजावसर होता : भितरि आसन रचिलें : मां : पूजा केली : मग आपुलेनि हातें : श्रीमुखीं फोडी घातालिया : वीडिया करूनि दीधलिया : हीराइसा : मग सर्वज्ञें ह्मणीतलें : आतां तुमचें कार्ये जालें : आतां तुह्मीं जा : ॥छ॥ : मग ते गेले : मग तांबूळ प्रत्येजीलें : भागवतीं मागीतलें : गोसावी नेदीतीचि : सर्वज्ञें ह्मणीतलें बाइ : हे तांबूळ पुरा : हीराइसा : बाइ : हें एके ठाइं पुरा : तथा : बाइ वाटें अणा : ॥छ॥ : अवघा उगाळु हीरवा जाला : तिन तांबुळें पुरवीलीं ; तिसरेया तांबुळाची फोडी भागवतां दीधली :

तथा चांगदेवो भटीं तेंहीं तोंडीं घातलीं : तेयांसि हटाउनि जरू आला : बाइसीं एकांतीं पुसीलें : ते इषित कपोळीं स्वेदबींदु आले : श्रीमूर्तीं घामेलीं : नेत्र आलोहीत जाले : वांति स्वीकरीली : श्रीमूर्तीवरि अणिया आणिया ऐसीया आलियाः सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : एथ वीषप्रळो जाला : ते दोसी **मल्हारवसीए** अवस्थान माझारिलें खणी : दीसति न जालें : ॥ : गोसावीयांसि दुधाची आरोगण होए : ऐसें गजवजों लागलीं : काइ करूं : बाबा : सर्वज्ञें ह्मणीतलें कांहीं करूं नैए : एका एक विरोधियें : च्यान्ही वीखें मिळवीली असति : वासनाग : काळकूट : मेणा : खडिया : तथा : रगतसिंगीं : बाइ : प्राणिया बहुत दीस : सात : तथा दीस तिन : प्राणिया जपतु असे : तरि आतां काइ करावें बाबा : बाइ हें ऐसेंचि नव्हे : **एकांतें निमित्य करिल : राष्टरा बोलु लावील :** मग : जाइल : हीराइसा : हें काइ बाबा : तथा बाइ याचें काइ : इतुलेंचि स्विकरिजे ना : काइ बाबा : बाइ हें हळाहळ : काळकूट : रगत सिंगीं : एकसि एक विरोधीयें : एकासि उपावो कीजे : तवं एक चढे : च्यान्ही मेळवीली असति तें आतां काइ करावें : बाबा : बाइ हें काइ ऐसेंचि जाइल : **एथौनि एकांतें निमित्य करील : आणि या राष्ट्रा (राष्ट्रा) बोलुं लावींजेल** : मग जाइजैल कीं : बाइ : एक ह्मणति : बाइ : भियाना : हें **राळे मवणें कीं : बाइ : खांबीं पुजा ते होआविचि असे** : एथौनि एकांतें निमित्य कीजेल : बाइ : प्राणिया : बहुत दीस जाचतु होता : तरि तेयाचा काइ उदीमू वायांचि जावों : ना : बावा : तरि तीन दी येकांतु देया : मग **मल्हार वसैए** अवस्थान : दुधाची आरोगण : मागुतें चतुर्वीधाचा मढीं अवस्थान : दीस : ॥ २० ॥ :

दखले चांगदेवो भट :॥: एकु दीस : उदेयाचा पूजावसर जालेया नंतरें गोसावी श्रीदत्तात्रय प्रभूची महीमा निरोपीत होते : डखला आणि चांगदेवो भटीं ह्मणीतलें : जी जीः आह्मां श्रीदत्तात्रय प्रभुचें दर्शन होआवें : तथा : जी जी : आह्मीं **जाउनि** : तरि : भेटति : हीराइसा : सर्वज्ञें ह्मणीतलें : जाल : तरि : होइल : आतां ऐसेंचि निगा : ॥छ॥ : शोध : तथा तें कां गा होइल : तें नव्हे कीं : ना जी : गोसावी करीती : तरि : होइल : सर्वज्ञें ह्मणीतलें : ऐसेयांचि

निगावें : **गाउनि गावां जावें : उपेणें न करावें : संबंधियाचिया ठायां न वचावें** : तथा शोधु : सोइरेयाचिया गांवां न वचावें : एकी भिक्षा न करावी **घाटां खालि भेटतिः ते नव्हति : घाटां वरि भेटति ते हों ह्मणति : परि ते नव्हति** : पर्वतांवरि भेटति ते नव्हों ह्मणति : परि ते होती : परशरामबास : घाटांखालि भेटती : ते नव्हति : घाटावरि संन्यासि वेखें भेटति ते नव्हति : **मेरुवाळियाचिये पाळीं** पारधीयाचेनि वेखें भेटति : ते नव्हों ह्मणति : ते होति : रामेश्वरबास : ॥ मग ते नीगाले : देवगीरी गेले : चोळिया तोड घेउनि : **डाउलवाडीये** गेले : संबंधीयासि भेटलेः मगः निगालेः चांगदेवो भटीं ह्मणीतलें : हें काइ : डखले हो : गोसावी वारिलें तोंचि केलें : आतां काइ दर्शन होइल : आतां चाला माधौतें : आले : दंडवतें घातलीं : श्रीचरणा लागले : मागील सांधीतलें : सर्वज्ञें ह्मणीतलें : श्रीदत्तात्रय प्रभूचें दर्शन : कां गा होइल : **हें अमोघ दर्शन** : ॥ २१ ॥ :

उपाधीया ह्मणीयें : ॥ : बाइसीं ह्मणीतलें : बटीका जाए कां : पत्र शाक घेउनि ए : आणि गेले : कांहीं बटिका विसरलियें : **सांबार** घेउनि ए : सर्वज्ञें ह्मणीतलें : हां गा : ह्मातारीएचें काइ : एका वींचूकी आणा : मा यासि लावा : मा हा ऐसाचि असैल : एके वेळ न पुरे : सर्वज्ञें ह्मणीतलें : बटिका : जाल : तरि : काइ जी : बाइसाचें ह्मणीये तें गोसावीयांचें कीं : हीराइसा : सर्वज्ञें ह्मणीतलें : काइ : जालें : एं ह्मातारिएसि : एक वेळ न पुरे : दोनी वेळ न पुरे : ऐसी वींचुकी लावा : ॥ : मां : उभाचि असैल : तथा उभाचि राहील : सर्वज्ञें ह्मणीतलें : कां : बटिका : जाल : तरि काइ जी : बाइसाचें ह्मणियें तें गोसावीयांचें : एकें ह्मणति : बाइ : एकी वींचूकी आणा : मां : एथें टेका : मां : ऐसाचि असैल : एकें वेळें सांधों न ए : सर्वज्ञें ह्मणीतलें : कां गा जाल : जी जी : बाबा : बाइसें कोपती : ॥ २२ ॥ :

देवां होणें : ॥ : एकु दीस : वीळीचां वेळीं : पाटाउ पाग : कळी धारी : तथा लोहवी धारी : ते पाग पुढें धाटेया वेढिली : आंगणीं भक्तजनांसि खेळु मांडीला : उघडी श्रीमूर्ति एरातें डचचीति : एरातें डचचिति : ऐसा खेळ सरे

ना : वीळचेयां पूजावस्वराची वेळ जाली : बाइसें पूजावसराची आइति करिती : तोंवीचि ह्मणति : पुरें कीजो बाबा : ॥ : गोसावी उगेचि : नाइकतीया भरवा : खेळतचि असति : मग बाइसीं ह्मणीतलें : आरे बटिकुरें हो : पुरों दीया ना : बाबासि उसीरू होतु असे : सर्वज्ञें ह्मणीतलें : पुरे गा : बाइसें कोपती : मग पंटिसाळेवरि वोलणियेवरि बाहीरवासू होता : तो गोसावी प्रावर्ण केला : आसनीं बैसले : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : या : आतां हें देवों जालें : हीराइसा : बाइ : या : आतां याचा देवो केला असे : तथा बाइ या : आतां तुमचेया देवा हो- आवें : ॥ छ ॥ : मग गोसावीयांसि पूजावस्वर : वीळचा पूजावस्वर :॥ २३ ॥:

संतोषा भेटि : स्तीति : ॥ : एकु दीस : गोसावीयांसि उदेयांचा पुजावस्वर जालेयानंतरें **अणकैचेया लेणेया** बीजें केलें : **अनकएपासीला लींगाचिए देउळिए** : बैसले होते : सर्वज्ञें ह्मणीतलें : महात्मे हो : एथ आसिजे : असों सुखें संतोखें : नगरीं भिक्षा की जे : कीजे सुखें संतोखें ; हीराइसा : एथचि नीद्रा कीजे : कीजे सुखें संतोखें : ॥ : ॥ छ ॥ सर्वज्ञें ह्मणीतलें : तरि : तुह्मीं संतोखु ह्मणा : आणि स्तीति जाली : गोसावीयांसि **अनेकैयें** आसन : मग बीढारा बीजें केलें : गोसावीयां सरिसे तेहीं आले : मग गोसावीयांचां ठाइं असों लागले : एकाचेनि मतें : पासवडी एथेंचि : ॥ २४ ॥ :

तथा अशसू करणें : ॥ : गोसावीयां पासि असतां तेयाचे जोगी ह्मणति : आह्मांपासि ये ना : आह्मांसी अदेशू न करी : आह्मांसि सीख्या न करि : भिक्षे गेले होते : तेंहीं **काठी खापरी कंथा** हीरतली : संतोखें ह्मणीतलें : मासीं अशसू घाला पां : तेंहीं ह्मणीतलें हो कां : मग **संतोषें** अशसू घालुं आदरिला : तेयाची ते सोए नेणति : तेहीं ह्मणीतलें : हें काइ गा : हा साक्षात गोरक्षनायु : ह्मणौनि : पुजा केली : चंदन लावीलें : टिळा केला : माळ : तांबुळ : खाजेया पात्र भरिलें : आलें : गोसावीया अनुकारें पुसीलें : संतोषा हें काइ : जी जी : मीयां ह्मणीतलें : मासीं अशसू घाला : पां जी आी : जोगरुवें मातली होतीं : माझी काठी खापरी हीरतली : मागिल सांघितलें : सर्वज्ञें ह्मणीतलें : संतोखा : **आपुलें रहस्य आणिकां प्रति प्रगटीजे ना कीं** :॥२५॥:

तथा सांडाक्रमु :॥: गोसावीयांसि उदेयाचा पूजावस्वर जालेयानंतरें पटिसाळे आसन : तवं **इंद्राइ नाम माहात्मे** गोसावीयाचेया दरिसना आले : **आदेशू** केला : **सिक्षा** केली : गोसावीयांतें पूसीलें : हां जी : यांसि संतोखु ऐसें नांव काइसें : सर्वज्ञें ह्मणीतलें : **संतोखा** : जोगी काइ ह्मणतु असे : हीराइसा : **संतोखा** : काइ ह्मणतु असति : **इंद्राइमाहात्मे** :॥ छ ॥: तेहीं ह्मणीतलें : जी जी : ह्मणत असति : तरि : ह्मणत असति : आणि काइ : सर्वज्ञें ह्मणीतलें : तुमतें धरिती : मारिती : काठी खापरी हीरति : कंथा हीरति : जी जी : हीरति तरि हीरति : आणि : काइ सर्वज्ञें ह्मणीतलें : तुह्मी तवं सांडाक्रमू जाणावा : हीराइसा : तथा ऐसें नव्हे कीं : तुमतें सांडाक्रमू पुसती : तो : तरि : तुह्मी नेणा :॥ छ ॥: नेणों तरि नेणों आणि काइ : सर्वज्ञें ह्मणीतलें : ह्मणौनिचि संतोखू कीं :॥ २६ ॥:

शांति बाइसा भेटी :॥: आस्तिति :॥: **शांति बाइसीं** अवघी वेवस्था सांघीतली : मग चरणक्षाळण जालें : शांति बाइसें तियें **वसुमतिकारें** : तेया नांव **माइबाइसे** : लेकु फीटला : **एकाइसे** हातरितले : **जसमाइसा** कावरें लागलें : वैरेता नावडति : सासुसासूरेया ना पढीयेति : तेंहीं दवडीली : मग माइबाइसीं आपणेयांपासि आणिलीं : माइबाइसें थोर दुखीयें जालीं : द्वारावातिए लेकू निगाला : माइबाइसीं ह्मणीतलें : जाइन : द्वारावतीएसि : एकी पाठीसीं बांधैन : एकी पोटेसीं बांधैन : मा : रिगैन गोमतीए मध्यें : ऐसें ह्मणोनि निगालीं **पैठणसि** आली : सारंगपंडित सोएरे : **भासे**: तेयासि भेटलीं : मागील आवघें सांधीतलें : तेवींचि दुख करिति : सारंगपंडितीं ह्मणीतलें : तुह्मी द्वारावतिए जाल : तरि : **एळापुरा** वरौनि जा : तेथ आमुचे गोसावी असति : तयाचें दरिसन घेया : तुमचें दुख जाइल : आणि : याचें कावरें जाइल : मग द्वारावतीये जा : निगाली : एळापुरां आली : गोसावी वीहरणाहुनि बीजें केलें : बाइसीं पटिसाळे पाटसरे यावरि आसन केलें : गोसावी आसनीं बैसले : **शांतिबाइसें एकाइसें : जसमाइसें** आलीं : शांती बाइसीं दंडवतें घातली : श्रीचरणा लागली : हीराइसा : नारीएळ दरिसना केलें :॥ छ ॥: मग मागें एकाइसें : पुढें जसमाइसें : ऐसीं बैसली : जी जी : माझेया पुत्राचे ऐसेचि हात :

ऐसेचि डोळे : ऐसेंचि तोंड : दुख करूं लागली मागील अवघी गोष्टि सांघीतली : सांघति तवं तवं दुख करिति: सर्वज्ञें ह्मणीतलें: **पांडेनि** एथ धाडीलें: जी जी: माझेया पुत्राचे ऐसेचि हात : ऐसेचि डोळे : ऐसेंचि तोंड : सर्वज्ञें ह्मणीतलें : **दुःख न करा : दुख ह्मणजे पाप : दुखातवं नरकु : होति : सोनेयाची फळी : तथा : प्रतीमां पोटीं बांधौनि पुरांतु रीगों नये कीं : जऱ्ही जाली सोनेयांची : तऱ्हीं बुडळील कीं :** बाइ दुख न करा : बाइसीं चरणक्षाळण केलें : तेयांसि चरणोदक दीधलें : तेहीं आपुलें आणि तेयांचेंहीं जसमाइसावरि घातलें : मग : पूजावस्त्र जाला : तोही पाहिला : मग ताट केलें : आरोगणा जाली : तेयांसि प्रसादु दीधला मग तियें बीढारा गेलीं : बीळीचिया पुजावस्त्रा आली : मागुतें चरणोदक : जसमाइसातें पाजीलें : माथेयावरि घातलें : पुजावस्त्र पाहीला : मग बीढारा गेली : उदीयांचि आली : दंडवतें घातलीं : श्रीचरणा लागली : गोसावी पुसीलें : एथौनि गेलेयां रात्रीं आलें होतें : नाहीं जी : सर्वज्ञें ह्मणीतलें : आतां तें न ए : गेलें हो : हीराइसा : रात्रीं कांहीं उपद्रो जाला : ना : जी : दीहांतु वीस वेळ ये : तिस वेळ ये : तें न ये जी : बाइ आतां तें न ये हो : । : तथा तें आतां गेलें हो : ॥ छ ॥ बाइ आतां द्वारावतीयें जा ना : हीराइसा : नथा : बाइ : तेयांचें दुख गेलें : येराचें कावरें गेलें : मग : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : द्वारावातिए पव्हा नीगाला : तरि : आतां द्वारावतीए जाना : ॥ छ ॥ तेहीं ह्मणीतलें : ना जी: आमची द्वारावती हेचि : आमचा कान्हेया एथेंचि भेटला : सर्वज्ञें ह्मणीतलें : यांतें सासूरेया पाठवा ना : जी जी : हे सासुसासूरेया नावडे : **वरिता** नावडे : तेंहीं दवडीली जी : सर्वज्ञें ह्मणीतलें : आतां आवडती : हीराइसा : आतां तेयाची वाट पाहातें असाति : ॥ छ ॥ : मग बीढारा गेली : एकाइसातें ह्मणीतलें : एकाइ तुं बोळवीत जायें कां : तीयें ह्मणति : मज न वचवे : उदीयाचि दरिसना आलीं : सांघीतलें : जी जी : एइतें ह्मणीतलें : तुं बोळवीत जाए : ना : हे ह्मणे : मज न वचवे : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : यांसि एथ असतां जें होइल : तेंचि तुह्मांतें तेथ असतां होइल : जा : मग : निगाली : पैठणा गेली : सारंगपंडितीं : चिरचोळी तोडु : घोडें : जनु : दीधला : गेलीं : तवं तीयें वाट पाहातें होतीं : हरखेलीं : आदरू केला : तेयांसि भांगार केलें : असों लागलीं : शांति

बाइसां स्तीति जाली : एकू दीस **एकाइसें** देव्हारेयावरि बैसलीं होतीं : स्तीति जाली : तियें ह्मणति : इचें पिसें गेलें : तें इस लागलें : मग : **एकाइसें** ह्मणति : मातें बोलावा : तियें ह्मणति : सेतासीवाराचे दीस : आह्मी आरावोंना : राहा साउला घेउनि : मग : बोळवीत **येउनि** : न न्हातीचि : निगाली : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : तुमची : **येई** : येत असे : तेंहीं ह्मणीतलें : जी जी : माझीं लेंकरूवें : माझी काढीली रेघ नोलांडीति : **पैठणा** इतुकेयां आली : बाइ : तुमची : **एइ** : आलीया : ना . जी : मियां तेयांतें ह्मणीतलें : असे : मि येइन : कां कोण्ही नीरोपू धाडीन : तेयां वांचौनि न यावें :**यळापुर** पातली : दारवठां पातलीं : बाइ: तुमची : **येइ** : आली : मां : मग दंडवतें घातलीं : श्रीचरणा लागलीं : हें काइ गे **येइ** : मीं गोसावीयांसि ऐसें ह्मणे : तुं कैसी आलिसी : **एकाइसीं** मागील अवघें सांघीतलें : **शांतीबाइसीं** ह्मणीतलें : हो गे आइ : तीये दीसींचि मज अस्तिति जाली : ऐसी सांगों लागलीं : गोसावी बाहिर वीहरणा बीजें केलें : वीहीरीचियें कडे : बोरी बाबूळ होती : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : **मासू दीसू बोरी बाबूळ सींपा** : हीराइसा : मग वोलिया पडदणिया : ॥ छ ॥ : शांति नगरीचा पाटु दीजैल : शांतिबाइसें नांव ठेवीजैल : सातां जन्मा : रामेश्वरबास :॥: तीं जन्मा : परशरामबास :॥: हस्तोदक घेइजैल : हो कां जी : उदयांसीचि उठीति : वोलिया पडदणिया बोरी बाबुळ सींपति : ऐसें मास दीसा केलें : सर्वज्ञें ह्मणीतलें : ह्मातारीएचीं कर्मे एथौनि जाळीतां न जळति : तें एथौनि नाशिलीं : मग सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : तुह्मीं **परमेश्वर पुरा** जा : हो कां जी :॥: सर्वज्ञें ह्मणीतलें : **गाउनि गांवां जावें : उपेणें न करावें : संबंधां न वचावें नवें वस्त्र न नेनसावें : ॥ : एकी भीक्षा घावी : इंद्रीयार्थ रसू न सेवावा** : श्रीप्रभूचां प्रसादु तीं बोटांतु सामाये : इतुला घेयावा : वायां जाइल तरि देयावा : पर तेथचीं चीमुटी मिठा नेघावी : शोधु : तेथ लागे तें बोणें करावें : तेथीचा पदार्थु घेइजेना : ऐसांहीं उरे : तरि उरों दीजे : **तेथचेयाचें असणें तो काशिएचा वासू** : ॥ : श्रीप्रभु जै लागे बोणें : ऐसा जें उरे : ती बोटीं : ॥ छ ॥ ऐसा वीधि वीहीला : मग तेहीं ह्मणीतलें : जी जी : माझी : **एइ** : गोसावीयांसि लागे हो : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : तुमचीयें **येइसि** एथौनि तल्हासें सावली कीजैल : शोधु :

नाइ : तुमचि **एइ :** एथ लागे : तल्हातें साउली कीजैल : उगीचि ठेली : सर्वज्ञें ह्मणीतलें तुमचीए **एइलीसि** तरि **देमतीएचा** सांघातु हो : होका जी : सर्वज्ञें ह्मणीतलें : **देमती** या : आलीं : देमती : तुह्मी यांसि सांघातु दीया : हो : हो कां जी : मग तेंहीं सांघातु दीधला : दंडवतें घातलीं : श्रीचरणा लागली : मग पुसीलें : पैठणेंहुनि जावों जी : सर्वज्ञें ह्मणीतलें : जा : **पांडेयासि** भेटा : तें तुमचें निमीत्य : निमीत्य मानिजे : ॥ : निगालीं : पैठणा गेलीं : सारंगपंडितांसी भेटलीं : गोष्टी करितां वेळु गेला : मग भींक्षेसि नीगालीं : सारंगपंडित राहावीत होते : पांडेया : एकी भीक्षा : गोसावी वारीली असे : पाठीं जेउं बैसलीं : तुप वाढुं बैसलें : पांडेया : इंद्रियार्थ रस् वारिला असे : नवें वस्त्र देवों आदरिलें : पांडेया : नवें वस्त्र वारिलें असे : एरी दीसीं राहावीत होते : पांडेया : उपेणें न करावें : ह्मणीतलें : असे : मग **परमेश्वरपुरा** गेलीं : बहुत दी : श्रीप्रभुची सेवा केली : ॥ २७ ॥ :

नाथोबा करवि टिळा जानिवें पुरवणें :॥: एकु दीस : गोसावीयांसि उदेयाचा पूजावसर जालेया नंतरें गोसावी **अनकैये** कडे बीजें केलें : आसन : जवळी नाथोबा होते : परशरामबास : चांगदेवो भट : रामेश्वरबास : सर्वज्ञें ह्मणीतलें : **वटिका** टिळा कां लावा : आणि जानिवें कां घाला : तेहीं ह्मणीतलें : जी जी : भिक्षा यावीया : सर्वज्ञें ह्मणीतलें : जा : टिळा : जानिवें : **अनकैये** पुरुनि बैसा : गेले : टिळा : जानिवें पुरिलें : तेथ बैसीले : गोसावी बीढारा बीजें केलें : हीराइसा : भटो तुह्मी एथचि राहा : मग बैसले : ॥छ॥ : नावेक जालें : आणि टिळा जानवें काढुं पाति : ऐसें वेळा च्यारि गेले : मग काढीलें : टिळा लावीला : जानिवें घातलें : तवं देवतेसि **परियेळु** आला : तेंहीं ह्मणीतलें : भटो घेयाल : घेयाले : **तांबटवटीए** तुप : घेतलें : आले : गोसावीयांसि दृष्टपूत केलें : सर्वज्ञें ह्मणीतलें : **पोरा : वेळोवेळां टिळया जानिवेयापासि कां जासि :** ॥२८॥ :

चांगदेवो भटा स्मरणें :॥: परमेश्वरपुरोनि आलेयां : चांगदेवो भटा गांवां नाणें नाहीं : माहाजनीं विनवीलें : जी जी : चांगोसी बहुत दीस लागले :

यांची माता खांति करीत असे : सर्वज्ञें ह्मणीतलें : बटिका : जा : भेटौनि या : हो कां जी : निगाले : सर्वज्ञें ह्मणीतलें : बटिका : हें परमेश्वरपुरा गेलें : तेया सांघातें आलेति : तेथौनि मागौतें आलें : तै सर्वेचि आलेति : आतां गावां जात असा : तरि हे तुह्मांसि आठवैल : जी जी : सर्वज्ञें म्हणीतलें : बटिका : दीसामध्यें हें वेळा : दाहावीस : आठवीजे : वेळा दाहावीस नाही : तरि : वेळा सात पांच आठवीजे : सात पांच नाहीं तरि दोन च्यारि वेळां आठवीजे : दोन च्यारि वेळ नाहीं तरि एकु तरि वेळ आठवीजे : **एक दोन वेळ तरि दोनि एकुवेळ आठवीजे : परि दिवसू वंध्यू जावों नेदीज** :॥२९॥:

दायांबा भेटि : स्तीति :॥: एकु दीस **दायांबा** गोसावीयांचेया दारिसनां आले : दंडवतें घातलीं : श्रीचरणा लागले : वैसले : स्तिति जाली : मग असंनिधानीं दायांबा : अखंड दुख करीतचि असति : दुखें डोळे कुहीजले : एकु दीस दायांबाए **स्वप्न देखीलें** : गोसावी स्वप्निं आले : ते रडों लागले : **भोजेया** : तुह्मीं दुख कां करीत असा : पोरें हो : हें केंहीं गेलें असे : हे सर्वत्र असे : **यळापुरीं** जालें : तें तुह्मां आठवत असे : हें वीसेखें यळापुरीं असे : ॥ ३० ॥ :

वीष्णूभटा परियेखु : ॥ : वीष्णुभट ते भलेतेयाचीं अप्राप्ति भावीति : एकु दीस गोसावीयांसि उदेयाचां पूजावस्वर जालेया नंतरें गोसावी **अनकै** कडे बीजें केलें : नावेक आसन : मग बीढारा बीजें केलें : विष्णूभटातें राहाविलें : सर्वज्ञें ह्मणीतलें : भटो : तुह्मीं एथ राहा : हो कां जी : ह्मणौनि राहीले : **अणकैये** बैसले होते : तवं देवतेसि **परियेळु** आला : तेंहीं ह्मणीतलें : भटो : घेयाल : हो कां : घेतलें : तांबवटी तुप घेतलें : आले : गोसावीयांसि दृष्टपूत केलें : सर्वज्ञें ह्मणीतलें : तुह्मीं दीसवडी अनकैये जा : तुह्मां परियेळु येइल : हीराइसा : तुमचें भविख : ऐसें दीसवडी बैसाल : तरि दीसवडि ऐसेंचि होइल : ना जी : ॥ ३१ ॥ :

नागदेवो भटा वेददान : ॥ : **पद्कर** नागदेवोभट ह्मणति : मज **संध्यातुल्य** तथा **गायत्रीतुल्य वेद होए** : ऐसें मीं गोसावीयांसि मागेन :

दरिसना एति : आणि : वीसरति : ॥ छ ॥ : एकु दीस गोसावी आसनीं उपवीष्ट असति : नागदेवो भट : पासीं बैसले असति : सर्वज्ञें ह्मणीतलें : भटो : एथ कांहीं मागा : जी जी : **संहिताक्रमु यावा :** सर्वज्ञें ह्मणीतलें : हें होइल : आणिक कांहीं मागा : जी जी : मज होंचि होआवें : सर्वज्ञें ह्मणीतलें : हें होइल हो : मग जालें : मग : ते **वेद** ह्मणताचि असति : **वेदु** तो तेयांसिचि निगे : मग **पद्कर नागदेवो भट** ऐसें नांव जालें : शोधु : पदकर नागदेवो भटां भेटि : सर्वज्ञें ह्मणीतलें : भटो : कांहीं एक मागा : पुढारले : हो कां जी : न टके : मग अस्तीति पोखली : बोलति ना : कुटुंबीचीं ह्मणति : पीसें लागलें : वोखद : । : भिक्षुकांसि एकाधां शब्द बोलति : ॥ ३२ ॥ :

राकेयां लक्ष्मींद्रभटा गंडकोदक प्रसाद ग्रहण : ॥ : एकु दीस गोसावीयांसि गुळळा : दंतधावन जालें : पासि रांके लक्ष्मीधर भट बैसले असति : तेंहीं गंडकोदक भीतरि घेतलें : सर्वज्ञें ह्मणीतलें : **ऐसें उदक नेघीजे कीं** घृणा नृपजैल : ॥ ३३ ॥ :

सारंग पंडीती वीनती :॥: **गदोनायेक चहुं रायाचे भांडारी**:ते कटकीं धरीले होते : तेंहीं सारंगपंडितासि निरोपु पाठविला : होता : पंडीतो : तुह्मीं गोसावीयांचेया दरिसना जावें : मा : गोसावीयांतें माझीये सूटकैयचें वीनवावें : मग सारंगपंडित वीनवावेया आले : दंडवतें घातलीं : श्रीचरणा लागले : रित (रिक्त) हस्त भेटले : बैसले : मग : वीनवीलें : जी जी : गदोनाएक कटकीं धरिले असति : मजनिरोपु धाडीला : मागील आवघें सांघीतलें : तरि तेया सूटि करावें जी : सर्वज्ञें ह्मणीतलें : तुह्मीं रीतहस्त भेटलेति : म्हणोनि **वरवड** जाइल : जीवें सूटति : तथा चुकति : परशरामबास : रिक्तहस्तेन न पश्येत्। राजानं देवतां गुरुं ॥ रामेश्वरबास : ॥ हीराइसा : सूटती परि वरवड जाइल : गोसावी आपणचि म्हणीतलें : तें कां पा : जें तुम्हीं रिक्तहस्त भेटलेति :॥छ॥: हे लीळा : रामेश्वरबास :॥: छीनपापी : सिंहस्थळीए वरि भेटी :॥३४॥:

तथा **रितुपें** कथन : ॥ : एकु दीस . सारंगपंडीत दरिसना नीगाले : तेंव्हळि **गदोनायकें** पुसिलें : सारंगपंडीतो : सीधजात असा : ना : **पळापुरा** :

गोसावीयांचेया दरिसना जात असों : मग गदोनाएकीं दोनि फळें दीधलीं : यें गोसावीयांसि दरिसन करावीं : आणि याचें नांव पुसावें : सारंगपंडित आले : दंडवतें घातलीं : श्रीचरणा लागले : फळें दरिसना केलीं : बैसले : मागील वृतांत सांघीतलें : गोसावी श्रीकरीं फळें घेतलीं : सर्वज्ञें म्हणीतलें : यें काइसेयाचीं फळें गा : कव्हणी काइसेयाची म्हणें : कव्हणी काइसेयाची म्हणे : ऐसीं आपुलालिया परीं नांवें ठेउं लागले : सर्वज्ञें म्हणीतलें : यें **रितुपें** : ॥३५॥ :

तथा केळें रोटी दर्शन : ॥ : दुसरा दीसीं सारंग पंडितीं रोटीया केलिया : केळें आणिलीं : तुप केलें : रोटिया जेविलें : उरलीं केळें रोटिया ते गोसावीयांसि दरिसन केलें : सर्वज्ञें ह्मणीतलें : **पांडेया** : एथ उसीटें केळें रोटी : संपादीत असा : उगेचि राहीले : ॥ ३६ ॥ :

गोपाळ पंडीता पारधी नीरोपणें : ॥ : गोसावीयांसि उदेयाचा पूजावस्वर जालेया नंतरें पटिसाळेवरि बाइसीं आसन केलें : मग आसनीं बैसले असति : **गोपाळपंडित ते रायाचे** वक्ते : बरवें बोलों जाणति : गोसावीयाचेया दरिसना आले : सरिसे सारंगपंडित आले असति : दंडवतें घातलीं श्रीचरणा लागले : बैसले : सर्वज्ञें ह्मणीतलें पांडेया : हे कोण : जी जी : माझे मैत्र : हे **शास्त्रवक्ते** : हे बरवें बोलों जाणति : सर्वज्ञें ह्मणीतलें : **ऐसें कांहीं ग्रंथाधार : कीं : उबेणें :** जी जी : उबेणें ऐसें बोलति : शोधु : सर्वज्ञें ह्मणीतलें : ग्रंथवक्ते कीं उबेणें बोलति : सारंगपंडितीं म्हणीतलें : जी जी : **स्थानीवक्ते** : बोला पां **जाड : वाड : कोड : कवतीक : सावजाचा उठावा** : **धुरेचा लाडु** : ऐसें बोलिलें : मग आपण निरोपिलें : **सावजाचा यावा** बोलिले : तेव्हाळि **राजकें** मुख्य करूनि जेतुलेही आले होते : तेतुकेयांसि लेणें फोडुनि पळावें : **ऐसा भयानकु अवतरवीला** : भक्तजन भीयाले : मग **धुरेचा लाडु** बोलतां : राजकेयांचिया **कडीदवेया** वीर हात पडीले : भक्तजन सन्मुख जाले : **ऐसा वीररसू अवतरवीला** : तेहीं म्हणीतलें : जी जी : हें परीसों नेणीजे : मा **बोलौनि** काइ :॥३७॥:

पस्यात पाहारीं गोसावी परिश्रया बीजें केलें : मा : आले : आसनीं बैसलें बाइसीं **सीळीका** वोळगवीलीया : जिव्हामळ फेडीले : तें गंडकोदक लक्ष्मीधर भट सांडुं गेले : तेथ तो प्रसाद घेतला : आले सर्वज्ञें म्हणतीलें ऐसे उदक नेघीजे कीं : हीराइसा . जी जी : घेतलिया काइ होइल : सर्वज्ञें ह्मणीतलें : हाड गदलेया पापा पुरश्चरण होए : ना हा : घृणा जरि उपनली : तरि नाहीं : तेया परतें पाप होए : ॥ ३८ ॥ :

शंकर लेणा बोनें कथन : ॥ : एकु दीस : गोसावीयांसि उदयाचा पूजावस्वर जालेया नंतरें शंकरलेणासि बीजें केलें : तेथ आसन : बाइसीं ह्मणीतलें : बाबा : हे केसना दारवठा : हें केसणें लेणें : सर्वज्ञें ह्मणीतलें **या देउळासि : तथा : देवतेसि : हातिवरि बोनें ये :** अवघेयासि वीस्मो जाला : ॥ ३९ ॥ :

पेखणें कथन : ॥ : एकु दीस : गोसावीयांसि उदयाचा पूजावस्वर जालेया नंतरें गोसावी **माणिकेश्वरा** बीजें केलें : लेणेयाचां द्वारीं उभें राहीले : तथा माणिकेश्वरीं चौकीं आसन : सर्वज्ञें ह्मणीतलें : एथ **पेखणें** होत होतें : तें चोरीं नेलें : **नीवरें वीवरें** नेलें : अवघेयासि वीस्मयो जाला : ॥ ४० ॥ :

माहादेवो राज्यप्रशंसा : ॥ : एकु दीस : राज्यधर्मांचिया गोष्टी निगालीया **माहादेओ राजा राज्यधर्म जाणे : कान्हर देवो आस्तिक : रामदेवो निपरवस** : ॥ ४१ ॥ :

इंद्राइ सांडाक्रमु जाणति : ॥ : एकु दीस : गोसावीयांसि उदयाचा पूजावस्वर जालेया नंतरें : गोसावी आसनीं बैसले असति : तवं **इंद्राइ** माहात्मे आले : **आदेशू** केला : **सिक्षा** केली : बैसले : नावेक होते : मग नीगाले : भक्तजनीं ह्मणीतलें : जी जी : हें काइ जाणति : सर्वज्ञें ह्मणीतलें : **इंद्रा जोगी : सांडा क्रमु जाणे** : ॥ ४२ ॥ :

राजादरिसन स्वीकार : ॥ : **राजके** अवघेचि **कटकींनि** गोसावीयाचेया दरिसना एति : **माहादेवो रावो** सभा मंडपासि आला : तवं

नावा रूपाचा येकूही सभामंडपीं नाहीं : तेव्हाळि कोपुनि माहादेनि रायें पुसिलें : हां गा : जो जीये **वोगळीचा** तो तीयें वोळगीं न देखों : तुह्मीं अवघे के जातां : तेहीं ह्मणीतलें : नाभियें देसी : तरि **सांघौनि** : सांघा : ना : यळापुरीं : जे पुरूखु असति : तेयाचेया दर्शना जात असों : तेयां नांव काइ : ना : श्री चांगदेवो राउळ : गोसावी : इतुलेनि वेधु संचरला : तरि आह्मांसि तेयांचें दरिसन कराल : हो कां : **पाल्हा डांगिया** सांघों आला : जी जी : **गोसावीयाचेया दरिसना रावो येत असे** : गोसावी स्विकरिलें :॥४६॥:

तथा गमन : ॥ : एकु दीस रायें आइत केली : गोसावीयाचेया दरिसना निगाला : तवं पाटाचा हाति पडिला : तथा मेला : तो अपशकुन जाला : ह्मणौनि : परतला : तथा प्रतविला (परतविला) : पाल्हा डांगीया आला : तेणें सांघितलें : जी जी : रावो येत होता : तवं हाती पडीला : मग रावो परतला : एकु दीस : मागौता रावो नीगाला : तवं पाउसू पडीला : मग मागौता परतला : तिसरिये वेळे : रावो निगालाचि : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : **माहादेवो पात्र : एथीचेया दर्शना एइल** : राज्य संपादील : **आपण सेवक होउनि वर्तैल** : बाइसीं ह्मणीतलें : हो कां : बाबा : सर्वज्ञें ह्मणीतलें : पोरें हो : तरि तुह्मीं रिगों नल्हा : तथा हीराइसा : पोरें हो : मग तुह्मीं कडे पडाल कीं : ॥ छ ॥ : बाइसीं ह्मणीतलें : नको बाबा : सर्वज्ञें ह्मणीतलें : तो दीवसू एथेंनिनिल : तुह्मीं आपुली आइत करा : बाइसीं अवघीं आइत केली : गोसावी नीगालें : ॥ ४४ ॥ छ ॥ ॥ छ ॥

तथा वार्ताप्रसंगें परशरामबास : ॥ : **मा तखेडा** वसति : रामेश्वरबास :॥: **इटखेडा** वसति जाली : गोसावी आसनीं बैसले असति : बाइसें उदकपात भरूं गेली : तवं **पाणिवथाचिया** बाइया गोष्टी करूं लागलीया : हा वो : आजी लव-चिकरी आलीयाति : तें काइ : ना दीसवडी कटका जातां उसीरू लागे : तेहीं ह्मणीतलें : **रावो येळपुरा पुरुखाचेया दरीसना आला** : ते दहिदुध तेथेंचि वीकलें : ह्मणौनि लवकरि आलों : तें बाइसीं आइकीलें : तें गोसावीयां पूढां सांघितलें : बाबा : पाणिवथा बाइला गोष्टी करिती होतीया : मागील वृत्तांत

सांघीतलें : बाबायें ह्मणीतलें : तें : साच जालें : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : तुमतें ह्मणीतलें कीं दीसु एथोनि नील : ॥ १ ॥ :

रामेश्वरबास : **लासौरी** वसति : ॥ २ ॥ : परशरामबास : **घोगर-गांवीं** वसति : ॥ ३ ॥ : **डोमेग्रामीं** वसति : ॥ ४ ॥ :

मार्गी **डखलेया सुवर्णहाटि** कथन : ॥ : मार्गी वेचु सरला : बाइसीं ह्मणीतलें : बाबा वेचावेया नाहीं : सर्वज्ञें ह्मणीतलें : **पोफळफोडना गाहाण** ठेवा : बाइसीं ह्मणीतलें : ऐसें कीती दी कीजैल : बाबा : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ एथ जरि प्रवृत्ति होए : तरि हे आवघी हाटी सोनेयाची न किंजे : पोरे हो : तुह्मीं नुरा : ॥ : बाइ : एथ तैसी प्रवृत्ति नाहीं कीं : परशरामबास :॥: **डखला** पोटी ऐसें केलें : जें गांवा जाइन : मग कांहीं गोसावीयांलागि वेचावेया आणिन : सर्वज्ञें ह्मणीतलें : काई गा **डखलेया** : मनोर्थु राज्य कीजत असीजे : जी जी : सर्वज्ञें ह्मणीतलें : एथ तैसी प्रवृति नाहीं कीं : एथ जरि प्रवृत्ति होए : तरि हे अवघी राहाटि सुवर्णाची न किजे : पोरें हो : तुह्मीं नासाल : रामेश्वरबास : । : शोध : पोरें हो तुमतें कांहीं नुरें : ॥ : मग पोफळफोडना गाहाण ठेवीला : वेचु आणिला : उपाहारू निफजवीला : आरोगणा जाली : गोसावी आसनीं बैसले असति : तवं तो वाणिया आला : गोसावीयांतें देखीलें : दंडवतें घातलीं घातलीं : श्रीचरणा लागले : मग ह्मणीतलें : पोफळफोडना तो या गोसावीयांचा नाहीं : गोसावीयांचा ठाइं कांहीं वोळगवीलें : **डखलेया** या : मा : तो पोफळफोडना घेउनि या : गेले आणिला : ॥ ४ ॥ :

यरंडबन उपाहारू : ॥ : मार्गी गोसावी बीजें करितीति : तवं पुढें एकें वोस गांवीं येरंडाचें बन देखीलें : मग बाइसीं ह्मणीतलें : बाबा हें कवणें गांवीचें बन : तथा बावा कैसें बरवें आंबेयाचें बन दीसतु असे : गोसावी उगोचि राहिले : गांवांपासि बीजें केले : मग ह्मणीतलें : बाइसाचें बन तें येरंडाचें कीं : परशरामबास : हें घेया गा डखलेया : बाइसाचें येरंडबन : रामेश्वरबास : ॥ : इतुलेनि **डखले** हासों लागले : कैसें आंबेयाचें बन : शोध : बन काइ गा : कैसें आंबेयाचे घड लागले असति : ऐसें **चीपलाचो** लागले : ॥ ५ ॥ :

भगतां **श्रीनगर** दाखवणें :॥: गोसावी श्रीनगरासि बीजें करित असति : तवं बाइसीं **अडवांगौनि** बरवे वृक्ष : बरवीं देउळें देखीलीं : मग पुसीलें : बाबा : हें कवण नगर : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : हें **श्रीनगर** ॥ ६ ॥छ॥

भीलमढीये अवस्थान : ॥ : शोध : भीलमढीये आंतु देवतेपूर्वे उत्तरा-मूख आसन : ॥ १ ॥ :

स्वयंनामगोपन : ॥ : **माहादेवो रावो ठाणेया** कटकै गेला : होता : तो **खिनरा** आला : तेणें ह्मणीतलें : हें नगर बरवें : तरि एथ गोसावी असति : ह्मणौनि : **पाल्हा** डांगेयातें पाहों धाडीलें : ते अवघीं देउळें पाहुनि : भिलमढीयेसि आला : एथें काइ असति : हा धाकुटा मह्रू : ह्मणौनि : आपण बाहीरि राहिला : जतु : पाहों धाडीला ; दुपाहाराचां पूजावस्वर जालेया नंतरें आरोगण : गुळळा : वीडा : पहुड : उपहुड करूनि सोरठिए जाडीचें प्रावर्ण करूनि : गोसावी **मदळसेसीं** उभे असति : तवं तेणें पुसीलें : **श्रीचांगदेवो राउळ : गोसावी** : एथ असति कीं : सर्वज्ञें ह्मणीतलें : माति : **मा इहां कोइ नथी** : कांहीं नथी : **कमलाइ** : शोधु : उंहु नाहीं : बाइ एकी थी : भिक्षा हउ इहांछों : हीराइसा : चांगदेवो राउळ नेणों : बागदेवो राउळ नेणों : मातारी (ह्मातारी) एकी छे : ते गावमां हें भिक्षामागन गैइ छे : हउ इहां अछों : तथा : माहातुमे बाहातुमे कांहीं नथी : हउ इहां छों : मग गेला : ॥ २ ॥ :

उमाइसां भेटि : ॥ : **आबाइसाचा** वडिलु पुत्रु : **सारंगपाणि** होता : तो सरला : तेणें दुखें **रावसगांवीं** भटोबासीं गुंफा केली : ते तेथ राहीली : मग : तेथ **दादोस** आले : दादोसातें भीतरि देखीलें : आणि **तमले** : दारीं वाहाणा होतिया : तिया बाहीरि टाकीलिया : दादोसीं घोंगडें घेतलें : जाउनि बाहिरिल वडाखालि बैसले : **उमाइसें** तेयातें देखौनि पळाली : निकें करीत असा हो **आबै** : याचि कारणें तुह्मीं येथें गुंफा केली कीं : हें काइ **नागदेया** : दादोस निकें माहात्मे : या पासौनि आनंदु होए : होइल मां काइ : **रूपैयेसि उमैयेसि** होइल : हे तरूणेधारे : याही तरुणीया : धारीया : अस्त्रीयेसि पुरुषापासौनि होइल : आणि काइ : ऐसें कैसें ह्मणत असासि : तरि

मज हो पां : मग : जाणों : **आबैसीं** ह्मणीतलें होइल : ॥ : आतां बोलावीलेयां येती : नां हो : एति : तरि : माहात्मे होती : जरि बोलाविलेया न येति तरि नव्हेति : गेले : माहात्मे हो : तुमतें **आबाइसें** बोलावितें असति : घोंगडें घेतलें : वाहाणा घेतलीया : आले : **आबैसी** ठाये केले : दादोसाचिए पांती : भट : जेवीलें : मग : दादोस गंगेकडे गेले : **आबैसी** ह्मणीतलें : **नागदेया :** ऐसा दादोसाकडे जाये : गेले : तवं ते बैसले असति : जावों : तेयां जवळि पुसीलें : ह्मणें : तुह्मां पासौनि आनंदु होए : ना : आह्मां पासौनि होए : ऐसेंहीं आति : नव्हे : ऐसेंहीं आति : आमचेया गोसावीयां पासौनि होएचि : आणि : स्तिति भोगीली : भंगली : मग दादोसाचें घोंगडें घेतलें : दोघै बिढारा एत असति : ते तुमचे गोसावी कव्हणीकडे असति : ना : **सीनगरीं** असति : तेयाचेया दरिसना आमतें नेयाल : ना : **नेउनि** : तुह्मीं कै जाल : ना : पर्वा लागौनि **जाउनि :** आमचेयां गांवां या : मा : तेथौनि जावों : हो कां कैं याल : ना : अमुका दीसीं **एउनि :** ऐसा **सीधु जाला** : **आबैसातें** घेउनि या : हो कां मग **आबैसें उमाइसें महदाइसें** : **दादोस** : ऐसीं **साडेगांवां** आलीं : दादोसातें पाहुणेरालागि ह्मणीतलें : **पाहुणरू** केला मग दादोस गंगे गेले : **वाहाळुवंटीं** बैसले असति : भटोबास आले : पुढां बैसले : आणि : **स्तिति** जाली : एकांचेनि मतें : **राउसगांवींचि** दादोस बीढार निगाले : भटोबासि हातीं करवंटी घेतली : घोंगडें घेतलें : **उमैसीं** ह्मणीतलें : **रूपै** : दादोसा पासौनि नागदेयासि कांहीं गोमटें जालें : मग **दादोस : आबैसें :** **उमाइसें : महदाइसें : यल्हंभट** : ऐसे गोसावीयाचेया दरिसना निगाली : **सिनरा** आली : **भिलमढीये** सेजें बीढार केलें : उमाइसीं ह्मणीतलें : **रूपै** : दादोस नागदेव जवं पानें पोफळें घेउनि येती तवं दादोसाचे गुरू पाहुनि येवों : हो कां ह्मणौनि गेलीं : गोसावीयासि आरोगण : पहुड : उपहुड मा आंगणीं वेढें करित असति : गेलीं : देखीलें : गोसावीयांची श्रीमूर्ति पाहातेंचि ठेली : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : या कोणी कडौनि येति असती : तेंहीं ह्मणीतलें : **रावसगांवां** कडौनि : कोणिकडे जाणें : ना : त्रीयंबकाकडे : **रावसगांवींचे माहादेवो** पाठक ब्राह्मणु असे कीं : असे : हीराइसा : जाल तैं ऐसे ह्मणावें :

हें तुमतें पुसत होतें : ॥ छ ॥ : बाइसीं पुसीलें : बाबा : आपण केंवी जाणिजे : बाइ : एथ पाणिभातु : बाबूळसेंगा : संपादिलीया : बाइ : एथीचे एजमान : हीराइसा : बाइ : तो एथीचा एजमान : एथ पाणिभातु बाबूळसेंगा आरोगणा दीधली : ॥ छ ॥ : मग तीयें बीढारा गेलीं : ॥ ३ ॥ :

देवां भटां भेटिः ॥ : मग दादोस पानें पोफळें घेउनि आले : मग आवघींचि गोसावीयांचीया दरिसना आलीं : मग दादोसा मढीये आंतु भेटि जाली : गोसानी दादोसांसि खेंव दीधलें : दादोसीं दंडवतें घातलीं श्रीचरणा लागले : येरीं अवघां दंडवतें घातलीं : उमाइसें महदाइसें श्रीचरणा लागलीं : सर्वज्ञें ह्मणीतलें : त्रीयंबक बाइया एथींचेयाचि : मा : अवघीं बैसलीं : ॥ छ ॥ ४ ॥ :

भटां तांबूळ ग्रहण : ॥ : गोसावी तांबुळ परित्यजीलें : मग बाइसीं श्रीमुखीचे तांबुळ अवघेयांसि प्रसादु दीधला : दादोसीं मागांचि भटोबासातें वारिलें होतें : **नागदेया** : गोसावी आमचे गुरु : ह्मणौनि : आह्मीं तांबोळ **घेवौंनि** : तुवां नेघावें हो : तांबोळ दीधलें तेव्हळि तेहीं वीचारिलें : जरि ईश्वरपुरुषु होती तरि आह्मांसि गोमटें होइल : ना : तरि : आह्मीं थोडे याचें तांबुळें घेतलें असे : ह्मणौनि : घेतलें : आणि : स्तिति जाली : ॥ ५ ॥ :

तथा स्थित्यांतर : ॥ : अस्तिति भोगीली : मग केतुलेया एका वेळां भंगली : मग गोसावी **भटोबासातें** पुसीलें : महात्मेयां पासौनि सुखस्तीति आति : हीराइसा : तथा भटो : तुह्मां माहात्मेयां पासौनि सूखस्वास्थ्ये आति : ॥ छ ॥ : जी जी : **सांपे** कणु एकु अधिक : सर्वज्ञें ह्मणीतलें : तें नव्हें : हें स्थीत्यांतर : हीराइसा : एथौनि तुह्मां स्थित्यांतर : गा : ॥ छ ॥ ६ ॥ :

तथा श्लेष्मा हरणीं अभ्यासू नीराकरण : ॥ : गोसावी बाहीरि बीजें केलें : तवं **भटोबास** पैलाकडौनि येत होते : गोसावी पुसीलें : कें गेले होतेति : जी जी: श्लेष्मा झाडुं **गेलां होतां** : सर्वज्ञें ह्मणीतलें : जें तुह्मां जालें असें : तेणें सिंवनीं रांड नव्हे : तथा मुंगीं : मा : श्लेष्मा काइ झडैल : ॥ ७ ॥ :

दमनिका रोपणीं **डखलेया** स्तीति : । : ऐसा एकू दीसु : पर्वांचा दीसु आला : अवघीं : पानें पोफळें दवणा आणिला : अवघीं न्हाणिलीं : गोसावीयांसि **बाइसीं** मादनें केलें : पुजा केली : तंव दादोस सीक्षांसीं आले : गोसावीयांसि दवणा वाइला : दंडवतें घातलीं : श्रीचरणा लागले : बैसले : सर्वज्ञें ह्मणीतलें : **डखलेया :** येथ एहीं अवघां पर्व केलें : तुह्मीं न करा तें काइ : ना जी : मातें दवणा नाहीं : यें दैवाचीं : यांतें करावीया असे : मातें कांहींचि नाहीं : जी जी : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : आणा दवणा : शोधु : वोपा : बाइसीं दवणा दीधला : माळ तांबुळ : हीराइसा : तथा हें देइल : बाइ : यांसि दवणा वोपा : आणि वीडा वोपा दीधला : ॥ छ ॥ : **डखला** वाइला : गोसावीयांसि दवणा वाइला ; वीडा वोळगवीला : आणि स्तिति जाली : मग उगेचि बैसले : सर्वज्ञें ह्मणीतलें : हां गा : उगीयांचि असीजे : ऐसा एकु मार्गु आति : शोध : मोक्ष मार्गु : हीराइसा : हां गा उगीयांचि असीजे : ऐसा कोणु मार्गु : ॥ छ ॥ तेहीं ह्मणीतलें : जी जी : आति : तथा : ना जी : ऐसाही एकू मार्गू : अति : **उघाणी** प्रवर्तली : सर्वज्ञें ह्मणीतलें : तरि तुह्मीं माहात्मेना : हीराइसा : ऐसें ह्मणे : तरि तुह्मीं माहात्मे ह्मणा : तथा तुह्मीं माहात्मे कीं गा : आणि स्तीति भंगली : ॥ ८ ॥ :

डखलेयांसि खेळ : । : उदयाचा पूजावसर जालेया नंतरें गोसावी वीहरणा बीजें केलें : डखले पाटु उडो बैसले : आणि गोसावीयांते **बखलिती** : उडों नेदीती : मागुतें उडों निगती : गोसावी तेयांतें परतेंचि लोटिति : आवधी श्रीमूर्ति पाणियेंसीं तोडली : देव ह्मणति : मर मरा : डखलेया : जेणें जेणें नरका जा : तें तेंचि करीत असा : गोसावी ईश्वरू : गोसावीयांसि खेळु काइसा : सर्वज्ञें ह्मणीतलें : यातें कां गा ह्मणत असा : हीराइसा : कोपत असा : ॥ छ ॥ : हें एथुनिचि करूं आवडत असे कीं : ॥ ९ ॥ :

तथा पादव्यथा संबोखू : । : पाटु उडतां डखलेयाचा पात्रो अवटळला : तो रात्रीं दुखों लागला : वीवळति : परुवति : उदीयांचि गोसावी परिश्रया बीजें केलें : बाइसीं ह्मणीतलें : डखलेया : **सागळ** घे : बाबा सांघातें जाय :

हीराइसा सर्वज्ञें ह्मणीतलें : डखलेया : सागळ घेया : ॥छ॥ : **डखला** ह्मणीतलें : जी जी : मी गोसावीयांसि रूसलां : सर्वज्ञें ह्मणीतलें : कां गा : गोसावी मातें पडिताळीतिचि ना : सर्वज्ञें ह्मणीतलें : तुह्मी माहात्मे कीं गा : तुह्मा सकळै :॥छ॥: तथा माहात्मेनि सकळै : भोगे नी मानावे कीं : । : हीराइसा : कां गा रूसलेति : तेहीं ह्मणीतलें : गोसावी सांभाळीतिचि ना : तुह्मी माहात्मे कीं गा :॥१०॥:

माहादाइ राहावणें : ॥ : गोसावी महदाइसां ह्मणीतलें : बाइ : एथ राहों आवडैल तरि राहाना कां : तेहीं ह्मणीतलें : जी जी : सांघातु नाहीं : सर्वज्ञें ह्मणीतलें : वृद्धा बाइसा : आणि : तुह्मां सांघातु : हीराइसा ह्मणीतलें : तथा बाइ तुह्मी राहा : जरि तुह्मी राहाल तरि तुह्मा सांघातें वृधाबाइसें : राहावीजति : ॥छ॥: एथौनि कोण्ही येक : बोळवीत धाडीजैल : तें न ऱ्हातीचि : ॥ ११ ॥ :

अवडळ नाम करणें : । : एकु दीस गोसावीयांपासि बैसली असति : गोसावी एरातें अवलोकीति : ऐसीं गोसावी पृथकीकारें अवघींचि अवलोकीतिं : एक **एल्हंभट** वांचौनि यरा अवघेयां स्तीति जालिया : सुख भोगीत होते : येल्हंभटीं ह्मणीतलें : जी जी : इतुकेया आंतु : मीचि एकु अवडळ : सर्वज्ञें ह्मणीतलें : तरि तुह्मी अवडळभट ह्मणा : हीराइसा : ऐसे तरि तुह्मी : ॥ छ ॥ : आणि स्तीति जाली : ॥ १२ ॥ :

गोंदेश्वरा पुढें **पद्मेश्वरू** कथन : । : एकु दीस : गोसावी उदेयाचां पूजावस्वर जालेया नंतरें वीहरणा बीजें केलें : गोंदेश्वराचा देउळीं : बाळाणेया-वरि : आसन : बाइसीं पुसीलें : बाबा : **देउळापुढें देउळ काइसें** : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : मागां गोवींद नामें **वेव्हारा** : तेणें केलें : ह्मातारी एकीचा पुत्र : तेया नांव पद्मा : तो ऱ्हातु होता : तो हाटा जावेयाचिया लवड सवडा : लवकरि पाणीं सारविलें : माया ह्मणीतलें : हो हो जासी : मां : जोडुनि घेउनि एसी : ऐसा वेगु करुतोये : काइ : **गोंदेश्वरा पुढें पद्मेश्वरू करील** : तैसाचि तो नीगाला : पैऱ्हां ऱ्हाला : तेलंग देशा गेला : द्रव्य जोडीलें : मग देउळ करविलें : देउळासि **उद्यापन** जालें : मग आपण आला : मायेतें पुसों धाडीले : गोंदेश्वरापुढें पद्मेश्वरू केला : आतां मी येवों : ॥ छ ॥ : हीराइसा : तथा

गोंदेश्वरीं गोसावीयांसि आसन : सर्वज्ञें ह्मणीतलें : जा ना पा गा : हें देउळ काइसें : कव्हणी कांहीं ह्मणे : कव्हणी कांहीं ह्मणे : सर्वज्ञें ह्मणीतलें : **अभिमान-कार्यें गा :** पद्मा नावें बटिकु : तो आपुला घरीं न्हातु होता : तो डोइए चोखणी लावीली होती : पाणिया कारणें बोबावों लागला : माया म्हणीतलें : ऐसा लवडसवडी करीतु जससि : काइ गोंदेश्वरापुढें पद्मेश्वरू करीसि : तैसाचि डोइचा जुडा बांधला : बांधौनि निगाला : तो तेलंगदेशासि गेला : तेथ अपार द्रव्यें जोडीलें : आला : मग : गोंदेश्वरापूढें पद्मेश्वरू केला : मायेसि म्हणितलें : आइ मियां गोंदेश्वरापुढें पद्मेश्वरू केला : आतां मातें न्हाणि : **हें अभिमान कार्यें : ते दोघे भाचे मेहुणें**: एके म्हणति : **मामे भाचे** :॥१३॥छ॥:

नासीकीं पंचवटीये गुंफे अवस्थान : दीस दहा :।: उदास्य स्त्रीकारू : शोध : **आरतिये नंतरे** गोसावीयांसि **रामाचां देउळीं** आसन : परशराम-बास : **पंचायातनाचा** देउळीं आसन : रामेश्वरबास : गोसावी भक्तजनातें ह्मणीतलें : तुह्मी एथौनि अवघे जागा : हें एकाकी असैल : तुह्मी एथींचियें प्रवृत्ति विखो हो जाणाना : तुह्मा एथ असतां आनिष्टाचि होत असे : तुह्मी एथ काइसेया असा : ते उगेचि होते : सर्वज्ञें ह्मणीतलें : तुह्मी न वचा : तरि : हेंचि जाईल : मग उदकामध्यें रिगाले : सर्वांचि बाइसें रीगालीं : बाइसां पाणी बहुत आलें : आणि : बाबा : ह्मणौनि बोवाइली : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइसां हातीं केहींचि जावों न लमे : मग **कपाळेश्वरीं** आसना : **तिमलीं** : वस्त्रें फेडिलीं : आणि आणिकें वेढीलीं : मग अवघीं भक्तजने उगीचि बैसलीं होतीं : गोसावीयाचां ठाइं उदास्य देखीलें : पुढां रिगवेना : मग बाइसीं आरोगणा लागि वीनवीलें : हीराइसा : गोसावीचि ह्मणीतलें : बाइ एथ पूजावस्वरू कां न करा : हो कां बाबा : ॥छ॥ : मग **कपाळेश्वरा अडवागीं** गुंफा होती : तेथ पूजा : आरोगणा : रामेश्वरबास : तेथ उदास्य परिहरलें : परशरामबास :॥छ॥ १ ॥ : **गोवर्धनीं** वसति : ॥ २ ॥

त्रीयंबकीं अवस्थान : । : गोसावी त्रीयंबका बीजें केलें : त्रीयंबका वीडा वोळगवीला : जगती आंतु गुंफे अवस्थान जालें : दीस तीन : ॥ १ ॥

गंगाद्वारीं बडुवा संबोखू : । : गोसावी गंगाद्वारा बीजें केलें : तेथ आसन जालें : तवं **कोळाइचां** बोंबींहुनि पाणी निगत असे : तेथ **डखलां** आगुळी सूदली : उभे गंगातीरें गांवों नेसी आतां माझी आंगुळी ने पां : सर्वज्ञें म्हणीतलें : **डखलेया** ऐसें न म्हणींजे : कीं : देवतेसि : ॥ १ ॥

खालि पाणिया अंडीं भरें : ते पाणी डखला अवघें सांडीलें : हीराइसा : **नरसींहाचां देउळीं** : आसन : वासना : मठाचां द्वारीं : गोसावी वेढे करीत असति : तवं बडुवा गाऱ्हाणेनसीं आला : देखीलें जी : येइं अवघें पाणी सांडिलें : एथ आम्हा कांहीं मिळे : सर्वज्ञें म्हणीतलें भटो : तुम्हां दीसवडी काइ मिळे : जी जी : दामू एकु : रुत्रे तीन : मिळति : सर्वज्ञें म्हणीतलें बाइ : येकु दामू वोपा : डखला म्हणीतलें : हां जी : हें काइ गोतमाचे दाइ : मग एकु दामू वोपवीला • ॥ छ ॥ २ ॥ :

ब्रम्हगिरीवरि गोटेभाळां उदंबरें आरोगळ : । : मग गोसावी ब्रम्हगीरीवरि गोटु माळेया बीजें केलें : पाळीवरि उंबरू पीकला होता : तेथ आसन : उदंबऱ्हें : पीकलीं होतीं : सर्वज्ञें म्हणीतलें : कां गा : पींड प्रदान वर्तेना :॥: हीराइसा : हांगा माहात्मे हो : पींड : ॥ छ ॥ : हो कां जी : मग अवघां भक्तजनीं उदंबराचिया रासी केलिया : गोसावी श्रीकरीं उदंबर घेतलें : आरोगीलें : शोधु : **कानडी लुखाइसें** : सर्वज्ञें म्हणीतलें : ब्रम्ह गोळकु ऐसा असे : हीराइसा : सर्वज्ञें म्हणीतलें अफोडी उदंबरू खाइजे : तें ऐसें : म्हणौनि : श्रीमुखीं उदंबर घातलें : ॥ छ ॥ : आणि अवघां भक्तजनीं धाएवरी उदंबरें खादलीं : सर्वज्ञें म्हणीतलें : या गौतमाचीया भातवडीया गा : हीराइसा : हा सीतेचा कोथळा गा : ॥ छ ॥ : एकाचेनि मतें : गुपीत त्रीयंबकीं आसन : ब्रम्हगिरीवरौनि बीजें केलें : ॥ ६ ॥ :

आंजनीये वसति : ॥ १ ॥ : **नासीकीं** नगरांतु वसति : ॥ २ ॥ :

पंचवटिके गुंफे अवस्थान : । : दिस ती : । : गोसावीयासि उदयांचां पूजावस्वर जालेया नंतरें : **रामाचेया** देउळां बीजें केलें : तेथ आसन : सर्वज्ञें

ह्मणीतलें : आवघें तुह्मी एथौनि जा गा : हें एकाकी असैल : तुह्मी एथीचींये प्रवृत्ति वींखो हों जाणाना : तुमचा एथु निरोधु कीं : तुह्मां एथ असतां : अवीधु होत असे : तुह्मी एथ असतां आनिष्टचि होत असे : तुह्मीं एथ काइसेया असा : तुह्मीं जा : ते आवघे उगेचि राहीले : सर्वज्ञें ह्मणीतलें : **चांगो** : हे कव्हणी न वचति : तुं जाए : तुह्मी आदि होए : ॥ हो कां जी . ह्मणौनि **चांगदेवो भट** नीगालें : बाइसीं ह्मणीतलें : तें कव्हणी न बचतीचि : तरि यातें कां पाठवीजत असीजे : बाबा : गोसावी उगेचि : दुसरा दीसीं सर्वज्ञें ह्मणीतलें : तुह्मीं कव्हणी न वचा : तरि : चांगोसेंचि काइ केले : **उखलेया** जा : चांगोतें बोलावा : बाइसीं ह्मणीतलें : तो काइ एइल : बाबा : यासी काइ भेटत असे : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : याची यात्रा काइ निर्फळ जाइल : हीराइसा : जावो कीं बाइ याची यात्रा : ॥ छ ॥ : बाइ बापुडीं **बापुडीं बटीकें** डोगरें डोंगर गीवसीतें असति : शोधु : लंघीतें एतें असति : येथचें दर्शन घेयात्रीया : मग गावां जावें ऐसा परिछेदु केला असे : बाइ तथा : बापुडीं झाडा खेत्रें देतें एतें असति : एथचें दर्शन घेयावें : ऐसें केलें असे : ॥ १ ॥ :

उपाध्या नाथोबा भेटि : । : **उखले** गेले : **चांदोरी अग्नीष्टीके** जाडि आड बांधली : मग तेथ पाठी घातली : उपाध्ये नाथोबा पर्वाकारणें न टकेचि : मा : गोसावीयातें गीवसत एतें असति : **सिनरा** आले : **भिलमढीये** संन्यासी होते : तेयातें पुसीलें : एथ आमुचे गोसावी होते कीं : काइ कराल : गोसावी : ब्रह्मवीद्या तरि **आह्मी सांघौनि :** तेंहीं ह्मणीतलें : आह्मीं काइ तुमतें ब्रह्मवीद्या पुसत असों : आह्मी आपुलेया गोसावीयांतें पुसत असों : ऐसीं गा बटीकुरें चाळवीली असति : तरि : आह्मांसि दंडवत करा : मां **सांघौनि** : तेंहीं ह्मणीतलें : आधीं सांगा : मग दंडवत **करूनि** : कैसीं गा बटकुरें आग्र-हाचीं : मग : दंडवत केलें : जा तुमते गोसावी **सत्रसिंगा** गेले असति : निगाले : मग वीचारीलें : डोंगरा आंतु जावों नये तरि : **चांदोरीं** पांगुरणें ठेउं : मग : जावों : ह्मणौनि चांदोरीं आले : तवं गोसावीयाची जाडि देखीली : मग ह्मणीतलें : हे जाडि गोसावीयांची नव्हे : ह्मणौनि : आले : हें काइ **उखलेया** : गोसावी कव्हणें ठाइं असति : तेंहीं ह्मणीतलें : गोसावी **नासिकीं** असति :

गोसावी तुमतें बोलाउं पाठवीलें असे : मग : डखला : ह्मणीतलें : ऐसें गा आमचे गोसावी आपुलें ऐश्वर्य लोपीती : मग **नासीकासि** आले : **उपाध्या** : **नाथोबा** : भेटि जाली : दंडवतें घातलीं : श्रीचरणा लागले : मग मागील अवघें वृत्तांत सांघीतलें : सर्वज्ञें ह्मणीतलें : कैसें ह्मणे : भगवा : शोधु : वेळां तिन पुसीलें : हीराइसा : मग **बटिका** काइ ह्मणे : **भगवा** : ॥ छ ॥ माघौतें सांघीतलें : सर्वज्ञें ह्मणीतलें : कैसें जालें : ब्रह्मवीद्या सुपीं सूनि वीकीजत असीजे : हीराइसा : तथा : कैसी बापुडी ब्रह्मवीद्या : ॥ छ ॥ देखीलें बाइ : बटिकुरें पुसति : यातें : तो यांसि ब्रह्मवीद्या सांघे ॥ २ ॥

नाथोबा केसर्शनीं वीस्मयो : । : चांगदेवो भट सीक्षे गेले : तेयांतें बाइलीं देखिलें होतें : मग नाथोबा गाउनि आले : ॥ : गोसावीयांसि उदयाचां पूजावसर जालेया नंतरें गोसावी वीहरणा बीजें केलें : पाणिवथा बाइलीं देखीलें : **परशरामबास** : परिश्रया बीजें केलें : **रामेश्वर** बास : आवो आवो माए : कालिचा बटिकू बोडीका कीं आजिचि येवढें कैसे : मग गोसावी उभें राहुनि उत्तर दीधलें : बाइ : हा तो नव्हे : तो याचा भाऊ : हे दोघै जावळाचे : तो गांवा गेला : हीराइसा : हे दोघै सारिखेचि : जावळाचे : तो गांवा गेला : हा आजि गाउनि आला : ॥ ३ ॥ छ ॥ :

मार्गी **चौरंगीवीद्या** नीरूपण : ॥ : गोसावी मार्गी बीजें करीत असति : **नासीकीहुनि** नीगीलीया : वृक्षातळीं आसन : बाइसीं ह्मणीतलें : बाबा : एथ आसन किजत असिजे : परि एथ उदक नाहीं : मग उपाध्यातें ह्मणीतलें : ऐसें ऐसें जा पां : परशराम बास : **बटिका** : इकडे : इकडे : हा नसैल : रामेश्वरबास : शोध : तथा बटिका : पाहा पां : उपाध्ये गेले : तिकडे पाहीलें : तवं उदक देखीलें : सागळ भरीली : मग ह्मणीतलें : ऐसे गा आमचे गोसावी : कीं अमूकीकडे उदक असे : ऐसें सांघती ना कां : परि आपुलें ईश्वर्य (ऐश्वर्य ?) लोपती कीं : मग उदक घेउनि आले : गोसावीयांसि आरोगण : ऐसें अवलोकिलें : तवं पळसाचा वृक्ष तोडिला असे : एके ह्मणति : सालैचा : मग भवंते भवंते बरवे कोंभ निगाले : असति : सर्वज्ञें ह्मणीतलें : देखिलें : गा : याचा तरि स्वभावो : **ऐसें माणुसाचां ठाइं दीसे** : तरि **चौरंगीचि वीद्या** जाली :

ह्मणिजे : हीराइसा : देखिलें गा चौरंगीचि वीद्या : तरि सतसीद्ध स्वभाविक गुण पुरुखाचां ठाइं तरि आश्चर्यासि कारण होए : ॥ १ ॥ : **अडगावीं** वसती ॥ २ ॥

मार्गीं **उपासनीया** स्तीति : । : मग गोसावी : **उपाध्यें** : आणि : **उपासनीये** : पूढें पाठवीलें : हीराइसा : सर्वज्ञें ह्मणीतलें : **बटिका** : तुह्मी पुढीलेया गावा जा : तेथ भीक्षा करा : मा : हे तुह्मां उदीया दरिसन देइल : ॥छ॥ : ते निगाले : गोसावीयांसि अडगांवीं वसति जाली : ॥ : उदयाचा पूजावस्वर जालेया नंतरें मग तेथौनि बीजें केलें : **उपाध्ये** : **उपासनीये** : साउमे आले : मार्गीं भेटि जाली : गोसावीयांतें देखीलें : आणि उपासनीया स्तिति जाली : वस्त्रें सांडिलीं : मार्गीं पुढें चालतां मागुतें पाहाति : गोसावी श्रीमुगुटें चाला ह्मणति : आणि मागौतें गोसावीया वरि चालौनि एति : आणि : गोसावी श्रीमुगुटें निराकरीति : श्रीमुगुटें चालवीति : वाटेकडे दाखवीति : आणि पुढें चालती : मग बाइसीं पुसीलें : बाबा : हें काइ **सांभवीचि विद्या** : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : **सांभवीचा** रश्मि : तरि **शाक्तेयाचा** नव्हे : तरि **आणव** : सर्वज्ञें ह्मणीतलें : आणवहि नव्हे : तरि काइ बाबा : आणवीचा रश्मि : एकू : ॥ ३ ॥ : **सुवियाणा** वसति : ॥ ४ ॥

निफाडें अवस्थान : ॥ : गोसावी निफाडेसी मढा बीजें केलें तथा **नारायणाचां** देउळीं : माहात्मे होते : तेंहीं ह्मणीतलें : या : पापीयाचां गांवां कां आलेति : ह्मणौनि आरोळीया देवों लागले : गोसावीयांसि पटिसाळे : मढाचिये : आसन : गोसावी बाइसातें पुसीलें : बाइ : हें कवण : बाबा : हे **वामदेवाचे** प्रथम सिष्य : **आत्माराम** : गोसावी परिश्रया बीजें केलें : सरिसे **डखले** असति : तैसेचि गोसावी **कोंकणाये** बीजें केलें : **डखले** जाडि आणावेया धाडीले : रामेश्वर बास : एतांचि **कोंकणाये आसन** : डखले पुडवाटुवा आणुं गेले : घेउनि आले : **डखलां** सांघीतलें : परशरामबास : गोसावी पुसीलें : **डखलेया** : माहात्मेयासि पयोवर्त जालें : ना जी : ते **आत्मारामू** बोबात असति : या पापियाचीया गावां कां आलेति : मिं तिन दी : भुका आरोळिया

---

१ स्वत : सिद्ध स्वाभाविक.

देतु असें : सर्वज्ञें ह्मणीतलें : हां गा : डखलेया : आत्मारामू ऐसें नांव : आणि भुकीं आळुकीळु देती : हें अतिवीरोध कीं : मग बाइसां करवि **दुगाणिचें** तुप देव वा : यऱ्हवी बाइसां नीरोध कीं गा : हीराइसा : तथा दुध दुगाणिचें :॥छ॥: कां गा : डखलेया विरोधु : ऐसें नांव आत्मारामू : आणि भुका आरोळिया : । : हें अतिवीरोध : मा : बाइसातें ह्मणा : **एकादामाचें** दुध घेया : माहात्मेया पयोवर्त दीया : यऱ्हवीं बाईसा नीरोध कीं गा : ॥ छ ॥ बाइसीं दीधलें : गोसावी मढासि बीजें केलें : तेथ अवस्थान : ॥ १ ॥

हीराइसा : मार्गी सर्वज्ञें ह्मणीतलें : एथ आसन करा : बाइसीं ह्मणीतलें : बाबा : अरण्य : एथ पाणी नसे : गावां जवळि चालिजो का : बाबा : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : एथिचिये प्रवृत्ति वीखो हो जाणा ना : तरि यथ कां असा : बाइसीं आसन केलें : गोसावी आसनीं बैसले : गोसावी उपाध्यातें ह्मणीतलें : बटिका : ऐसें एसें हाण : उदक नसैल : गेले तवं सरे भरलिया असति : ऐसें आमचे गोसावी ईश्वर्ये लोपीति : उदक आणीलें : मग बाइसीं पुजा केली : आरोगण दीधली : पहुड : उपहुड : ॥ छ ॥ २ ॥ छ ॥ :

मार्गी गोसावीयांसि आरोगण : गोसावी **निफाडेहुनि** बीजें केलें : मार्गी कांटिये तळीं आसन : पुजा जाली : आरोगणा जाली ॥ १ ॥

चासी जळक्रिडा : ॥ : मध्येमेश्वरीं वीडा वाणें : ॥ : सोधु : मध्येमेश्वरा आग्ने **चास** : ॥ : तेथौनि गोसावी **नांदोरासि** बीजें केलें : गोसावीयासि जळक्रिडेची प्रवृति : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : हें आतां नये : हें ऐसेंचि जाइल : ॥ : हां गा : **डखलेया** : गोसावी जाती : भिक्षा मागती : भिक्षा मागौनि मध्यें पुजा आरोगण : मग दों पाहारा : **गंगे** बीजें केलें : पांगुरणें कडे ठेवीलीं : गंगे आंतु रिगाले : यरातें डोंचाळिति : यरातें डोंचाळिति : ऐसा खेळु केला : मग थडीया थडीया बीजें केलें : **बाइसें** यरी थडीया थडीया बोबाति : पुरे कीजो बाबा : **सर्वज्ञें** ह्मणीतलें : **डखलेया** पुरे करा गा : **बाइसें** श्रमती : सोधु : बाइ : याना का : आतां पुरें : गा : ॥ : दोही गंगेचा फाटां संगमीं सीळातळ : तेयावरि आसन : गोसावी **नाथोबातें** ह्मणीतलें : **मंडळिका बल्हेग्रामीं**

ग्रहो बहुत : आपुलीया पितेयाचिए वारिची येकि वुडी अधीक दीया : **हीराइसा :** तथा एथ एक स्नान करा गा : बल्हेग्रामीं ग्रह बहुत असती कीं गा : ॥ छ ॥ : **दायांबायें** ह्मणीतलें : पोराचा पूरुखोत्तमु ग्रहो जाला असे : मग **नाथोबायें** स्नान केलें : मग **मध्यमेश्वरा** बीजें केलें : **मध्यमेश्वरा** बीडा बाइला : तथा वाववीला : चौकीं आसन : **आदीत्यीं** वसति :॥ २ ॥:

कानळदीं लींगाचां देउळीं वसति ॥ ३ ॥ **चासीं** आसन : ॥ : माणिकेश्वरीं आसन : ॥ : **जगतीं** आंतु लिंगाचां देउळीं वसति : ॥ : गोसावी **चासांसि** बीजें केलें : चास अवलोकीलें : मग आसन : **माणिकेश्वरीं** जगती आंतु वसति जाली ॥ ४ ॥ **सुरेगांवीं आदीतीं** वसति : सोधु : सुरेगांवा पुर्वे कुंभारवाडा : आदीत्यीं वसति : ॥ ५ ॥ **सोणारीयें** आदीतीं वसति : ॥ ६ ॥ : **सवसरीं सिंगेश्वरीं** आसन : आदीतीं वसति : ॥७॥ : **कुंकुमठाणीं** आग्निष्टीकें वसति : गोसावी **दामोधरा** बीजें केलें : माड अवलोकीलें : **जळसेना** बीजें केलें : हें **रामेश्वरवास** : ॥ : **सींगेश्वरीं** आसन हें **परशुरामवास** : ॥ ८ ॥ : **पुणितांबा** पाताळ गुंफे वसति ॥ ९ ॥ **नायगांवीं दायंबा** भेटी : ॥ १० ॥ : **नाउरीं** कंटकेश्वरीं वसति अग्निष्टिके क्षेउर : ॥ ११ ॥ छ ॥ :

गोसावी **पुणेतांबेया** बीजें केलें : पाताळ गुंफे अवस्थान : दीस पांच : तीन : पुनीतांबा पाताळ गुंफे अवस्थान : ॥ : सोधु : वीळीचां परिश्रया बीजें केलें : तवं ठाकूरू उपद्रवीला देखीला : **बाइसातें** तेथौनिचि बोलाउं पाठविलें : आलीं : बाइसीं ह्मणीतलें : येवढेया वेळां काइ : बाबा : गोसावी ठाकूराचा उपद्रो दाखविला : एथ एसणी हींसा वर्तली : सोधु : आतां एथौनि हें स्थान सोपद्रव जालें : हींसा वर्तें ॥ १ ॥ मग **हींगुणीये** बीजें केलें : तेथ वसती ॥ २ ॥ छ ॥

पुर्णगांवीं : सोधु : दक्षीणे पुर्णगांवा उत्तरे देउळ : ॥ १ ॥ : **सांगवखेडां सिधनाथीं** आसन : ॥ २ ॥ **वांजरगांवीं** मढीं वसति : ॥३॥ जूना **नागमठाणीं** वसति : नागमठाणीं : सोधु : जूना नागमठाणीं आदीत्यीं :

पूर्वांमुख दारवठा : उत्तरामूख ॥ ४ ॥ तपोवनीं माणिकेश्वरीं आसन : ॥ ५ ॥ **खातेगावीं** आदीत्र्यीं वसति : वामाचा उपाहारू : ॥ ६ ॥ : **रामनार्थी** आसन : ॥ ७ ॥ :

डोंबेग्रामीं अवस्थान : दीस सात : ॥ : मढीं दाइंभागवतासी ज्वरू आला : तेहीं वीनवीलें : जी जी : माझा ज्वरू फेडावा जी : सर्वज्ञें ह्मणीतलें : एथ आधीं वोटा करा : मग फेडीजैल : हो कां जी : केला : मग जरू फीटला : हें लिळा **रामेश्वरबास** : उत्तरार्ध स्थानीं : ॥ १ ॥ : **दाइंबा डखलेया** पाठवणीं : ॥ २ ॥ :

बीडीं अटवेलिये गुंफे अवस्थान : ॥ : गोसावी **बीडीं** बीढार पाहात होते : **माहालक्ष्मीचें** देउळ पाहीलें : देउळा दक्षीणे पटीसाळा : पांत पांत देउळां नैऋत्ये गुंफा : तेथ बीजें केलें : दोन्ही **दारसंका** धरूनि भितरि अवलोकीलें : **प्रसनायक** वोटेयावरि बैसले असति : तेहीं ह्मणीतलें : येइजो जी ; ह्मणौनि : भीतरि बोलावीलें : एथ बीढार कीजो जी : आपुला परिग्रहो परता ठेउनि गोसावीयासि वोटा संपादीला : बाइसीं आसन केलें : गोसावी आसनीं उपविष्ट जाले : मास च्यारि अवस्थान : ॥ छ ॥ : **प्रसनाएका** स्तीति प्रसनाएक पुढां बैसले : तेयां स्तिति जाली : मग : प्रसनाएक ह्मणती : गोसावीया पासौनि आह्मांसि ब्रह्मवीप्तति जाली : चातुरमासीची पासोडी आली होती : तेथ उलाउनि ठेवीली होती : ते गोसावीयासि बोळगवीली ॥ १ ॥

पद्मनाभि स्तीति : ॥ : **सारस्वत भटां** : भोगनारायेणाचां देउळी दरिसन जालें होतें : ह्मणौनि : ते गोसावीयाचेया दरिसना येति : तेया सरिसे **पद्मनाभिदेव** येति : ते नावेक चळवळे : **बाइसां** कांहीं **ह्मणीयें** करूं लागती : बाइसें ह्मणति : **बटिका** : येइजे हो : बाबा निके : आणि येकलेयांचि येवों जावों लागले : मग **सारस्वत भट** : देहा एका आड येति ; मग दीसां आठां येति : मग ह्मणति : **मि** अमूकेया तमूकेया **गेलां होतां** : तो आरायेंचि ना : मग गोसावीया पासौनि **ब्रह्मनाभिदेवा** स्तीति जाली : मग ते गोसावीयापासि आसेति • मग सारस्वतभट ह्मणति : गोसावीयासि उदयाचां पूजावस्वर जालेया नंतरें मग गोसावी दक्षिणेश्वर वीहरणा बीजें केलें : मागौतें

बीढारा बीजें केलें : गोसावी दक्षिणेश्वराकडे बीजें केलें : बनीं आसन : पासि पद्मनाभि देव बैसले असति : तेया वरौनि : **सारस्वतदेव** आडपालो वोडउनि गेले : तवं **बाइसी** ह्मणीतलें : बाबा पैल सारस्वतभट नव्हति : **सर्वज्ञें** ह्मणीतलें : होति : हो : बाबातें देखौनि आडवे आडवे कां जात असेति : गोसावी पद्मनाभितें दाखवीलें : हा एथ असे : ह्मणौनि : सोधु : हा एथ असे : तवं बाइसीं ह्मणीतलें : बाबा : हा एथ असे : तरि यासि आडवेया जावेया काइ कारण : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : सिक्षाचां (शिष्याचां) अभिमान : ॥ १ ॥ या उपरि **पंचकौळाचार्यांची** गोष्टि सांगीतली : मग **बाइसीं** ह्मणीतलें : बटिका : तरि तुं न ये एथ : ॥ २ ॥ :

रेमनायकां अवसरू : ॥ : एकवेळ **पद्मनाभि देवीं :** रेमनायेका पुढें गोसावीयाची प्रशंसा केली : रेमनायेकू : गोसावीयाचेया दरीसना आले : तवं : गोसावीयासि मर्दना : जाली : एकें ह्मणति : पद्मनाभि देव मर्दना देत होते : तवं रेमनायक आले : गोसावीयां पुढें जाणवीलें : जी जी : रेमनायक आले : गोसावीयासि जाडी आसना घातली होती : तेथ एकूनि जाडी पांगरौनि गोसावी बाहीरि बीजें केलें : गोसावी पटिसाळेवरि : तथा कोंगटें : रेमनायकें पुसीलें : **श्री चांगदेवो राउळां** : गोसावीयासि कैसा अवसरू असे : **सर्वज्ञें** ह्मणीतलें : ऐसा असे : ह्मणौनि : जाडि फेडुनि दाखवीलें : मग आसन : गोसावीयांसि गोष्टी करीति : तेवीचि पस्यातापु करिति : जी जी : अवसरू नेणेंचि जी : एकाचेनि मतें : नायको : तुह्मां अवस्वरू अनवस्वरू नाहीं कीं : ॥ ३ ॥ :

कोले घायखंडी दाखवणें : ॥ : एकुदीस उदयाचा पूजावस्त्र जालेया नंतरें गोसावी वीहरणा बीजें करिति : बनाकडे जातां : तवं राजगुरु एकू : आपुलिया सिख्यांसि **सराउं** देवों गेला होता : बना आंतु गोसावीयाचें दर्शन जालें : आपुलिए हातींचा कोलु : गोसावियाचिये श्रीकरीं वोळगवीला : मग मागौता सरला : सिख्यांचिए हातिचा कोलु आपणें घेतला : गोसावी बद करूनि घावो लावीला : तेणें ह्मणीतलें : जी जी : एकू वेळ **घाएखंडी** दाखवीजो जी : ह्मणौनि : श्रीचरणा लागला : **सर्वज्ञें** ह्मणीतलें : न दाखवीजे : भक्तजनीं

ह्मणीतलें : **हीराइसा** : तथा : बाइसीं ह्मणीतलें : कां न दाखवीजे जी : सर्वज्ञें ह्मणीतलें : घाया घाया प्राणियातें ठेवील : तथा हीराइसा : **बाइ : पोरू प्राह्म असे : एकू वेळ दाखवीजतें आणि कळौनि घेता** : प्राणियातें **घतता** : तथा **मारिता** ॥ ४ ॥

सुकीया जोगनाएका दुखापनौति : ॥ : एकुदीस गोसावीयांसि उदयाचा पूजावस्वर जालेया नंतरें गोसावी वीहरणा बीजें केलें : यानंतरें भीतरि वाटैयावरि आसन : सोधु पटिसाळे आसन असे : **बाइसें** : चरणक्षाळण करीतें असति : तवं सूकीये जोगनाएक आले : हीराइसा : **सर्वज्ञें** ह्मणीतलें : नायेको या : ॥ छ ॥ दंडवतें घातलीं : श्रीचरणा लागले : बैसले : चरणोदक प्रसाददान होए : ताप गेले : जी : निवाला जीं : ताप काइसे : नाएको : सोधु : ऐसे काइसेन श्रमलेति : नाएको : जी जी : मीं **भिरजेकडील : उभे मार्गीचा** सूंकिया : तेलंगदेशासि गेलों द्रव्य जोडिलें : घेउनि एत होतों : तो बड्वे बैलु फांकीला : तें द्रव्य गेलें : मग गांवा आलों घरिचा **वेलुवाकू** वीकूनि वडिलु पुत्रु सोवनीं हाती बैसवीला : तो मेला : मग धाकुटा बैसवीला : तोही मेला : **ब्राह्मणि** मेली : ऐसा दुखीया जालां जी : कव्हणे ठाइं सुखासि नये : एथ आलां : आणि ताप जात देखत असें जी : सोधु : पुरुखासि घरभंगु पुत्र सोखू द्रव्य सोखू : ये तिन्हीं असाहे : नावेक होते : गोसावी पाठवणी दीधली : नीगतां **सर्वज्ञें** ह्मणीतलें : नायेको : **यथ येवों आवडे : तेधवां येइजे हो** : मग निगाले : ॥ ५ ॥ :

बाइसीं माहात्मेयाची वाट पाहाणें : ॥ : बाइसीं ह्मणीतलें : बाबा : सांपें (सध्यां) माहात्मे कोण्हीं न यति : तथा बाबाचीं भक्तें कोन्हीं न येति : कीं अळसु लागतु असे : बाबा : **सर्वज्ञें** ह्मणीतलें : हें एथ असे : ऐसें कोण्ही जाणेना : हीराइसा : बाइ : एथही आळसू लागत असे : एती : बाइ : पाणीभातु सांचा : अभ्यागतें एतें असति : काइगा : ॥ छ ॥ ६ ॥ :

देवां भटां भेटि : ॥ : **देव : भट : कांबखेडाहुनि** आले : हाटवटिया जात असति : विळिचां गोदरी भरली असे : दोहीं सूरकौनि दीवे

लागले असति : ऐसें जात असति : तवं **भटोबासीं** ह्मणीतलें : कैसीं बरवीं चोखें पानें फुलें : गोसावीया जोगीं वीकतें असति : **देवीं** ह्मणीतलें : हो **नागदेया** : गोसावी कवणें ठाइ असति : ऐसें नेणिजे : यऱ्हवी घेवौनि जातों : गेले : एकाचां घरीं वसीले : उदीयांचि अटवेदीये धोत्रें धोंआवेंया आले : देव बैसले : भटोबास धोत्रें धुत असति : गोसावीयांसि उदयाचा पूजावसर जालेया नंतरें गोसावी मा (मग) आसनीं उपविष्ट असति : तवं देवीं उजाइ केली : सर्वज्ञें ह्मणीतलें : बाइ : **उजाइ** माहात्मेया सारिखी : माहात्मा आला असे : गोसावी उठीले : दोन्हीं दारसंका (द्वारशृंखला) धरूनि अवलोकीलें : तवं **देवां भटातें** (दादोस व नागदेव) देखीलें : आणि खांकरिले : भटीं मागौतें पाहीलें : गोसावीयांतें देखीलें : मग ह्मणीतलें : **दादो दादो** गोसावी कीं असति : हे नव्हति ऐसें ह्मणति : गोसावी खालि उतरले : आणि **दादोसावरि** साइली पडली : मागुतें पाहीलें तवं गोसावी : नागदेया गोसावी : गोसावी देवासि (दादोसासि) **क्षेवं दीधलें : भटोसि** मागिला कडौनि खेवं दीधलें : गोसावी मागौता ऐसा श्रीकरू केला : करूनि पूढें आणिले : मग गोसावी क्षेमालिंगन दीधलें : मग गुंफे बीजें केलें : **दादोसीं भटोबासा करवि** पुजा द्रव्यें आणवीलीं : पुजा केली : एकें ह्मणति : केळें आणवीलीं होतीं ते गोसावी एकदोनी आरोगण केलीं : गुळळा : वीडा : मग दादोसीं वीनवीलें : जी जी : अवघीं भक्तजनें गोसावीयाची वाट पाहातें असति : जी : गोसावी कवणी ठाइ राज्य करीताति : ऐसें नेणिजे : तरि नागदेवातें बोलाउं धाडिदेया : गोसावी मानिलें : हीराइसा : धाडा : ॥ छ ॥ मग भटोबास बोलाउं धाडिलें : ॥ ७ ॥ :

महानुभाव ' श्रुति ' वाङ्मय.

१ **चक्रधर सिद्धान्तसूत्रें**–भाग १ ला (लक्षणान्वय पाठ) किंमत १॥ रु.

२ **चक्रधरोक्त-सूत्रपाठ**– ... ... किंमत ४ आ.

३ **लीळाचरित्र**– भाग १ ला–एकांक ... ... किंमत ४ आ.

४ **नित्यदिनीलीळा**– (प्रसादसेवा, मूर्तिज्ञान, पूजावसर व नामाचे दहा ठाय किंमत २ आ.

५ **दृष्टान्तपाठ**- (सटीप आवृत्ति) लवकरच प्रसिद्ध होईल.